अधिक गंभीर और चिंत्य बात दलित रचनाकारों बुद्धिजीवियों की सोच और व्यवहार के अपने अतर्विरोध है जिनके साक्ष्य दलित लेखको ने स्वयं अपनी आत्मकथाओं में दिये हैं। आत्मलोचन और आत्मसंघर्ष के क्रम में ही उनसे उभरा जा सकता है, जिस की जरूरत है। विमर्श के जो मुख्य मुद्दे ऊपर बनाए गये हैं, दलित रचनाकार बुद्धिजीवी उनपर भी भिन्न मत रखते हैं। संवाद मुक्त मन से किया जानेवाला संवाद संजीदगी से किया गया आत्मलोचन ही एकमात्र उपाय है - विचार और व्यवहार के अतर्विरोधों को दूर करने का पूरी सदी हमारे सामने है हम क्या ऐसा कर पायेंगे? हम तो चाहते हैं कि नई सदी समता सदी बने। राष्ट्र के माथे पर लगा वर्णगत भेदभाव का कलंक धुले। इस ज्वलंत प्रश्न पर संप्रति इतना ही।

जहाँ तक आदिवासी समाज का प्रश्न है - आदिवासी जीवन - संदर्भ लगभग उपेक्षित रहे है हमारी रचनाशीलता में। सबसे कम लिखा गया है उन पर। जरूरी है - आदिवासी जीवन - संदर्भ, उनकी अस्मिता और हक के सवाल विमर्श की मुख्यधारा में आए। इधर जो कुछ नया सामने आया है, और आ रहा है, आदिवासी समाज के बीच से उनके स्वर उभर रहे हैं। दलित - लेखकों ने अब खुद - अपने हाथ में कलम पकड़ी - दलित - लेखन की शिनाख्त समूचे देश में हुई। हम उम्मीद करते हैं - आदिवासी कलम भी, समय के पट पर ऐसी इबारत लिखेगी, जिसे उसी संजीदगी से पढ़ा और समझा जाएगा, जिस संजीदगी से दलित साहित्य आज पढ़ा जा रहा है।

स्त्री - विमर्श का मुद्दा भी विपथित - विमर्श के दायरे में है। स्त्री - अस्मिता का प्रश्न हो - स्त्री - मुक्ति का प्रश्न हो, उसकी दिशाएँ स्पष्ट नहीं हैं। स्वयं स्त्री - रचनाकारों में भी उन्हें लेकर एक मत नहीं है। इस तरह के स्वर भी उठ रहे हैं कि स्त्री - अस्मिता और स्त्री - मुक्ति के सवाल को कथाकथित नारीवाद की सोच से अलग किया जाय। नारीवादी लेखन और स्त्री - जीवन संदर्भों से जुडे लेखन में फर्क किया जाय। स्त्री - मुक्ति का मुद्दा स्त्री बनाम पुरुष के मुद्दे के रुप में भी सामने लाया जा रहा है, जिस पर स्त्री रचनाकारों - विमर्शकारों में ही भारी मतभेद है। कुछ के अनुसार मुद्दा स्त्री बनाम पुरुष के बजाय यह होना चाहिए कि स्त्री - पुरुष संबंधो में तमाम कारणों से जो विकृति, असंतुलन, विषमता आई है, उसके खिलाफ कोशिश इस बात की हो कि स्त्री - पुरुष संबंध समरस बनें दोनों के वजूद रहें और समरस - सहभागिता का जीवन <u>जिएँ</u>। मुक्ति बंधनो से हो, <u>कुठार बंधनों</u> और विकृतियों पर चले ना कि स्त्री - पुरुष संबंधों पर। ताकि प्रकृति की लय भी बनी रहे और संसार भी चलता रहे। स्त्री - विमर्श की एक सीमा उसका मध्यवर्गीय दायरे में सिमटा होना भी है मुक्ति का प्रश्न स्त्री मात्र की मुक्ति का प्रश्न है, उस स्त्री की मुक्ति का भी जो मुक्ति को जानती समझती भी रही और उस स्त्री की मुक्ति का भी जो गुलामी में सुख का अनुभव करते हुए संस्कार बद्धता में जी रही है। मेरे मत से साइमन - द - बुआर से अधिक महादेवी वर्मा की 'श्रृंखला की कडियाँ' उपादय होगी, स्त्री विमर्श के संदर्भ में। बहरहाल स्त्री अस्मिता या मुक्ति का सवाल इसी सदी में हल हो। यह सदी स्त्री मुक्ति सदी भी बने।

जहाँ तक वैश्वीकरण से उपजी चुनौतियों का प्रश्न है हम कह चुके हैं - प्रतिरोध की रचनाधर्मिता ही उसका प्रतिपक्ष है। जो भी शुभ - सुंदर बचा है उसे हर कीमत पर बचाना चाहिए। बिखरे प्रतिरोध को सहान करने की जरूरत हैं। वंचित, उपेक्षित, बहुसंख्यकजन इस मुहीम में हमारा सबसे बडा संकल्प है। जरूरी है कि उनके पक्ष में हमारा लिखा हुआ उन तक उनकी बोली वाणी में भी पहूँचे। संकट गंभीर साहित्य पर भी है बाजार उसे हाशिये पर डाल रहा है। रोमांचक, फुटपाती साहित्य के प्रति रूझान बढ़ रही है। छपा हुआ शब्द हाशिए पर जा रहा है साहित्यिक अभिरूचि का क्षरण हो रहा है बाजार ने गंभीर चुनौतियाँ फैंकी है जिनसे संजीदगी और पूरी निष्ठा से निपटने की जरूरत है। साहित्य और जनता के बीच चौडी होती खाई को भी पाटना है। समय भी कठिन है और चुनौतियाँ भी वास्तविक है। भारतीय भाषाओं की रचना धर्मिता में इस बात के साक्ष्य है कि हमारे तमाम रचनाधर्मी हर तरह के दबाव और प्रलोभनों से ऊपर उठकर जनधर्मी आदमी और आदमीयत के पक्ष में खडी रचनाधर्मिता के लिए चुनौतिया से टकरा रहे हैं। चुनौतियाँ है तो उनसे टकराने का हौसला भी है। आदमी और आदमी के पक्ष की रचनाधर्मीता को कोई भी शक्ति विनष्ट नहीं कर सकती, हमें इसका विश्वास है।

शिवकुमार मिश्रा

•••

स्वातंत्र्योत्तर संस्कृत साहित्यात प्रतिबिंबित आधुनिकतावाद - (ग्रामगीतामृतम्च्या आधारे)

प्रा. पंकजा वाघमारे



संस्कृतभाषा ही देववाणी आहे, ती अत्यंत प्राचीन आहे. विश्वातील एक अत्यंत रसाळ आणि परिपूर्ण भाषा संस्कृतच आहे हे विधान सर्वमान्य आहे. संस्कृतचे अत्यंत समृद्ध असे वैदिक आणि लौकिक साहित्य पाहिल्यावर आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. संस्कृत साहित्याच्या विशालतेमुळे आणि व्यापकतेमुळे वैदिक आणि लौकिक अशा दोन खंडांमध्ये त्याची विभागणी केलेली आहे.

विश्वातील सर्व धर्मांपैकी वैदिक धर्मच असा एक धर्म आहे. जो विश्वबंधुत्वाची शिकवण देतो, त्याचप्रमाणे सर्व धर्मांचा आदरदेखील तो करतो. अशा भावनेने ओत-प्रोत साहित्याचे अनुशीलन आज सगळीकडे अशांततेने व्यापलेल्या आणि कलहपूर्ण वातावरणात अत्यंत उपयुक्त होईल.

तसेच लौकिक संस्कृत साहित्य देखील अत्यंत व्यापक आणि आनंददायी आहे. भारतीय संस्कृतीच्या विचारधारेचे प्रतिबिंब आपल्याला संपूर्ण संस्कृत साहित्यात पहायला मिळते. कोणतेही राष्ट्र आपल्या संस्कृतीला आणि मानवी मूल्यांना विसरून जिवंत राहू शकत नाही. संस्कृतीची आणि मानवी मूल्यांची जोपासना करत आपल्या राष्ट्राला खऱ्या अर्थाने जिवंत ठेवण्याचे अपूर्व कार्य संस्कृत साहित्याने केलेले आहे आणि म्हणूनच

यथा पयोधेर्लहरी प्रसूता सुधा सुराणाममृतत्वहेतू: ।

तथैव गीर्वाणसुधाऽपि भूयात् नवीन सारस्वतवीचिभूतेः ॥

अर्थ -ज्याप्रमाणे देवांना अमरत्व प्रदान करण्याच्या हेतूने समुद्राच्या लाटांमधून अमृत निर्माण झालं तद्वतच नवीन सारस्वताला जीवदान देण्याच्या हेतूने हे संस्कृतभाषारूपी अमृत निर्माण झालं.

या प्रशंसोक्तीकडे पाहिल्यास, सर्व भाषांची पोषिणी असलेल्या या संस्कृत भाषेची निर्मिती खरोखरच नवीन साहित्याला जीवदान देण्यासाठीच झाली असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

संस्कृत साहित्य हे 'उपजीव्य साहित्य' आहे. या साहित्यावर आधारित अनेक ग्रंथ वेगवेगळ्या भाषांमधून निर्माण झाले. ही वस्तुस्थिती असली तरी संस्कृत साहित्य हे प्राचीन आहे. गेली कित्येक शतके संस्कृतात नवीन साहित्यनिर्मिती होत नाही असा एक फार मोठा आक्षेप संस्कृत साहित्यावर घेतला जातो. परंतु असा आक्षेप घेणाऱ्यांच्या डोळ्यांत अंजन घालणारी एक घटना मागील महिन्यात घडली. दि.१८ डिसेंबर २००८ रोजी अत्यंत मानाचा समजला जाणारा ४२ वा 'ज्ञानपीठ' पुरस्कार संस्कृतचे आदरणीय विद्वान पद्मश्री म.म.डॉ.सत्यव्रत शास्त्री यांना मिळाला. संस्कृतभाषेच्या वाङ्मय निर्मितीसाठी हा पुरस्कार मिळणं हा डॉ.सत्यव्रत शास्त्रींबरोबरच संस्कृत भाषेचा सन्मान तर आहेच परंतु संस्कृतातील आधुनिक वाङ्मयनिर्मितीवरील आक्षेपाला हे चोख प्रत्युत्तर आहे. डॉ.सत्यव्रत शास्त्रींची ग्रंथसंपदा ही स्वातंत्र्योत्तर काळातीलच निर्मिती आहे.

१) श्रीबोधिसत्त्वचरितम् (१९६०)
२) Essays on Indology (१९६३)
३) श्रीगुरूगोविन्दसिंहचरितम् (१९६७)
४) इंदिरागांधीचरितम् (१९७६)
५) श्रीरामकीर्तिमहाकाव्यम् (१९९०)
६) पत्रकाव्यम् (१९९४)
७) सुभाषितसाहस्री (१९९८)

आणि इतरही अनेक ग्रंथांची त्यांनी रचना केली आहे. त्याचबरोबर 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथाच्या सात खंडांचे प्रकाशन दि.१९ नोव्हेंबर २००५ रोजी झाले. आधुनिक काळात महाकाव्य, खंडकाव्य आणि पत्रकाव्याची निर्मिती करणारे डॉ.सत्यव्रत शास्त्री हे एकमेवाद्वितीय आहेत.

स्वातंत्र्योत्तर काळात ज्या अनेक संस्कृत कवींनी अप्रतिम अशा ग्रंथरचना केल्या त्यामध्ये प्रामुख्याने श्री.माधवराव डाऊ, श्री.गं.बा.पळसुले, लोकनायक श्री.अणे, श्री. रेणापुरकर, श्री. ज्ञानेश्वर साधू, श्री. रामशास्त्री शेवाळकर, श्री. शेवडे आणि प्रज्ञाभारती डॉ.श्री.भा.वर्णेकर या सर्वांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. बहुमोल आणि बहुविध वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्यासाठी डॉ.श्री.भा.वर्णेकरांना अनेक पुरस्कार देखील प्राप्त झालेत. साहित्य अकादमी पुरस्कार (१९७४), सुरभारती-कंठाभरण (१९७७), भारतपुत्र (१९८३), कालिदास पुरस्कार (१९८३), राष्ट्रपती पुरस्कार (१९८९), प्रज्ञाभारती (१९८९), महाराष्ट्र गौरव (१९९०) इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आलेले आहे. 'शिवराज्योदयम्' हे त्यांचे महाकाव्य, 'शिवराज्याभिषेकम्' हे सात अंकी नाटक, 'विनायक

वैजयंती', 'जवाहर तरंगिणी' इ. सहा खंडकाव्य, स्फुट काव्यसंग्रह आणि तीन अनुवादकाव्य ही त्यांच्या बहुविध ग्रंथांपैकी काही प्रातिनिधिक उदाहरणे. श्री. वर्णेकरांचे साहित्य म्हणजे विस्तृत असे वाङ्मयविश्वच आहे. संस्कृत भाषा आणि संस्कृतच्या साहित्याची ही चैतन्यमयी विचारधारा वर्तमान युगात देखील दैदिप्यमान करण्याचे फार मोठे अलौकिक कार्य डॉ. वर्णेकरांनी केले आहे त्यात संशय नाही.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी रचलेली 'ग्रामगीता' भारतातच नव्हे तर संपूर्ण विश्वातील तरूणांना, नवीन समाजाच्या निर्मितीची इच्छा करणाऱ्यांना, विधायक कार्य करणाऱ्यांना, त्याचप्रमाणे साहित्यीकांना प्रेरणा आणि स्फूर्ती प्रदान करणारा अपूर्व ग्रंथ आहे. संपूर्ण भारतातील संत साहित्यात ग्रामगीतेचे स्थान अभूतपूर्व आहे. या ५,७०० ओव्यांचा सत्वांशरूप असलेला, ४१ अध्याय आणि १८६९ श्लोकांनी युक्त असा 'ग्रामगीतामृतम्' हा अनुवाद अमृतवाणी संस्कृत भाषेत करण्याचे महान कार्य डॉ.श्री.भा.वर्णेकर यांनी केले आहे.

ग्रामगीतेचा हा अनुवाद करत असतांना, इतर भाषांच्या अनुवादित साहित्यामुळे जसे त्या त्या भाषेचा साहित्यविस्तार करण्याचे कार्य केले आहे तसेच या अनुवादाने देखील संस्कृत साहित्याचा विस्तार करण्याचे मौलिक कार्य केले आहे. या अनुवादाचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे हा शब्दश: अनुवाद नसून फक्त त्यांतील सत्वांशच घेतलेला आहे. त्यामुळे राष्ट्रसंतांच्या मूळ विचारातील आशय अबाधित ठेऊन, त्याच्या आधाराने एक स्वतंत्र संस्कृत ग्रामगीता वाटावी अशी रचना असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांना संस्कृत भाषेचा अपूर्व साज चढविल्यामुळे डॉ.वर्णेकरांची ही 'ग्रामगीता' अभिनव बनली आहे. यामध्ये सर्व धर्मांचा समन्वय, विश्वशांतीचा उपाय, लोकसुधारणा, आत्मोन्नती व ग्रामोन्नती साध्य करून प्रत्येक गाव व नागरिक स्वावलंबी, स्वयंशासित व स्वयंपूर्ण बनविण्याचे शास्त्र, लग्न, मृत्यू इ. चे तत्त्वज्ञान, एकूणच मानवी जीवनयात्रा कशी सफल होईल असे सर्व सक्रीय तत्त्वज्ञान भरलेले आहे.

मूळ ग्रामगीतेचे मुख्य वैशिष्टय म्हणजे तिचे पद्य हे समजायला अत्यंत सोपे आहे आणि रचना अत्यंत आकर्षक आहे. सामान्य माणसाच्या पचनी पडावे असे हे तत्त्वज्ञान असून राष्ट्रसंतांनी दैनंदिन जीवनातले दाखले दिल्यामुळे सर्वांना आवडेल असेच हे काव्य आहे. डॉ.वर्णेकरांनी देखील अत्यंत सोप्या आणि दैनंदिन वापरातल्या संस्कृत शब्दांचा वापर करून याचा अनुवाद केलेला असल्यामुळे हा अनुवादही सर्वसमान्यांना समजेल, पटेल आणि रूचेल असाच आहे. हे सर्व करत असतांना मूळ आशय मात्र अबाधित राहिल्यामुळे डॉ.वर्णेकरांच्या रचना कौशल्याचा, कविश्रेष्ठत्वाचा वाचकाला प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. त्यामुळेच 'ग्रामगीतामृतम्' या त्यांच्या ग्रंथाने संस्कृत साहित्यात स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे.

भारतातील ८०% जनता खेड्यात राहते. त्यामुळे म.गांधीनी देखील 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. कारण देशाची सर्वांगीण प्रगती साधायची असेल तर खेडी स्वयंपूर्ण व्हायला हवीत आणि ग्रामीण जनतेची प्रगती झाल्याशिवाय देशाचा विकास अशक्य आहे. हे भारतीय लोकशाहीचे वास्तव आहे. फार प्राचीन काळात इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात राजनीतीवरील एक संस्कृत ग्रंथ निर्माण झाला तो म्हणजे 'कौटिलीय अर्थशास्त्र'. या ग्रंथात कौटिल्याने देखील आदर्श आणि स्वयंपूर्ण खेड्यांची रचना केली जावी असे म्हटले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना देखील हे मान्य होते की, खेड्यांना आदर्श बनविले तरच देश आदर्श बनणार आहे म्हणूनच त्यांनी अत्यंत मार्गदर्शक अशा ग्रामगीतेची रचना केली. म्हणूनच ग्रामगीतेमध्ये ग्रामांना केंद्रबिंदू मानले आहे. पण इतरही अनेक आधुनिकतावादाशी संवाद साधणाऱ्या विषयांचा त्यात ऊहापोह केलेला आहे.

सर्वांत प्रथम विश्वधर्म: या अध्यायात डॉ. वर्णेकर काय म्हणतात ते पाहणे उचित ठरेल. डॉ. वर्णेकरांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास-

देशभक्ति किंवा राष्ट्रनिष्ठा या भावनेचा भारतीय समाजात सर्वथा अभाव होता. देशभक्तीपरायण इंग्रजांच्या संपर्काने किंवा इंग्रजी साहित्याच्या संस्कारानेच त्या भावनेचा संचार भारतीय समाजात झाला. तथापि राष्ट्रभक्ति किंवा देशभक्ती एतद्देशीयांच्या अन्त:करणात कधी अंकुरित झालीच नव्हती असे सरसकट विधान मात्र निरपवादपणे ग्राहय मानता येत नाही. प्राचीन संस्कृत साहित्यात या राष्ट्रातील पवित्र नद्या, पर्वत, तीर्थक्षेत्रे इत्यादिकांविषयी पराकाष्ठेची भक्ती व्यक्त झालेली दिसून येईल त्यामध्ये व्यक्त झालेल्या उदात्त भावना जगातील कोणत्याही राष्ट्राच्या साहित्यात व्यक्त झालेल्या सहसा आढळणार नाहीत. 'माता भूमि: पुत्रो अहं पृथिव्या: ।' यासारख्या वेदवचनातून किंवा 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' यासारख्या हृद्य सुभाषितांतून भारतीयांची राष्ट्रभक्ती उत्तम प्रकारे व्यक्त झाली आहे. (पान नं.३३५ अर्वाचीन संस्कृत साहित्य).

त्याचबरोबर 'वसुवैध कुटुम्बकम्' ही संकल्पनादेखील भारतीयांना नवी नाही. सध्या संपूर्ण जगात ज्या एकाच विषयाची चर्चा होते आहे तो म्हणजे दहशतवाद ! मुंबईवर अतिरेकी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा विश्वबंधुत्वाच्या कल्पनेने जोर धरला आहे. यासंदर्भात ग्रामगीतेमध्ये दहशतवादाबद्दल अत्यंत परखडपणे डॉ.वर्णेकर म्हणतात.

विलुप्ता करूणा मैत्री प्रेम - सौहार्द - वर्धिनी ।

प्रवृद्धा शत्रुताऽन्योन्यं हिंसा क्रौर्य प्रवर्तिनी ॥
संख्याबलं श्रेष्ठतमं मतं धर्मबलं बत ।
परधर्म - विघातार्थं धर्मयुद्धानि चक्रिरे ॥

(श्लोक २५-२६, अध्याय २८ वा, ग्रामगीतामृतम्)

यातील खालची ओळ अत्यंत मार्मिक आहे की दुसऱ्याच्या धर्माचा घात करण्यासाठी धर्मयुद्ध केली जात आहेत. संपूर्ण जगाला भेडसावणाऱ्या दहशतवादाचे मूळ यातच आहे असे दिसून येते.

त्यांवरील उपायही पुढे लगेचच सांगितला आहे.
यावद् एकात्मता तत्त्वं न याति दृढ - मूलताम् ।
लोकेषु तावद् विद्वेषः निर्मूलो न भविष्यति ॥

(श्लोक ३९, अध्याय २८ वा, ग्रामगीतामृतम्)

एकात्मतेची भावना, विश्वबंधुत्वाची भावना वाढीला लागणे अत्यंत आवश्यक आहे त्याशिवाय या समस्या सुटणार नाहीत हे नक्की आहे आणि त्याचबरोबर सर्वांना अहिंसेचे महत्त्व देखील पटवून द्यायला पाहिजे कारण अहिंसा हाच परमधर्म आहे.

अहिंसा परमो धर्मः सत्य-नीति-समन्विता ।
अधर्मः परमो हिंसा द्रोहो वा साम्प्रदायिकः ॥

(श्लोक क्र.२८, अध्याय २८, ग्रामगीतामृतम्)

संपूर्ण जगाला आज या विचारांची गरज आहे. अहिंसेचे महत्त्व जेव्हा जगाला पटेल तेव्हाच संपूर्ण जगात विश्वबंधुत्वाची संकल्पना वाढीला लागेल आणि दहशतवादासारख्या अवघड समस्यांचे निराकरण होऊ शकेल. त्यामुळे विश्वधर्म सांगणारे त्यांचे विचार हे अत्यंत उपयुक्त आहेत असे म्हणता येईल.

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. विविध धर्मांचे, पंथांचे, जातीचे लोक हे अत्यंत सुखाने एकत्र राहतात. परंतु कधीकधी उसळणाऱ्या जातीय दंगलींनी मन सुन्न होते. काही धर्मांध लोक अशी अशांतता पसरवतात त्या सर्वांनाच ग्रामगीता सांगते-

ग्रामे ग्रामे सर्वधर्म - समभावो यदोद्भवेत् ।
तदा हि स्वर्गलोकोऽसौ भूलोकेऽवतरेद् ध्रुवम् ॥

(श्लोक ४०, अध्याय २८, ग्रामगीतामृतम्)

सध्याच्या काळात या मौल्यवान विचाराचे पुनरवलोकन होणे गरजेचे आहे. तरच भारतात धर्मनिरपेक्षता बळकट होईल.

यानंतर सर्वांत महत्त्वाचा त्यांचा विचार वाटतो. तो म्हणजे स्त्रियांसंबंधीचा ! 'महिलोन्नतिः' या एका संपूर्ण अध्यायात स्त्रियांविषयीचा त्यांनी केलेला विचार हा हृदयस्पर्शी आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तर सर्वांनी अंमलात आणावा असा हा विचार आहे. स्त्री आणि पुरूष ही एका रथाची दोन चाकं आहेत असं आपण म्हणतो. पण जोपर्यंत देशातील सर्व स्त्रिया सुशिक्षित होत नाहीत तोपर्यंत देशाची सर्वांगीण प्रगती अशक्य आहे. आज आपला भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. असे असतांना, देशातील अशिक्षित स्त्रियांची आकडेवारी ही धक्कादायक आहे. अजूनही १००% स्त्रिया सुशिक्षित झालेल्या नाहीत. ग्रामगीता म्हणते -

यथार्थतो विजानद्भिः देश-काल-परिस्थितिम् ।
यथा पुत्रस् तथा पुत्री संस्कर्तव्या सुशिक्षणैः ॥

(श्लोक ३३, अध्याय २०, ग्रामगीतामृतम्)

डॉ. वर्णेकरांनी अत्यंत सोप्या भाषेत केलेली ही रचना अत्यंत मार्गदर्शक अशीच आहे ते पुढे म्हणतात -

द्विचक्रस्य रथस्येव समाजस्य प्रवर्तनम् ।
द्वयोर् भवति तुल्यत्वे स्त्रियश्च पुरूषस्य च ॥
(श्लोक ३८, अध्याय २०, ग्रामगीतामृतम्)
पुरूषाणाम् इव स्त्रीणां, सर्वांगीणा समुन्नतिः ।
यत्र स्यात् तत्र, राष्ट्रे हि स्वर्गः प्रावतरिष्यति ॥

(श्लोक ३६, अध्याय २०, ग्रामगीतामृतम्)

पुरूषांबरोबरच महिलांची उन्नती झाली तरच त्या राष्ट्रात स्वर्ग अवतरेल हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. हा आधुनिक विचार सर्वांना प्रेरणादायी आहे.

ग्रामगीतेच्या रचनेला बराच कालावधी लोटला असला तरी त्यातील विचार मात्र अत्यंत आधुनिक आहेत. गावाचे आरोग्य कसे असावे या संदर्भातील एक विचार आजकालच्या तरूणांसाठी अत्यंत मार्गदर्शक आहे. धकाधकीच्या जीवनात आणि स्पर्धेच्या युगात माणसाची जीवनशैली बदलली दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस आणि 'फास्ट फूड' चे सेवन असा दिनक्रम असणाऱ्यांना ते सांगतात-

उपहार-ग्रहे शुक्तं यातयामं च भक्षणम् ।
प्रदीर्घ-निद्रा दिवसे रात्रौ जागरणं भृशम् ॥
धातु-प्रकोपनं देहे जीवनं नियमाऽतिगम् ।
निदानं सर्वरोगाणाम् आयुर्वेदे निरूपितम् ॥

(श्लोक १०, ११, अध्याय १४, ग्रामगीतामृतम्)

त्याचबरोबर ग्रामाचे आरोग्य कसे असावे या संदर्भातही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले आहे. 'ग्रामरक्षणम्' आणि 'ग्रामारोग्यम्' या अध्यायातील त्यांचे विचार अत्यंत कालसंवादी आहेत. सध्याच्या ग्रामसेवकांनी जर अशा पद्धतीने कार्य केले तर खरंचच एक 'आदर्श

ग्राम' निर्माण होईल यात शंका नाही. ज्या देशातील जनता अत्यंत परिश्रम करते त्याच देशाची प्रगती होते हे सांगत असतांना त्यांनी 'श्रमप्रतिष्ठा' या अध्यायात श्रमाचे महत्त्व पटवून दिले आहे -

श्रमप्रतिष्ठा संस्थाप्या व्यवहारे जने जने ।
ग्रामे ग्रामे सुप्रचार्या श्रमनिष्ठा दिने दिने ॥

(श्लोक २६, अध्याय १८, ग्रामगीतामृतम्)

अत्यंत आकर्षक आणि सहज समजेल अशा रचनेचे कौशल्य डॉ.वर्णेकरांना साधले आहे यांतून त्यांच्या कविश्रेष्ठत्वाची प्रचिती येते. पुढे ते म्हणतात -

यत्र सर्वे सुसंपन्नाः सर्वे सम्यक् सुशिक्षिताः ।
सर्वे सर्वो दयापेक्षाः ग्राम आदर्श एव सः ॥

(श्लोक ३९, अध्याय १८, ग्रामगीतामृतम्)

असा 'आदर्श ग्राम' निर्माण झाला तर कोणतेही संकट देशावर आले तरी त्याचा देशाच्या प्रगतीच्या वेगावर यत्किंचितही परिणाम होणार नाही. असेच जणू त्यांना यांतून सुचवायचे असावे.

त्यानंतर अत्यंत महत्त्वाचा विचार ते 'दलितसेवा' या अध्यायात मांडतात. आपणच आपल्या माणसाला अस्पृश्य म्हणतो हे निंदनीय आहे -

अस्पृश्या इति चाऽस्माभिः तुच्छत्वेन तिरस्कृताः ॥
(श्लोक ३०, अध्याय २९, ग्रामगीतामृतम्)
'अस्पृश्यता' हे सहावे महापातक आहे असे देखील ते म्हणतात.
न जातु कलहं कुर्यात् विधर्मीयैर् अकारणम् ।
तथाऽन्य - जाति - पक्षाणां न कुर्याद् दोषदर्शनम् ॥

(श्लोक ४८, अध्याय २९, ग्रामगीतामृतम्)

असे आचरण प्रत्येकाने ठेवले पाहिजे. सर्वांनी जर वरील विचार अंमलात आणायचा ठरविला तर खऱ्या अर्थाने आपण एकमेकांचा आदर करू शकू.

राष्ट्रसंतांसारख्या थोर व्यक्तीच्या विचारांवर अंमल झाला असता तर, सर्वांनीच तो अंगीकारला असता तर कदाचित स्वातंत्र्योत्तर काळातही 'खैरलांजी हत्याकांड' घडलेच नसते.

दलित सेवेसारखे अनेक आजच्या काळातही उपयुक्त असे विचार जसे की, प्रयत्नप्रभावः, जीवन-कलाः, निर्धन-सधनत्वम्, गोवंशसुधारः, संघटनशक्तिः, सेवासामर्थ्यम्, आचार-प्राबल्यम्, ग्रामनिर्माणकला, संसर्गप्रभावः इ. आधुनिक काळात बहुचर्चित विषयांवर यथोचित मार्गदर्शन वरील अध्यायांतून त्यांनी केले आहे. गरज आहे ती फक्त ग्रामगीतेतील हा आधुनिकतावाद अंगिकारण्याची. असे केल्यास नक्कीच 'स्वर्गतुल्य' असा हा भारत देश होईल यात शंका नाही.

समाज-रचना भूयात् समस्त - समताऽन्विता ।
स्यात् स्वयंपूर्णता ग्रामे गृहाऽन्न - वसनाऽऽदिषु ॥
विलीय शोषणं दैन्यं दारिद्र्यं पाप-पंचकम् ।
भजन्तु सकला ग्रामा राष्ट्रेऽस्मिन् स्वर्गतुल्यताम् ॥

(श्लोक ३७, ३८, अध्याय ४१, ग्रामगीतामृतम्)

आधुनिक काळातही या विचारांचे औचित्य असून काळाच्या पलीकडे असणारा हा शाश्वत विचार आहे. अनेक विचारवंतांना, अभिप्रेत, मान्य असाच हा विचार आहे. आपल्या देशाचा सार्थ अभिमान असणाऱ्या प्रत्येक भारतीयाने विचारात घेऊन त्यांपासून प्रेरणा घेऊन जीवनात वाटचाल केली तर खरोखरच भारत हा भूवैकुंठ होईल यात शंका नाही.

या ग्रंथाच्या उपसंहारात डॉ.वर्णेकरांनी ग्रामगीता कशी आधुनिक आहे ते सांगितले आहे

श्रेष्ठा संस्कृतभाषाऽसौ भारतस्य सनातनी ।
तस्याम् अनूदिता प्रेष्ठा ग्रामगीताऽधुनातनी ॥

(श्लोक क्र.५ उपसंहार, ग्रामगीतामृतम्)

ग्रामगीतामृतम् हा अत्यंत मधुर आणि सुलभ असा अनुवाद म्हणजे संस्कृतातील अर्वाचीन साहित्यात मैलाचा दगडच ठरला आहे. यातील एक एक पद्य हे अत्यंत अर्थपूर्ण असून या विचारांवर सखोल अभ्यास करण्याची अत्यंत गरज आहे त्यांमुळेच प्रस्तुत विषयावर भरीव आणि मूलगामी संशोधन होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

***

संदर्भग्रंथसूची :

१) प्रज्ञाभारतीयम् - डॉ. श्री. भा. वर्णेकर.
२) ग्रामगीता - राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज.
३) अर्वाचीन संस्कृत साहित्य - डॉ. श्री. भा. वर्णेकर.
४) संस्कृत साहित्य का विशद इतिहास - डॉ. पुष्पा गुप्ता.
५) संस्कृत साहित्य का इतिहास - डॉ. ए. बी. कीथ.
६) संस्कृत साहित्य का इतिहास - प्रो. हंसराज अग्रवाल.
७) संस्कृत वाङ्मय कोश (द्वितीय खण्ड) - डॉ. श्री. भा. वर्णेकर
८) संकेतस्थळ -www.satyvrat_shastri.net

●●●

मराठी कवितेतील महानगरीय संवेदनशीलता : एक टिपण

डॉ. वसंत पाटणकर



महानगरीय मराठी कवितेत विसाव्या शतकाच्या पाचव्या-सहाव्या दशकापासून काही कवींमध्ये एक वेगळ्या प्रकारची संवेदनशीलता प्रकट झालेली दिसते. ही संवेदनशीलता महानगरीय जीवनाशी निगडित होती. हिलाच 'महानगरीय संवेदनशीलता' म्हटले जाते. तिच्यामुळे मराठी कवितेला एक वेगळे रूप प्राप्त झाले. या नव्या संवेदनशीलतेची पाळेमुळे कोठे आहेत, मराठी कवितेला या संवेदनशीलतेमुळे कोणती नवी परिमाणे लाभली, तिच्यामुळे मराठी कवितेत कोणते प्रश्न निर्माण झाले. यासंबंधीची काही निरीक्षणे या टिपणात थोडक्यात मांडत आहे.

प्रारंभीच हे सांगायला हवे की साहित्याच्या संदर्भात योजली जाणारी 'महानगरीय संवेदनशीलता' ही एक आशयात्म कोटी आहे. तिच्या साहाय्याने विशिष्ट साहित्यकृतीतील आशयाचे, आशयसूत्राचे स्वरूप कोणत्या प्रकारचे आहे, ते स्पष्ट केले जाते. म्हणजेच तिच्याद्वारे या साहित्याकृतीतील आशय व आशयसूत्रे विशिष्ट संवेदनशीलतेचा आविष्कार करतात, असे सांगितले जाते. ही कोटी पूर्णपणे वर्णनात्मक स्वरूपाची आहे. ही मूल्यमापनात्मक कोटी नव्हे. तिच्या साहाय्याने विशिष्ट साहित्यकृतीतील आशय वा आशयसूत्रे यांचा चांगले-वाईटपणा निश्चित करता येत नाही. 'महानगरीय संवेदनशीलते' प्रमाणेच 'ग्रामीण संवेदनशीलता', 'दलित संवेदनशीलता' अशा काही कोटी मराठी साहित्यसमीक्षेत अस्तित्वात आहेत. याही कोटी वर्णनात्मक स्वरूपाच्या आहेत.

महानगरे हे एक आधुनिक घटित आहे. युरोपच्या संदर्भात बोलायचे झाले तर महानगरे ही एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, खरे तर विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकातच अस्तित्वात आली. ही महानगरे भांडवलप्रधान औद्योगिक व्यवस्थेशी संबंधीत आहेत, आणि तिच्या गरजेतूनच ती हळूहळू अस्तित्वात आलेली आहेत. युरोपमधील अठराव्या शतकापासून सुरु झालेल्या औद्योगिक क्रांतीचा ती परिपाक आहेत. आपल्याकडे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस महानगरे निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु झालेली असली, तरी ज्यांना खरोखरीच महानगरे म्हणता येतील, अशी शहरे अस्तित्वात यायला विसाव्या शतकाचे पाचवे-सहावे शतक उजाडले आहे. याच संदर्भात आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी की युरोपमधील साहित्य, कला या क्षेत्रांत निर्माण झालेला आधुनिकवाद महानगरांच्या जन्मकाळाशी संबंधित आहे. मराठी साहित्यातही आधुनिकवादाचे पडसाद विसाव्या शतकाच्या पाचव्या दशकात उमटू लागले आहेत, हे साम्य लक्षणीय आहे.

महानगरातील विशिष्ट परिस्थितीमुळे येथे दीर्घ काळ वास्तव्य करणाऱ्या माणसांची मानसिक घडण बदलते. या विशिष्ट मानसिक घडणीलाच आपण महानगरीय संवेदनशीलता म्हणतो. उदाहरणार्थ, महानगरातील माणसे, इमारती, दुकाने, वाहने इत्यादी गोष्टींच्या गर्दीतून एकाकीपणाची भावना, व्यक्तित्वलोप झाल्याची जाणीव निर्माण होते. या गर्दीमुळे, प्रदूषणामुळे येथे कोणताही मोकळेपणा, अवकाश नसतो. येथे आपुलकी, ओलावा निर्माण होत नसतो तर तुटकपणा, संवादशून्यता, त्रुटितता आणि प्रसंगी अमानुषता पाहावयास मिळते. महानगरातील बहुतांश गोष्टी यांत्रिकतेशी निगडित असल्यामुळे यांत्रिकता, अमानवीकरण, अमानुषपणा, परात्मता या गोष्टींचा अनुभव येथे येतो. किंवा महानगरातील गतिमानता, तेथील घड्याळाच्या काट्यांबरोबर चालणाऱ्या वेगवान जीवनामुळे सततचा ताण, व्यग्रता, अस्वस्थता जाणवत राहते. सारांश, महानगरीय संवेदनशीलतेचे ठळक विशेष सांगयचे तर ते साधारणपणे पुढिलप्रमाणे आहेत : एकाकीपणा, अर्थशून्यता, पोरकेपणा, अमानवीकरण, अमानुषता, बधीरपणा, व्यक्तित्वलोप, परात्मभाव, असंबद्धता, संवादशून्यता, त्रुटितता, तुटकपणा, सततची व्यग्रता, अस्वस्थता, ताण इत्यादी इत्यादी. ही आशयसूत्रे मुख्यत्वे आधुनिकवादी दृष्टीशी संबंधीत आहेत. हे येथे नमूद करावयास हवे.

महानगरात जगणाऱ्या सर्वच लेखकांवर हा परिणाम सारख्याच पद्धतीने आणि सारख्याच प्रमाणात पडतो, असे म्हणता येणार नाही. परंतु महानगरात वास्तव्य करणाऱ्या अनेक लेखकांवर-कवीवर महानगरीय पर्यावरणाचा कमीअधिक संस्कार होतो. या संदर्भात एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी की महानगरात वास्तव करणाऱ्या सर्वच कवींच्या कवितेमधून महानगरीय संवेदनशीलता आविष्कृत झालेली नाही. उदाहरणार्थ, पु. शि. रेगे, शांता शेळके, मंगेश पाडगावकर, वसंत बापट प्रभृती कविकवयित्री. या व अशा अनेक कवींच्या कवितेत अनेकदा महानगरीय अर्थघटक पाहावयास मिळतात, परंतु त्यामुळे त्यांची कविता महानगरीय संवेदनशीलतेचा आविष्कार करते असे म्हणता येणार नाही. महानगरीय संवेदन म्हणजे

कवितेत महानगरीय तपशील येणे, त्यांचे प्राचुर्य असणे नव्हे. हे तपशील फारसे न येताही संवेदन महानगरीय असू शकते. दुसरे असे की, महानरीय संवेदनशीलतेचा आविष्कार हा सामान्यतः आधुनिकवादी किंवा आधुनिकवादाच्या प्रभावाखालील कवींमध्ये अधिक प्रमाणात दिसतो. महानगरीय संवेदनशीलता ही प्रामुख्याने आधुनिकवादी दृष्टीशी निगडीत असल्यामुळे असे घडणे स्वाभविक आहे. अर्थात, काही वेळा रोमँटिक व मानववादी कवींवरही हा प्रभाव पडलेला दिसतो. त्यासंबंधीची चर्चा आपण अखेरीस करणार आहोत.

महानगरीय संवेदनशीलतेची ही रूपे लक्षात घेतली की पठ्ठे बापूरावांची 'मुंबईची लावणी' नगराविषयीच्या स्तिमिततेचा अनुभव व्यक्त करते, महानगरीय संवेदनशीलतेचा नव्हे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी मुंबई हे छोटेसे नगर होते. ते कोणत्याही अर्थाने महानगर नव्हते. आधी म्हटले त्याप्रमाणे मराठी साहित्यात जिला महानगरीय म्हणता येईल अशा संवेदनशीलतेचा आविष्कार विसाव्या शतकाच्या पाचव्या दशकापासून मुख्यतः कवितेतून आणि काही प्रमाणात कथांमधून आणि सहाव्या दशकापासून काही प्रमाणात कादंबऱ्यांमधून झालेला आहे. कवितेमध्ये ही संवेदनशीलता प्रथमतः मर्ढेकरांच्या कवितेतून आविष्कृत झालेली दिसते.

आधुनिक मराठी कवितेत महानगरीय संवेदनशीलतेचा आविष्कार वेगवेगळ्या प्रकारे, वेगवेगळ्या रूपात झाला आहे. भिन्न प्रकृतिधर्माच्या कवींवर महानगरीय संवेदनशीलतेचा परिणाम वेगवेगळ्या प्रकारे होणे स्वाभाविक आहे. कवींच्या महानगरीय वास्तवाला झालेल्या प्रतिक्रियांचे साधारणपणे तीन गट आहेत. यांतील पहिल्या गटातील महानगरीय वास्तवाला झालेली प्रतिक्रिया ही अस्वस्थतेची आहे. येथे या महानगरीय वास्तवात बदलणाऱ्या मानवी जगण्याबद्दलची चिंता, तडफड, आकांत मोठ्या प्रमाणात आहे. दुसऱ्या गटातील प्रतिक्रिया ही या परिस्थितीचे विडंबन करणारी आहे. येथे अनेकदा आत्मविडंबनही पाहावयास मिळते. तिसरी प्रतिक्रिया ही या परिस्थितीबद्दल आकांत व्यक्त करत नाही, किंवा या परिस्थितीचे विडंबनही करत नाही. ती महानगरीय वास्तवामुळे मानवी जीवनात होणाऱ्या बदलांचा, त्यातील वेगवेगळ्या अवस्थांचा वेध घेते. ही अधिक व्यक्तिलक्ष्यी स्वरूपाची प्रतिक्रिया आहे. अर्थात, या तिन्ही प्रतिक्रिया म्हणजे हवाबंद कप्पे नव्हेत, हे स्पष्टच आहे. एकाच कवीत त्यांची सरमिसळही झालेली पाहावयास मिळते. महानगरीय वास्तवाला कवींच्या झालेल्या या तीन प्रतिक्रिया आहेत, महानगरीय संवेदनशीलता प्रामुख्याने या तीन प्रकारे आविष्कृत झाली आहे, एवढेच येथे अभिप्रेत आहे.

महानगरीय वास्तवाविषयीची पहिली प्रतिक्रिया ही मर्ढेकरांच्या कवितेत ठाशीवपणे व्यक्त झाली आहे. ही पहिल्या टप्प्यावरची प्रतिक्रिया आहे. या टप्प्यावर मुख्यतः माणसाच्या यंत्रवत, अमानवी, नगण्य होत जाणाऱ्या जीवनाबद्दलची अस्वस्थता आहे. उदाहरणार्थ, 'सकाळी उठोनी', 'मी एक मुंगी, हा एक मुंगी', 'किती तरी दिवसांत' इत्यादी कवितांमधून ही जाणीव बऱ्याच स्पष्टपणे व्यक्त झालेली आहे. मर्ढेकर काही वेळा 'यंत्रमुग्ध' होतात, 'यंत्रयुगातील नवनृत्य' त्यांना आकर्षित करते. महानगराचे प्रसन्न दर्शनही त्यांना काही वेळा घडते. परंतु हा मर्ढेकरी कवितेचा स्थायीभाव नव्हे. उलट या त्रुटित जीवनात 'सलग जमेना एक भावना' किंवा, 'जेथे जातो तेथे। मी माझा सांगाती' असा संवादशून्यतेचा अनुभव येतो. 'काळ्या बंबाळ अंधारी', 'पंक्चरली जरि रात्र दिव्यांनी', 'जिथे मारते कांदेवाडी' अशा कवितांमधून महानगरातील विरूप, बकाल जीवनाचा, वेगवेगळ्या भीतींचा, काळोखाचा प्रत्यय येत राहतो. या सर्व मानवी अवस्थांबद्दलची 'जिवंत तगमग' त्यांच्या कवितेत दिसते. विंदा करंदीकरांच्या कवितेमधूनही यांत्रिकतेची, परात्मतेची जाणीव व्यक्त होत राहते. भीतीची जाणीवही या कवितेत महत्त्वाची आहे. आधुनिक, महानगरीय माणसाच्या वेगवेगळ्या अवस्था पाहून कवी अस्वस्थ होतो, दुभंगून जातो. याच प्रकारची अस्वस्थता, हताशता वसंत आबाजी डहाके, वसंत दत्तात्रेय गुर्जर प्रभृती पुढील कवीमध्ये पहावयास मिळते. हे सर्वच कवी निखळपणे आधुनिकवादी नाहीत. या जाणिवा व्यक्त करताना ही कविता अनेकदा विनोदाचा, उपरोधाचा आश्रय घेते. तेथे दुहेरी प्रतिक्रिया असते. त्यांतील एक म्हणजे महानगरातील विविध घटितांमधून आपल्या विविध मानसिक अवस्था व्यक्त करणे.

महानगरात माणसाच्या वाट्याला येणाऱ्या विशिष्ट परिस्थितीचे विडंबन करणारी दुसरी प्रतिक्रिया ही कालदृष्ट्या मर्ढेकर-करंदीकरांच्या पुढील टप्प्यावरील आहे. ही प्रतिक्रिया मुख्यत्वे अरूण कोलटकर, सदानंद रेगे यांच्या कवितेत मोठ्या प्रमाणात पाहावयास मिळते. कोलटकरांच्या हॉस्पिटलच्या कवितांमधून या परिस्थितीचा दाहक असा प्रत्यय येतो. येथील पेशंटला नाव-गाव अशी कोणतीच ओळख नाही. त्याची ओळख फक्त आरएच पॉझिटिव्ह अशी आहे. कोलटकरांच्या कवितेत महानगरीय जगणे अनेक निर्जीव परंतु आक्रमक प्रसंगी हिंस्र वस्तूंनी वेढून टाकलेले आहे. पहिल्या टप्प्यावरील यांत्रिकीकरण, एकाकीपण, संवादशून्यता, त्रुटितता, अस्वस्थता ही आशयसूत्रे येथे फारशी प्रभावी नाहीत. तसेच तेथील हताशपणाची, चिंतेची जाणीवही येथे नाही. याउलट येथे व्यक्तित्वलोप, अमानवीकरण, खच्चीकरण, वस्तुवतता, परात्मता ही आशयसूत्रे अधिक प्रभावी आहेत. येथे काही प्रमाणात सिनिकल वृत्ती धारण करून आणि काही वेळा तिरकस विनोदाचा आश्रय घेऊन महानगरातील विदारक मानवी स्थितीवर प्रकाश टाकण्यात आला

आहे. या स्थितीचे विडंबन करण्याकडे कल असल्यामुळे येथे वेगळे भावनिक सूर आले आहेत. भावनात्मकतेला अवरोध करणारी, काहीशी थंडपणाकडे झुकणारी अलिप्तता येथे महत्त्वाची ठरली आहे. कोलटकरांचा उपरोधही मर्ढेकरांच्या उपरोधापेक्षा वेगळा आहे. हा उपरोध आधिक विकट, अधिक दचकावून टाकणारा आहे.

महानगरीय परिस्थितीबद्दलची तिसरी प्रतिक्रिया ही आकांत व्यक्त करत नाही किंवा त्या परिस्थितीचे विडंबनही करत नाही. ही परिस्थिती आपल्या जगण्याच्या एक अटळ भाग मानून तिचा शांतपणे स्वीकार या प्रतिक्रियेत आहे. महानगरातील विविध गोष्टीमधून, घटितांमधून त्यासंबंधीच्या आपल्या वेगवेगळ्या मानसिक अवस्था व्यक्त करण्याकडे कल असल्यामुळे ही कविता अधिक व्यक्तिलक्ष्यी स्वरूपाची आहे. येथे महानगर हे कवीच्या आत्म्याचे रूपक बनते, त्याच्या वेगवेगळ्या आत्मिक अवस्थांचा आविष्कार करते. महानगराच्या महानगरातील विविध गोष्टींच्या चित्रणातून, महानगरातील घटितांच्या अनेक असंगत चित्रांमधून काही आधुनिकवादी आशयसूत्रांचा आविष्कार केला जातो. उदाहरणार्थ, महानगरातील व्यक्तीचे एकाकीपण, संवादशून्यता, तिच्या अस्तित्वाची असंबद्धता, अर्थशून्यता, तिची परात्मता, तिची आध्यात्मिक अस्वस्थता इत्यादी. दिलीप पुरुषोत्तम चित्रे, विलास सारंग, मनोहर ओक प्रभृती कवींमध्ये ही प्रतिक्रिया पाहावयास मिळते.

या नव्या संवेदनशीलतेने मराठी कवितेत आशयाच्या अंगाने काही महत्त्वपूर्ण बदल घडवून आणलेच, परंतु त्याचबरोबरीने कमीअधिक प्रमाणात भाषिक व रूपात्म अंगानेही काही महत्त्वाचे बदल घडवून आणले. या संवेदनशीलतेचा आधुनिकवादी दृष्टीशी संबंध असल्यामुळे असे बदल घडणे अपरिहार्यच होते. येथे काव्य भाषेच्या निषिद्धतेच्या सर्व कल्पना येथे नाकारल्या गेल्या. वेगवेगळ्या क्षेत्रांतील, स्तरांतील भाषा; वेगवेगळ्या भाषिक लयी; नव्या वेगळ्या मिथ्स, प्रतिमा-प्रतीके कवितेत दिसू लागली. प्रतिमांमध्ये संवेदनासंकर होऊ लागला.मुक्तशैलीचा वापर वाढला. कवितेच्या बांधणीची तंत्रे व तत्त्वे यांतही बदल झाला. कविता अतार्किक, दुर्बोध होऊ लागली. उपरोध, विरोध, ताण यांबरोबरीनेच निकटन्यास, संदर्भसंपृक्तता, विरूपीकरण, मुक्त साहचर्य कल्पना अशी काही वेगळी रचनातत्त्वेही महानगरीय संवेदनशीलतेला आविष्कार करणाऱ्या कवितेतून पाहावयास मिळू लागली.

या टिपणात ज्या आधुनिकवादी आशयसूत्रांचा पुन्हा पुन्हा उल्लेख केला त्यांतील काही आशयसूत्रे आविष्कृत करणारी आणि महानगरीय संवेदनशीलतशी निगडीत असलेली अशी रोमँटिक व / वा मानववादी वळणाची कविताही मराठीत काही प्रमाणात पाहावयास मिळते. येथे प्रामुख्याने महानगरातील एकाकीपण, तुटलेपण, संवादशून्यता, नगण्यत्व ही आशयसूत्रे प्रभावी असलेली दिसतात. उदाहरणार्थ, गुरुनाथ धुरी, शरद साटम प्रभृती रोमँटिक कवी किंवा सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ यांसारखे मानववादी कवी. ही रोमँटिक व/वा मानववादी वळणाची अभिव्यक्ती असल्यामुळे तिच्यातील या विशिष्ट आशयसूत्रांना कमीअधिक वेगळे अर्थ प्राप्त होतात, हे स्पष्टच आहे. परंतु ही संवेदनशीलता वेगळ्या प्रकारे का होईना महानगरीय स्वरूपाची म्हणता येते. कारण काळसेकर, नामदेव ढसाळ या मानववादी कवींवर आधुनिकवादी दृष्टीचा काही प्रमाणात प्रभावही आहे. परंतु आधुनिकवादी दृष्टीचा कोणत्याही प्रकारे प्रभाव नसलेल्या आणि महानगरीय वास्तवाशी निकटचा संबंध असलेल्या नारायण सुर्वे यांसारख्या कवीबाबत काय करावयाचे? त्यांच्या कवितेत महानगरी वास्तव आणि त्यासंबंधीच्या विविध जाणिवा मोठ्या प्रमाणात आविष्कृत झाल्या आहेत, हे स्पष्टच आहे.

महानगरीय संवेदनशीलतेची पाळेमुळे कोणत्या ऐतिहासिक परिस्थितीत व दृष्टीत आहेत, हे आपण पाहिले. ही ऐतिहासिक परिस्थिती व दृष्टी आणि महानगरीय संवेदशीलतेची महत्वाची वैशिष्ट्ये लक्षात घेतली, तर महानगरीय आशय व्यक्त करणाऱ्या सर्वच कवींना या अर्थाचे महानगरीय संवेदनशीलतेचे कवी म्हणता येणार नाही. 'महानगरीय संवेदनशीलता' ही वर्णनात्मक कोटी असल्यामुळे खरे तर याविषयी वाद असण्याचेही कारण नाही. परंतु काही समीक्षक महानरीय संवेदनशीलतेचा आविष्कार करणाऱ्या कवींमध्ये नारायण सुर्वे प्रभृती परिवर्तनवादी कवींचाही समावेश करतात. हे करावयाचे झाल्यास आपल्याला अर्थातच 'महानगरीय संवेदनशीलता' या संकल्पनेचा विस्तार करावा लागेल. वर सांगितलेल्या मराठी कवितेच्या संदर्भातील तीन प्रतिक्रियांमध्ये या वास्तवाला प्रश्न विचारणारी, जाब विचारणारी प्रतिक्रिया अशी भरही घालावी लागेल. असे झाल्यास नारायण सुर्वे यांच्याबरोबरीनेच नामदेव ढसाळ आणि अन्य काही दलित कवींनाही या चौथ्या प्रतिक्रियेची महानगरीय संवेदनशीलता व्यक्त करणारे कवी म्हणता येईल.

१९९० नंतर लिहिल्या जाणाऱ्या कवितेतही महानगरीय संवेदनशीलतेचा आविष्कार झालेला आहे. श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, मंगेश नारायण काळे, वर्जेश सोलंकी, संजीव खांडेकर, मन्या जोशी प्रभृतींच्या कवितेत ही संवेदनशीलता आविष्कृत झाली आहे. मूलतः आधुनिकवादाच्या प्रभावाखाली महानगरीय संवेदनशीलता येथे दिसून येते. मात्र या वास्तवाबद्दल हे नवे काही भूमिका घेतात किंवा नाही, हे या कवितांमधून पुरेसे स्पष्ट होत नाही. येथे आकांत नाही. विडंबन नाही किंवा परिस्थितीचा सामंजस्यपूर्वक, परंतु नाईलाजाने केलेला स्वीकारही नाही. मुख्य म्हणजे मर्ढेकर-कोलटकर-चित्रे-सारंग यांच्या

कवितेत महानगरीय अनुभवांतून पलीकडे जाण्याची जी क्षमता दिसते. ती येथे जवळपास दिसत नाही. अधूनमधून काही कवींचा आणि काही कवितांचा अपवाद वगळता ही कविता प्रायः महानगरीय तपशिलांमध्येच गुंतून पडल्याचा प्रत्यय येतो.

पहिल्या टप्प्यावर निर्माण झालेली महानगरीय संवेदनशीलतेची कविता ही मराठी काव्यपरंपरेत वेगळी आणि प्रभावी असल्यामुळे ही कवितेची मध्यवर्ती धारा ठरते. या कवितेत कवितेला नवी परिमाणे प्राप्त करून देणारी प्रयोगशीलता अधिक प्रमाणात असल्यामुळे तिला हे स्थान प्राप्त झाले असावे. या कवितेला केंद्रस्थानी आणण्यासाठी काही हेतुपूर्वक प्रयत्न केले गेले होते, असे चित्र दिसत नाही. सत्यकथा नियतकालिक आणि अनियतकालिकांची चळवळ यांनी स्वंत्रपणे वा संयुक्तपणे या दिशेने काही प्रयत्न केल्याचे पाहावयास मिळत नाही. निदान उघडपणे तरी असे घडल्याचे दिसत नाही. हे चित्र १९५० पासून जवळपास १९८० पर्यंत पाहावयास मिळते. नंतरच्या दोनेक दशकांमध्ये हे चित्र बदलताना दिसत होते. महानगरीय संवेदनशीलतेची कविता ही केंद्रस्थानी आणि इतर कविता परिघाच्या आसपास हे चित्र पुसले जात होते. परंतु गेल्या पाचदहा वर्षांत पुन्हा एकदा महानगरीय कविता केंद्रस्थानी आणण्याचे प्रयत्न हेतुपूर्वक केले जात आहेत. हे नोंदवणे आवश्यक आहे.

(या प्रतिक्रियांची मांडणी अन्यत्र केली आहे. पाहा : स्वातंत्र्योत्तर मराठी कविता : १९४५-६० येथे महानगरीय संवेदनशीलतेच्या संदर्भात त्यांची मांडणी कमीअधिक वेगळ्या स्वरूपात करत आहे.)

●●●

स्वातंत्र्योत्तर मराठी दलित कविता

डॉ. मनोहर जाधव



= १ =

‘स्वातंत्र्योत्तर मराठी दलित कविता’ असा विषय मला देण्यात आला आहे. खरं तर दिलेल्या शब्दमर्यादेत या निबंधाची मांडणी सहजपणे करता येण्यासारखी नाही. प्रबंधलेखनाचा विषय निबंधासाठी निवडणं हे अतिव्याप्त आहे. या विषयाच्या अनुषंगाने काही प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाले. एक तर हा अर्धशतकाचा काळ आहे. या काळातील दलित कवितेसंबंधी विवेचन करताना दोन धोके संभवतात. एक तर हे विवेचन वर्णणात्मक होऊ शकेल नाहीतर आढाव्याच्या स्वरूपात होऊ शकेल, तसे केल्याने विषय पसरट होण्याची शक्यता आहे. निरीक्षणे नोंदवली तर त्यात अभिप्रेत सूक्ष्म विश्लेषन येईलच असेही नाही. तरी यासंदर्भात फक्त काही मुद्दे समोर ठेवतो.

= २ =

१९७० नंतर दलित कवितेने आपला ठसा उमटवला. आपले वेगळेपण नोंदवले. नामदेव ढसाळ, यशवंत मनोहर, दया पवार, केशव मेश्राम अशी कितीतरी नावे या संदर्भात घेता येतील. ही नावांची यादी खूप वाढवता येईल. मग अमुक एका कवीचे नाव का नाही, असाही प्रश्न समोर येईल. परंतु नावांच्या यादीपेक्षा या काळात जी कविता लिहिली गेली तिची मूलत: प्रकृती कोणती होती आणि त्याची कारणे काय असावी, हा विचार करणे गरजेचे आहे. या कवितेच्या मूळाशी जो जीवनानुभव होता, तो मला महत्त्वाचा वाटतो. अभावग्रस्त, अपमानास्पद जीवन वाट्याला आलेले हे कवी होते, एका अर्थाने ते समाजव्यवस्थेचे बळी होते आणि आत्यंतिक संवेदनशीलतेमुळे ते अस्वस्थ झाले होते. लेखनाची त्यांची परंपरा नव्हती, मात्र ते त्यांच्या पद्धतीने अभिव्यक्त होऊ पाहत होते. या अभिव्यक्तीमध्ये साचलेपणातून बाहेर पडण्याची धडपड होती. आपण कशा प्रकारे अभिव्यक्त व्हावे हा प्रश्न नव्हता तर अभिव्यक्त होणे ही गरज होती. त्यामुळे ज्या जीवनशैलीतून, भाषासंस्कारातून हे कवी आले होते, ती सगळी वैशिष्ट्ये त्यांच्या कवितेतून प्रकट झाली. काही काळ खळबळ उडाली, टीकाटिप्पणी झाली मात्र नंतर ही कविता स्थिर झाली. मान्यता पावली. तिने स्वत:चे वेगळे वळण मराठी साहित्यात नोंदवले. प्रस्थापित कवितेची चौकट मोडली. चौकट मोडण्यासाठी ही कविता लिहिली गेली नाही, हे इथे ध्यानात घ्यावे. अभिव्यक्तीच्या अपरिहार्य गरजेतून ही निर्मिती झाली आहे, त्यामुळे त्यावर केवळ निसटते भाष्य करणे हे पुरेसे ठरणार नाही तर त्या कवितेच्या अवतीभवतीचा सामाजिक - सांस्कृतिक अवकाश पारखून घेतला पाहिजे.

= ३ =

दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आणि चळवळ आहे. हे आता नव्याने सांगण्याची गरज नाही. डॉ. आंबेडकरांच्या विचाराने आत्मशोध घ्यायला प्रवृत्त झालेल्या कलावंत मंडळींनी आपल्या भावनेचा, विचारांचा आविष्कार केलेला दिसतो. विचारांची स्पष्टता हा बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचा एक पैलू आहे. या पैलूंचे प्रकटीकरण मराठी दलित कवितेत फार रसरशीतपणे समोर येते. प्रारंभीच्या काळातील किंवा अगदी अलिकडच्या काळातील कवितासंग्रहांची शीर्षके जरी आपण नजरेखाली घातली तरी आपल्या लक्षात येईल की या सर्व काव्य व्यवहारामागे निश्चित भूमिका आहे आणि या भूमिकेत एक प्रामाणिकपणा आहे. मानवी मूल्यांची पाठराखण, आत्मसन्मानाचा आग्रह दलित कवितेने समोर ठेवला. आपल्या आविष्कारात प्रयोगशीलता असायला हवी असे काही या कवींनी योजलेले नाही. थेट व्यक्त होणे आणि आपल्या पद्धतीने व्यक्त होणे ही या कवींची गरज होती आणि ती तशी कवितेतून व्यक्त झाली आहे.

संघर्ष आणि विद्रोह हा दलित कवितेचा स्थायीभाव आहे. कारण दलित कवी हा केवळ कवी नाही तर तो एक कार्यकर्ताही आहे. जगण्याच्या रोजच्या लढाईत तो ओढला गेला आहे. जाणीवपूर्वक तो परिवर्तनाच्या चळवळीशी जोडला गेला आहे. व्यवस्था बदल त्याला अभिप्रेत आहे. सर्व प्रकारचे शोषण तो निषिद्ध मानतो. शोषणाचे गौरवीकरण करीत नाही. शोषणमुक्त समाजाचे जे स्वप्न बाबासाहेबांनी पाहिले, त्याचा तो शिलेदार आहे. जात, वर्ग, धर्म, लिंग, पंथ इ. गोष्टींमुळे भारतीय जीवनात जी शोषणविकृती निर्माण झाली तिच्याविरूद्ध भूमिका घेणारा हा कवी आहे.

= ४ =

प्रारंभापासून ते आतापर्यंत दलित कवितेची पाहणी केली तर असे दिसते की, प्रारंभी ज्वालाग्राही विद्रोह आणि नकाराची मांडणी करणारी ही कविता व्यवस्था - शोधाबरोबर आत्मविश्लेषणाकडे प्रवृत्त होऊ लागली. विषम समाजव्यवस्थेवर हल्ला हे सूत्र मात्र कायम राहिले. तरीही आपल्यां चळवळीतील आणि जगण्यातील अंतर्विरोध तिने दुर्लक्षित केला नाही. दलित कविता ही आक्रस्ताळी, ऊरबडवी आणि काव्यमूल्य नसलेली कविता आहे अशी टीका या कवितेवर नेहमीच होत आलेली आहे. आक्रस्ताळेपणा आणि आक्रमकपणा, स्थितीशीलता आणि परिवर्तने, आक्रोश आणि विद्रोह यातील फरक आपण लक्षात घेतला तर वरील टीकासूत्राचे विश्लेषण करता येऊ शकेल नव्हे अनेक अभ्यासकांनी ते केले आहे. जगण्यातील प्रश्न आणि त्याा प्रश्नांचा रेटा जसा वाढत गेला तसा दलित कवितेचा स्पष्ट परंतु उग्र चेहरा समोर येत गेला. १९७० ते १९८०, १९८० ते २००० आणि त्यानंतर या काळातील ठळक आणि प्रतिनिधीक व कवींच्या कवितेतून समकालीन प्रश्नांची धग प्रकट झाली. हे समकालीन प्रश्न अनेक पदरी आणि बहुव्यापी होते. त्या त्या कवीच्या प्रकृती वैशिष्ट्यामुळे अभिव्यक्तीत निराळेपण जाणवत असलेतरी मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना हे विचारसूत्र नजरेआड झाले नाही. अगदी ढसाळ, मनोहर यांच्यापासून भुजंग मेश्राम, प्रज्ञा पवार, अरूण काळे, लोकनाथ यशवंत, महेंद्र भवरे, शशिकांत हिंगोणेकर, अविनाश गायकवाड यांच्यापर्यंत हे सूत्र कायम दिसते. अनुभव स्वीकारण्याचा, चिंतनाचा आणि त्यावर भाष्य करण्याचा प्रत्येक कवीचा निराळा पिंड आहे. जातीव्यवस्थेचे बदलते स्वरूप असो वा जागतिकीकरणाने निर्माण झालेले प्रश्न असो, हे कवी अंग चोरून उभे राहिले नाहीत, राहू शकत नाहीत. समाजवास्तवाला भिडण्याची एक अपरिहार्य जीवनशैली वाट्याला आली हे जरी एक कारण असले तरी त्या सबंध परिप्रेक्ष्यात जाणीवपूर्वक भूमिका घेणे हे या कवींचे वैशिष्ट्य राहिलेले आहे. मानवी जीवनातील कुरूपता आणि आकांत दलित कवितेने अधोरेखित केला, त्यामुळे ही केवळ दलित कविता राहिली नाही तर खऱ्या अर्थाने ते मराठी कवितेने एक वैशिष्ट्यपूर्ण वळण घेतलेले आहे.

= ५ =

दलित कविता एका आवर्तात सापडली आहे, अशी हाकाटी अधूनमधून कानावर येते. संपूर्ण अर्धशतकातील ही कविता पाहिली तर अनेक कवींच्या जीवनानुभवातील साम्य म्हणजे आवर्त नव्हे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. आशय - आविष्कारामधील कोंडी आणि नाविण्याचा अभाव यामुळे आवर्त निर्माण झाले असे वाटत असले तरी या कोंडीला फोडण्याचे काम दलित कवींनीच सातत्याने केले आहे, हेही नजरेआड करता येणार नाही. 'गोलपिठा' ते 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' किंवा 'रॉकगार्डन' ते 'ग्लोबलचं गावकुस' अशीही पाहणी आपल्याला करता येण्यासारखी आहे. एखाद्या ठळक कवीच्या काव्यप्रवासाचा आलेख जसा तपासता येऊ शकतो. म्हणजे मनोहर - मेश्रांमापासून लोकनाथ यशवंत पर्यंतची कविता तपासली तरी मधल्या डझन - दीड डझन कवींच्या संदर्भासह निरीक्षणे नोंदवून निष्कर्ष काढता येतात. नामांतर आंदोलन ते खैरलांजीमधील हत्याकांड अशा अस्वस्थ आणि दाहक सामाजिक घटनांना या कवितेने केवळ स्पर्श केला नाहीतर त्याबाबत जागरूकतेची आणि ठोस निषेध नकाराची कणखर भूमिका घेतली आहे. या अर्थाने ही कविता सातत्याने परिवर्तनसन्मुख राहिली आहे आणि हे या कवितेचे बलस्थान आहे.

= ६ =

टोकदार भाषा आणि अर्थपूर्ण प्रतिमासृष्टी ही सर्वच ठळक कवींच्या कवितेत प्रत्ययास येते. अगदी ढसाळांपासून - काळेपर्यंत हे लख्खपणे नजरेस पडते. भाषिक अभिनिवेश आणि नटवेपणा या कवींनी जाणीवपूर्वक अव्हेरला आहे. काय म्हणायचे किंवा सुचवायचे आहे हे या कवींनी नीट समजून घेतले आहे. त्यामुळे वाङ्मयबाह्य लाभाकडे हे कवी धीटपणे पाहू शकतात. पुरस्कार, सन्मान हे अनुषंगिक असून ते कधीही ध्येयसाध्य असू शकत नाही, ही स्वच्छ जाणीवही त्यांच्याकडे आहे. म्हणूनच 'गोलपिठा' ते 'ग्लोबलचं गावकूस' एवढा देखणा दीर्घ पल्ला या कवितेने अधोरेखित केला आहे.

●●●

हिन्दी दलित साहित्य के सरोकार
(विशेष संदर्भ : नई पीढ़ी की दलित कहानियाँ)

डॉ. बजरंग बिहारी



दलित साहित्य की पहचान उसके सरोकारों से बनी, कलागत वैशिष्ट्य का मसला यहाँ प्रमुख नहीं रहा। दलित साहित्य का केंन्द्रीय सोकार है विषमतापूर्ण समाज व्यवस्था और इस सरोकार से उद्‌भूत उसका मकसद है समतामूलक शोषणविहिन जनतांत्रिक समाज व्यवस्था की स्थापना। दलित साहित्य का वैचारिक आधार फुले - अम्बेडकर के समाज - दर्शन से निर्मित है। उसकी सक्रियता जिन इरादों के साथ है उनमें ब्राह्मणवाद का समूल विनाश, मानवीय गरिमा की प्रतिष्ठा, आर्थिक, धार्मिक, राजनीतिक ... सभी तरह के शोषण - उत्पीड़न का खात्मा मुख्य है। महात्मा फुले व डॉ. अम्बेडकर से प्रेरणा लेते हुए दलित साहित्य मानता है कि सामाजिक जड़ता का सबसे बड़ा कारण है धर्म की जकड़बंदी। इस जकड़बंदी पर वह हर दिशा से आघात करना चाहता है। धर्म उसके लिए और कुछ नहीं, ब्राह्मणशाही का ही दूसरा नाम है। इस ब्राह्मणशाही में उसे पद दलित किया गया, पग - पग पर यातनाएं दी गईं, मूढ़मति बनाए रखने के लिए अनंत तरीके ईजाद किए गए। ब्राह्मणशाही के प्रति अगाध घृणा और असीम क्रोध इसीलिए दलित साहित्य में दिखाई पड़ता है। आलोचक कई बार इस आधारभूत कारण पर ध्यान न देकर आरोप लगा देते है कि दलित साहित्य ब्राह्मण - मात्र के खिलाफ है, जाति - व्यवस्था के नहीं। वह ब्राह्मणशाही को समाप्त कर अपना वर्चस्व स्थापित करना चाहता हैं। जाति संरचना को तोड़ने में उसकी कोई रूचि नहीं है। हड़बड़ी के शिकार कुछ दलित लेखक इस आरोप को पुष्ट करने के सबूत भी मुहैय्या करा देते है। ऐसे लेखक बहुधा एक मनुवाद से निजात पाने के प्रयास में दूसरे 'मनुवाद' को समर्थन देने लगते हैं। लेकिन, दलित चेतना की मूल चिंता सभी तरह के मनुवादों से छुटकारा है और सच्ची समता की हर संभव स्थापना है।

इस मुख्य सरोकार के अलावा दलित साहित्य के अन्य सरोकारों को कुछ इस क्रम में रखा जा सकता है :

क) आंतरिक जातिवाद का प्रश्न दिन्दी दलित साहित्य में प्रमुखता से उभरा है। आंतरिक जातिवाद का अर्थ है दलित जातियों के मध्य मौजूद ऊँच-नीच की भावना। आंतरिक जातिवाद पर व्यवस्थित बहस ओम प्रकाश वाल्मीकि की कहानी 'शवयात्रा' के प्रकाशन से शुरू हुई। 'शवयात्रा' कहानी का कथ्य मात्र इतका है कि वाल्मीकि जाति के प्रति जाटव समुदाय का नजरिया गैरबराबरी का है। इस कहानी पर हिन्दी दलित साहित्य में मिश्रित प्रतिक्रियाएं हुई। कुछ लोगों ने इसे जाति - व्यवस्था को तोड़ने में सहायता करने वाली रचना माना तो कुछ दलित लेखकों का कहना था कि आंतरिक जातिवाद का प्रश्न उठाकर ओम प्रकाश वाल्मीकि दलित एकता में दरार डाल रहे हैं। यह सारी बहस सूरजपाल चौहान के आत्मकथन 'तिरस्कृत' में दर्ज है। सूरजपाल चौहान दूसरे ऐसे दलित लेखक हैं जो आंतरिक जाति समस्या को अपनी रचनाओं में उठाते रहे हैं। आंतरिक जातिवाद का सवाल अभी भी ज्वलंत विवाद का बिन्दु बना हुआ है।

ख) पितृसत्ता का सवाल भी दलित साहित्य के उल्लेखनीय सरोकारों में गिना जाने लगा है। शुरू में इस मुद्दे पर प्राय: चुप्पी रही। शायद यह माना गया हो कि स्त्री शोषण का मुद्दा उठाने से जाति का मुद्दा कमजोर पड़ जाएगा। असल में, स्त्री - उत्पीड़न के मसले पर दलित - लेखन में जागरूकता तब आई जब स्वयं दलित स्त्रियों ने अपने तिहरे शोषण का प्रश्न उठाया। दलित लेखों के एक ऐसे वर्ग को दलित स्त्रियों ने चिह्नित किया जो स्त्री को उसी निगाह से देखते हैं जिस निगाह से एक सवर्ण पुरुषवादी। जिन रचनाकारों ने दलित स्त्री का सवाल उठाया उनमें रजनी तिलक, विमल थोरात, कौशल्या बैसंत्री, सुशीला टाकभौरे, अनिता भारती, प्रोमिला, उपासना गौतम के नाम विशेष रूप से लिए जा सकते हैं।

ग) मार्क्सवाद के संबंध में दलित - लेखन का रवैया कैसा हो यह बहस भी हिन्दी दलित साहित्य में उठी। एक पक्ष ने दलितवाद को मार्क्सवाद की अगली कड़ी के रूप में देखा तो दूसरे ने मार्क्सवाद से दलित - लेखन के किसी भी तरह के सकारात्मक संबंध से इनकार किया। इन दोनों पक्षों से अलग एक तीसरा पक्ष भी है जो मार्क्सवाद का संतुलित विश्लेषण करता है। उसकी निगाह में मार्क्सवाद एक दर्शन के रूप में दलित साहित्य के लिए प्रेरणादायी हो सकता है लेकिन भारतीय मार्क्सवादियों को आत्मालोचन करने की बहुत जरूरत है। यहाँ के मार्क्सवादियों की कथनी करनी में जो भेद पाया जाता है उसे पाटे बिना मार्क्सवाद की स्वीकार्यता संदिग्ध रहेगी। 'दलित साहित्य का सौन्दर्यशास्त्र'

नामक पुस्तक में ओमप्रकाश वाल्मीकि लिखते हैं : ''दलित साहित्य न मार्क्सवाद का विरोधी है, न जनवाद का। दलित रचनाकार उस दोहरी मानसिकता का विरोधी है जो बाहर से मार्क्सवादी, साम्यवादी और भीतर से फासिस्टों की पक्षघर है। शोषणविहीन समाज की परिकल्पना को साकार करने के लिए मार्क्सवादी विचारक 'वर्ग' के साथ 'वर्ण' को अपनी लड़ाई का लक्ष्य बनाने में ढुलमुल क्यों हैं? भारतीय समाज में वर्ण एक सच्चाई है जिसने सदियों से इस देश के जनमानस को सिर्फ टुकड़ों में ही नहीं बांटा, उनके मानवीय सरोकारों को भी छिन्न - भिन्न किया है। भारतीय मार्क्सवादी, प्रगतिवादी, जनवादी इस सच्चाई से कब तक मुंह मोड़े रहेंगे?''

घ) पिछले कुछ वर्षों से दलित - लेखन में एक नया सरोकार और जुड़ा है। वह है वैश्वीकरण, उदारीकरण तथा निजीकरण का। दलित साहित्यकार आमतौर पर ऐसा मानते हैं कि वैश्वीकरण की जो प्रक्रिया आँधी की तरह इन दिनों चल रही है वह दलित तबके के हित में नहीं है। पूंजीवाद तथा नवसाम्राज्यवाद अंततः पूरी मनुष्यता के शत्रु हैं। उन से लेखन तथा आंदोलन के जरिए संघर्ष करना आवश्यक है।

II जब भी दलित - लेखन की बात की जाती है तो सबसे ज्यादा चर्चा आत्मकथनों की होती है। कई बार ऐसा लगता है कि दलित रचनाकारों की एकमात्र विधा आत्मकथन ही है। आत्मकथा लेखन को क्योंकि आसान मान लिया गया है इसलिए अक्सर इन चर्चाओं के पीछे ऐसा भाव छुपा होता है मानो दलित लेखक रचनात्मक आत्म संघर्ष से, सृजन की संश्लिष्ट प्रक्रिया में उतरने से बचना चाहते हैं और सीधा - सरल रास्ता अख्तियार करते हैं। जबकि वास्तविकता यह है कि दलित कलमकारों की अभिव्यक्ति सर्वाधिक कविता में और फिर कहानी में हुई है। कथ्य और शिल्प दोनों ही स्तरों पर नयापन होने से दलित कविता और दलित कहानी की विशिष्ट पहचान बनी है और पारंपरिक कविता, कहानी से भिन्न घरातल पर, भिन्न प्रतिमानों से इसका मूल्यांकन अपेक्षित है।

हिन्दी के दलित कहानीकारों की वरिष्ठ पीढ़ी में ओम प्रकाश वाल्मीकि, मोहनदास नैमिशराय, सूरजपाल चौहान, जय प्रकाश कर्दम, बुद्धशरण 'हंस', कुसुम मेघवाल... के नाम विशेष उल्लेखनीय हैं तो नई पीढ़ी में पूरनसिंह, अनिता भारती, रजतरानी 'मीनू', रजनी दिसोदिया, सुमित्रा मेहरोल, टेकचंद, मुसाफिर बैठा, मुकेश मानस, सूरज बड़त्या, राज वाल्मीकि तथा शीलबोधि... के नाम लिए जा सकते हैं। इन दोनों पीढ़ियों के बीच भी एक पीढ़ी सक्रिय है। इस अति संक्षिप्त टिप्पणी में हमारी मुराद युवतर पीढ़ी द्वारा रचित और हाल में प्रकाशित कुछ कहानियों की चर्चा के जरिए हिन्दी दलित - लेखन के वर्तमान परिदृश्य को समझने की कोशिश करना है।

दलित कहानीकारों की नई पीढ़ी से हम क्या उम्मीद करते हैं? इस प्रश्न से प्रस्तुत चर्चा की शुरूआत करना शायद बेहतर हो। लेकिन, स्वयं इस प्रश्न में कई पेंच हैं। प्रश्न में आया 'हम' कौन है? सामान्य या जागरूक (गैर दलित) हिन्दी पाठक? कथा - आलोचक? दलित बुद्धिजीवी? जाति विरोधी कार्यकर्ता? दलित पाठक और आंदोलनकर्मी? इनमें से हर एक की उम्मीद, कसौटी और आकलन अलग - अलग होंगे। फिर, ऐसा प्रश्न करके क्या नए कहानीकारों पर बेजा दबाव नहीं बनाया जा रहा? जो कहानियां लिखी जा रही हैं उनका विश्लेषण हाना चाहिए अथवा अपनी रूचि के अनुरूप कहानी की मांग? और यह भी कि, हर कहानीकार की अपनी दृष्टि है, सरोकार है। उन सबको एक ही कसौटी पर कसना क्या रचना - कर्म की विशिष्टता के साथ नाइंसाफी नहीं?...

अपनी अपेक्षा को कहानी की तकनीक के संदर्भ में पेक्ष किया जाए तो संभवतः विवाद से बचा जा सकता है। दलित कहानी अपनी अभिव्यक्ति, कथ्य और शैली में जहां तक आ चुकी है नया दलित कहानीकार उसे अभिनव आयाम दे, विषयवस्त चिरपरिचित होते हुए भी वह अपनी रचनात्मकता में उन अवलोकन बिंदुओं की तलाश करे जहां से सच के सर्वथा नए पहलू दिखाई दें। पूर्ववर्ती कहानीकारों द्वारा जो फार्मूला ईजाद किया गया है, कथा लेखन का जो आसान ढांचा खड़ा किया गया है उसकी सीमाओं को पहचानना बहुत जरूरी है। सीमाओं को पहचानने के बाद ही उसे तोड़ सकने की, परे जाने की गुंजाइश बनती है। यह समझना आवश्यक है कि कोई भी कथ्य अपने - आप प्रभावशाली नहीं हो जाता। कथ्य को प्रस्तुत करने का तरीका इसमें निर्णायक भूमिका अदा करता है। इसके 'तरीके' को ही सुविधा के लिए शैली कहा जाता है। शैली के प्रति उदासीनता या अरूचि का भाव कथा - लेखक के लिए ठिक नहीं। सामाजिक आंदोलनों से जुड़े लोग अक्सर ऐसी उदासीनता प्रदर्शित करते मिल जाते हैं। दलित आंदोलन लेखक और कार्यकर्ता के बीच किसी विभाजक रेखा को न मानने का आग्रही हैं। असल में, महाराष्ट्र को ध्यान में रखा जाए तो इस आग्रह का व्यावहारिक आधार समझा जा सकता है। दलित पैंथर के लगभग सभी कार्यकर्ता रचनाकार थे। इनमें से कुछ - एक बाद में उच्च कोटि के कवि के रूप में प्रतिष्ठित हुए। 'गोलपिठा' (नामदेव ढसाल का चर्चित काव्यसंग्रह) एक आंदोलनकर्मी की ही गुस्सैल अभिव्यक्ति है। कुछ ऐसा ही कर्नाटक के दलित - संघर्ष - समिति के संदर्भ में दिखाई पड़ता है जहाँ लेखक और कार्यकर्ता की भूमिकाएं एक ही व्यक्ति निभाता है। लेखक और कार्यकर्ता के फर्क को अवश्यंभावी न मानने के बावजूद

इस प्रसंग में इतना अवश्य जोड़ा जा सकता है कि शुरू में भले ही एक व्यक्ति दोनों भूमिकाएं निभाता हो परंतु बाद में प्राय: कार्यकर्ता अपनी राह पकड़ता है और रचनाकार अपनी।

तो क्या पूर्वोत्तर में ही ऐसी स्थिती है? क्या बिहार, दिल्ली या यू.पी. में यह नहीं हो रहा, जहाँ बच्चों का दिनदहाड़े अपहरण का फिरौती मांगी जाती है। न मिलने पर हत्या तक कर दी जाती है। या देश की राजधानी दिल्ली की नाक के तले जहां राजनेता बन्दूकों के साए में चलते हैं! . . . यह है दर्द जिसे भारत की मुख्यधारा पूर्वात्तर से साझा कर सकती है और इन्हें अपना बना कर कुछ भाईचारा बढ़ा सकती है। केवल व्यापार बढ़ाने या अपनी भाषा-संस्कृति थोपने के लिए ही लालायित मत रहिए। चूंकि यहाँ लोग ईसाई होने के बावजूद अपनी संस्कृति कायम रखे हुए हैं। वे नाचते हैं, गाते हैं। मातृसत्ता कायम है मेघालय में। विश्व का सबसे पुराना जनतंत्र भी मेघालय में ही था। माँ के चूल्हे के इर्द-गिर्द बैठकर लड़कियाँ अपने मन से विवाह कर सकती हैं-विधवा विवाह हो सकता हैं, तलाक भी हो सकते हैं, यदि पति ठीक न हो। औरतों को यह आजादी मिलना क्या पश्चिमी सभ्यता है? क्या हमारे संविधान में इन सब के लिए प्रवाधान नहीं किए गए हैं? यह प्रगति है, पश्चिम का दबदबा नहीं। अगर पश्चिम से भी कोई अच्छा विचार आया है तो उसे लेना श्रेयस्कर माना जाना चाहिए। भारत के दूसरे हिस्सों में भी दलित, पिछड़ी जातियों में तलाक की छूट पहले से ही प्रचलित है। केवल हिन्दू अभिजात संस्कृति इसकी इजाजत नहीं देती। कितने दिन ढोएंगे हम मनु को? पूर्वोत्तर में मनु नहीं

है। वहाँ औरतें न कभी सती होती थी और न ही बाल-विवाह होते थे। यहाँ औरत भी हल जोतती है। ये तो हमारे शेष भारत के लोग हैं जिन्हें इनसे आकर जिन्दगी जीने का सलीका सीखने की दरकार है। पूर्वोत्तर के घर-घर में करघे हैं, औरतें स्वावलंबी हैं, लोग कपड़ा खुद बुन कर पहनते हैं और हमारे कपड़े विदेशों के न हों तो हमारी प्रतिष्ठा में कमी आ जाती है।

ये हमारा धर्म और हमारी तरह जात-पात, छुआछात अथवा भेदभाव को नहीं मानते। उसे अपनाना भी नहीं चाहते। विडम्बना यह है कि हमने इन पर संविधान में भी 'जनजाति' शब्द थोप दिया जबकि इनकी कोई जाति ही नहीं है। ये आपके धर्म को नहीं जानते तो क्या हुआ? जो हिन्दू नहीं है क्या वह पश्चिम का है? हमारे जैसे नैन नक़्श नहीं हैं इनके पास, तो क्या इसलिए ये जंगली और असभ्य माने जाएंगे, क्या यह उचित है? हमारी जात-पात व भेदभाव भरी संस्कृति अपनाने से तो अच्छा है लोगों का असभ्य रहना, जंगली रहना। कम-से-कम वहाँ बराबरी तो है।

पूर्वोत्तर के सिक्किम का कवि देश की सीमाएँ पार कर रंग भेद की दहलीजें लांघ कर पहुँच जाता है, मनुष्य के उद्‌गम स्थल अफ्रीका में, जहाँ पहला मनुष्य जन्मा था-

''हाँ मैं समुद्रों को छोड़कर आ गया हूं
तुम्हारे नगाड़े सुनने
आदम के पैरों के निशान तलाशने
चल रहे जो समय के क्षितिज पर अफ्रिका के छोरों पर।''

यह साहित्य हमें मनुष्य के उद्‌गम से जोड़ता है। और एक छलांग में पार कर जाता है लाखों वर्ष। 'कामायनी' में जयशंकर प्रसाद ने प्रलय की कथा लिख कर एक लंबी बहस चलाई थी मनुष्य के पुनः विकास की, लेकीन सिक्किम का यह कवि लद्दाखी हमें उससे भी पीछे, पहले मनुष्य की जन्मस्थली पर ले जाता है उसकी यात्रा के निशान खोजने।

आख़िर पूर्वोत्तर के लोग वही चाहते हैं जो बाकी भारत के करोड़ों गरीब लोग चाहते हैं। इसीलिए बोधराय देववर्मा पूछते हैं हपने दोस्त से-

'क्या चाहिए मेरे दोस्त?'

उत्तर मिलता है -

'हम चाहते हैं कुशलता
अपनी, अपने परिवार की
अपनी ज़मीन की । . . .
हम चाहते हैं एक साथ मिलकर जीना -
एक कर दो हमें और हमारे कबीलों को।'

वे शिकायत करते हैं -

'मैंने मांगे थे बेहतर दिन, मुझे चाहिए था भोजन
पर बदले में मुझे मिली गालियाँ . . .'

पूर्वोत्तर के आदिवासी हिंसा नहीं चाहते, हिंसा तो उन पर लादी गई हैं। इसलिए त्रिपुरा की एक अल्पसंख्यक मॉग जनजाति की प्रतिनिधी कवयित्री निराश नहीं होती। हिंसा, प्रदूषण, युद्ध एवं विध्वंस के संकटों के बावजूद वह कहती है-

'हरियाली का हरिहर हौसला
फहराते रहता
सभ्यता की अ-दमनीय पताका।'

और कवयित्री निर्णायक भाषा में सवाल करती है-

'क्या चलने दें यूं ही बेरोकटोक
बम और बारूद का यह दुस्साहसिक खेल ? . . .'

और वह फैसलानुमा सुझाव देती है-

'समय आ गया है कि छेड़ें एक नयी जंग।'

और वह आशा करती है-

'आदमी को चाहिए खोजना एक वरदायी गगन।'

और अंत में वह कहती है-

'बदलनी होगी प्रतिरोध की भाषा!'

क्या इनका दर्द भारत के अन्य भागों में दर्द का साझीदार नहीं बन सकता? कमी हममें है, जो इनके दर्द को, इनके हक को पराया समझकर नजरअंदाज करते हैं। इसलिए हिंदी अगर इनकी भाषाओं का अनुवाद कर अपनी दुनिया में ले जाए तो दो बड़े लाभ तुरंत होगें- हिंदी वाङ्मय का निर्माण होगा और दूसरी बात कि दृष्टिकोण बदलेगा और हमारा पूर्वोत्तर के साहित्तर से दर्द का रिश्ता बनेगा।

जहाँ तक पूर्वोत्तर के आदिवासी साहित्य के सवाल है-तो अगला युग या कहूँ कि युग हाशिये के पार की जमातों का है, जिसमें आदिवासी, दलित, महिला, अल्पसंख्यक और वे सभी वंचित जमातें

हैं, जिन्हें तथाकथित मुख्यधारा-जो स्वयं ही अल्पसंख्यक हैं-ने पीछे धकेल रखा है या जिसने इन जमातों पर अपना वर्चस्व कायम कर रखा है। इनमें खासकर आदिवासी साहित्य, वह भी पूर्वोत्तर का आदिवासी साहित्य खास मायने और महत्त्व रखता है। इसके महत्त्व के कई कारण हैं। पूर्वोत्तर के आदिवासीयों और उनकी कई भाषाओं का भारत के बाकी वाशिंदों से प्राचीनतम होना भी अपने में एक महत्त्वपूर्ण कारण है। ये लोग अपनी भाषाओं के साथ आर्यों से भी पहले आए और इनकी भाषाओं का मूल स्त्रोत भारत में बोली जाने वालीं आर्यभाषाओं से भिन्न है।

पूर्वोत्तर की भाषाओं की विविधता भी इनके साहित्य के महत्त्व को बढ़ाती है। केवल भाषायी विविधता ही नहीं बल्कि उनकी भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनशैली भी इतनी विविध व इतर है कि मैदानी इलाका उन्हें भौंचक्का होकर विस्मित-सा देशता रह जाता हैं। उनका मूल्यबोध भी अभी तक सुरक्षित हैं। पूर्वोत्तर का साहित्य केवल अपने अतीत की पीड़ा या गौरव का साहित्य ही नहीं है वह अपने वर्तमान से भी जूझ रहा है, चाहे वह सरकारी हिंसा हो या आतंकवाद का हमला। उनका साहित्य, लोगों की मानसिकता और एक-दूसरे के प्रति पूर्वाग्रह ग्रस्त दृष्टिकोण बदलने में कारगर हो सकता है। इस साहित्य को यदि हम शेष भारत में ले जाएं तो एक अदभुत संवाद कायम हो सकता है, जो 'हम' और 'वे' की दूरियां पाट सकता है। इनके साहित्य में सामूहिकता, समानता, भाईचारा, आजादी, प्रकृति से गहन लगाव व प्रेम है और है मनुष्य की अस्मिता-खासकर स्त्री-अस्मिता के प्रति विशेष आदर। हम इनसे कुछ सीख सकते हैं। इनकी इस विविधता की अनूठी छटाओं के साथ उनके मूल्यबोध को यदि हम आत्मसात कर लें तो देश में मूल्यों में आई अवनति में कुछ कमी हो सकती है।

इस साहित्य का भविष्य सुनहरा होने का कारण उनमें तेज़ गति से शिक्षा का प्रसार है। मात्र सौ-वर्ष सौवर्ष पहले प्राप्त लिपि से ही इनका लिखित साहित्य आरम्भ हुआ लेकिन पिछले पाँच हजार वर्षो का संयोजित वाचिक साहित्य, मिथक, लिजिन्द्रियां एवं अनुभव व जीवन-शैली से समृद्ध इनका वाङ्मय अब भारतीय वाङ्मय के समकक्ष आने की होड़ में भी शामिल होने की आर बढ़ रहा है।

•••

Feminism in Post Independence Sanskrit Literature

Dr. Lalita Namjoshi



Introduction

The topic itself raises eyebrows as Sanskrit being an ancient classical language the general readers and even the scholars of modern Indian literature are not aware that Sanskrit is still used by creative writers to produce traditional forms such as Mahákávyas, Campükávyas- a combination of prose and poetry and devotional poetry. There are experiments like short stories, biographies and plays that deal with contemporary themes. There are journals and periodicals catering to Sanskrit readers. In spite of such a wide range of Sanskrit Post Independence Literature it is very difficult to trace the literary trends that are very prominent in Modern Indian Languages.

Feminism is itself a very recently developed ideology. There are many forms and shades of feminism with cultural, historical, geographical and political background. Feminism is often defined as "An awareness of Women's oppression and exploitation in society, at work and within the family, and conscious action by women and men to change this situation."

Present day feminism is a struggle for the achievement of women's equality, dignity and freedom of choice to control lives and bodies of women within and outside the home.

Traditionally Sanskrit literature reflects the patriarchal attitude towards women. Women are depicted either in a romantic pattern or as main obstacles in the spiritual progress of men. In medieval India women were totally deprived of formal education and kept away from learning Sanskrit. Modern Sanskrit literature more or less follows the same path and social issues in general and feminist issues in particular find little room in the diaspora it covers. However there are a few examples that shine out because of their feminist treatment of the theme. The paper is an attempt to introduce representative examples and discuss the reasons for the very low profile of feminism in Post Independence Sanskrit Literature.

The Writings of Pandita Kshama Rao

The plight of women was depicted in a simple, lucid narrative by Pandita Kshama Rao in her short stories. Kathámuktávali a collection of fifteen short stories was published in1954.. Almost all stories have woman as the central character. At present the Kathámuktávali is not easily available and one has to depend on the secondary sources about the content of her stories. However one of the stories titled Vidhavodváhasañkaûam can be discussed to bring out the salient features of Pandita Kshama Rao, s delineation of the burning social issues related to the Indian women in her days.

Vidhavodváhasañkaûam is a story that tells us about the pitiable life of a young child widow who is heaped with atrocities typical of an orthodox family. Facing deprivation of all sorts, without any idea of retaliating the oppression by the in laws, the heroine of the story Párvatè accepts her fate, finds solace with feeding a stray dog and showering affection on her young nephew. However, her dull and empty life takes an unusual turn when a young traveler is enchanted by her beauty. He silently follows her every day to the well from where Párvatè fetches water, builds friendship with her and offers help whenever possible. Though initially apprehensive of his charms and afraid of social censure, soon Párvatè is won over by the sincerity of the young man's feelings and love develops between the two. As there is no chance that place where she stays and the community to which she belongs would accept such an alliance they take a bold decision to go to Pune, supposedly the most progressive city. One fine day she manages to elope with her lover but both of them are shocked to find that no priest is willing to marry them as their castes are different. Theirs effort to have a legal

court marriage are also foiled. In spite of revolting against the social system, Párvatè has a staunch belief in her Dharma and would not accept the idea of changing Dharma for convenience to facilitate marriage. The proposal by her lover of living together without marriage in some remote place where no one would recognize them is unimaginable for Párvatè. Her heart pines for love, happiness and a family. But Párvatè cannot discard the norms if morality and Dharma so far valued by her and keep an illicit relationship with her lover. Interestingly, the lover who had entered into the darkened life of Párvatè as a ray of hope is genuine and stands by her in these trying times. Now with all hopes shattered Párvatè decides to go back to her in laws place. There is no need to say what is in store for her. A widow running away with a stranger !She is denied entry in the house, even the child whom she loved and tended like her own is pulled away from her, she doesn't have even a glimpse of that child. She is now a stigma, a blot on the family name. Completely devastated she has no where to go, no one to turn to. Her lover had known what would happen when she goes back. Without her knowledge he follows her and when she is thrown out of her house he extends a helping hand. Once again Párvatè leaves the small, backward town and reaches Pune; not to seek help to solemnize her relation with her lover, but to find her own identity, to get education, to become self sufficient, of course with the support from her lover.

The story of Párvatè is designed with the technique of a short story, there are twists and turns in the brief plot. Though one expects it end with a conventional happy union of the couple, it ends on a very different note as the bond between the lovers remains strong, they maintain a respectable distance. Neither union nor separation, the story offers a third, a rather novel option at the ending that can be seen as a feminist ending. The author has etched the character of Párvatè very sympathetically. Her beauty and charm have been brought out vividly. The reader is carried away by the turn of events and wishes that the sañkaûa - the difficulties that pose hindrance in the udváha of a vidhavá – marriage of a widow should cease and the heroine should get what she deserves.

During last 60 years after the story has been written, a lot of has changed regarding the issue of widow remarriage. However even in the wake of awareness, spread of education widowhood is still seen as great misfortune and it may still require some amount of courage for a widow to find love and to take decisions about her personal life. The plight of widows in many parts of India still remains one of the issues that the feminists are concerned about. If we take into consideration this, the significance of what Pandita Kshama Rao wrote is immense.

The next case of Feminism in Modern Sanskrit literature can be seen in plays written by Pandit Prabhakar Bhatkhande. His themes are based on contemporary issues. These plays cover a wide range including a thriller, a science fiction, a comedy and so on. He has experimented with technique and form. Almost all the plays have been enacted and have won awards for the presentation. The most striking of these for our purpose is a one act play entitled Lalanákhyánam which has all female characters.

It presents all prototypes of modern Indian woman— a senior lady named Yamuná who is a mother and a mother-in-law, a young selfish woman Mohinè who has deserted her husband, Vásantè , a widow of a soldier, the heroine of the play and Tejaswinè, a young firebrand soldier.

The play opens with a nándè and a prayer offered to Mother Goddess invoking her to bestow strength and valour. Vásantè has gone to attend a programme in which her dead husband is being honored posthumously for his bravery. Her mother in law and sister in law both do not approve the way Vásantè carries herself, She has continued to wear those ornaments that she used to wear when her husband was alive. She is friendly with a friend of her deceased husband. She refuses to pay her obeisance to Jagadambá. Yamuná and Mohinè push Vásantè into a bitter altercation. Her belongings, even the medal and the cheque given in honour of her husband's martyrdom is taken away from her. The lure of money she has makes Mohinè to plot remarriage of Vásantè with her second brother. Vásantè is outraged at this thought and about to leave the house. She is not worried about her livelihood as she herself says that she is well educated and she can support herself by getting some job. However she is in a delicate stage of life as she is in

early stages of pregnancy. Then enters Tejaswinè, a messenger from armed forces with the happy news that Vijay, Vásantè's husband is alive, and is under going treatment in the military hospital. Yamuná and Mohinè change their colour like a chameleon. She reprimands them for their unsympathetic behaviour. She says, "My mother in law, a widow herself hurt me by calling me misfortunate. A woman becomes wife, mother, daughter or sister due to the relations she has but her individuality as a person should be never forgotten. Women turn enemies of other women and snatch away their rights. Indeed some men do treat women like an inanimate object, but is it necessary that women also do the same? " Yamuná a has change of heart and Mohinè's eyes are opened by the example of Vásantè. Everybody realizes that women should treat other women with respect to put an end to the story of injustice to which women are often subjected. The Bharatavákya , the concluding prayer is offered," May the women become self sufficient, empowered. They may protect themselves and respected by people. May they have love for each other. Love and compassion are their weapons, may they prevail the world with their power."

No doubt this is a very mild, a conservative brand of feminism. However, in view of the confines and limitations of modern Sanskrit literature, even this version of feminism is noteworthy as it has a wider influence being presented through a performing art. This kind of feminism is popular amongst majority of women as it is rooted in the value system of Indian society.

Some observations

The main fact why feminism is not very prominently apparent in Post Independence Sanskrit Literature can be understood if we take into account the purpose and motives of modern Sanskrit literature. Almost all writers are committed to refute the charge that Sanskrit is a dead language. With the rise of regional languages and the advent of the foreign languages, mainly of English the glory of Sanskrit faded out. The modern Sanskrit writers had to struggle for survival and revival of the language so probably they could not experiment much with the form and the content of their compositions. They resorted to the trodden track of composing Mahákávyas based on the Ramayana, the Mahabharata or the sectarian theistic themes. The tradition of hero worship is also maintained by them. They tried to associate Sanskrit with the spirit of nationalism.

These motives have resulted in limitations of modern Sanskrit literature. Till date, there is neither a single novel nor a biography in Modern Sanskrit literature. These are the main forms of literature that have the potential of expressing a thought powerfully.

In the history of feminism, it is the women authors who first raised their pen against the women's subordination, exploitation, oppression, within the home and at the work place and society at large. In case of Sanskrit, women were not given access to the language and hence the number of women authors is very less. Majority of the male writers prefer the traditional role model of a devoted, sacrifying mother figure remaining in background for their depiction of women. The women in their writings are divinized and not individuals in flesh and blood. Now the things are gradually changing, and many women authors are writing in Sanskrit, but they have yet to make their mark to compete with women authors of other languages.

●●●

मराठी नाट्यसृष्टीतील स्त्री-प्रतिमा

डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस



विविध भाषीय भारतीय रंगभूमीला एक प्रदिर्घ व समृद्ध परंपरा आहे. तिच्या समृद्धतेत मराठी रंगभूमीने मोलाची भर घातलेली आहे. कठपुतळ्यांच्या खेळापासून प्रारंभित झालेला मराठी रंगखेळ आपल्या विविधतेने आज संपन्न झालेला आहे. समाजास चिंतनास प्रवृत्त करणे, थकल्या-भागलेल्यांचे रंजन करणे, समाजास सभोवतालच्या घटितांसाठी अंतर्मुख व्हायला लावणे यांसारख्या अनेक प्रयोजनांनी प्रेरित होऊन मराठी रंगभूमीने मोलाचे कार्य केले आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे विष्णू अनंत भावे यांनी ज्या नाटकाने मराठी नाटकाची मुहूर्तमेढ रोवली ते नाटक सीतेच्या स्वयंवराशी निगडित होते. 'सीतास्वयंवरा'चा मूळ स्त्रोत रामायण हे महाकाव्य अथवा लोकमानसातील सीतास्वयंवरकथा असे कोणतेही असले तरी, मराठी रंगभूमीवरील या पहिल्या नाटकाने 'स्त्री' पात्राला केंद्रस्थानी ठेवून नाटक गुंफले. या नाटकाने काव्यगत / कथागत स्त्रीपात्राच्या जीवनातील विशिष्टानुभवाला नाट्यरूपात सादर केले. त्याचबरोबर स्वयंवर मंडपात रामाच्या दर्शनाने तिच्या मनात त्याच्याविषयी निर्माण झालेली अभिलाषा आणि रावणाच्या कृत्यांनी निर्माण झालेली भीती यांचे एक अनोखे दर्शन या नाटकाने घडविले. इथे महत्त्वाचा मुद्दा असा की मराठी रंगभूमीने काळाच्या वेगवगळ्या टप्प्यांवर कधी 'स्त्री' पात्राला केंद्रस्थानी ठेवून अथवा कधी केंद्राबाहेर ठेवून स्त्रीविषयक जीवनसंदर्भांना नाट्यरूप दिले आहे. या प्रकारचा नाट्यप्रवास काही नाटककारांनी जाणीवपूर्वक केला तर काही नाटककारांच्या हातून नकळत काही गोष्टी घडल्या. विष्णू अनंत भावे यांनी पहिले स्त्रीकेंद्री नाटक सादर केलेले असले तरी त्याच्या आश्रयाने त्यांना समकालीनांशी वैचारिक पातळीवर काही संवाद साधायचा आहे, असे जाणवत नाही. असेच 'संगीत सौभद्र', 'मानापमान' आदी नाटकांविषयी म्हणता येईल. 'संगीत सौभद्र' हे नाटक सुभद्रेच्या लग्नाविषयी असले, तरी नाट्यगत 'लीला' कृष्णाच्या म्हणजे पुरुषपात्राच्या भोवती गुंफलेल्या आहेत. ज्या संगीत रंगभूमीने मराठी रसिक प्रेक्षकांचे रंजन केले त्या रंगभूमीने जाणिवेच्या पातळीवर अथवा नेणिवेच्या पातळीवरही स्त्री-विषयक प्रश्न सादरीकरणासाठी निवडलेले दिसत नाहीत. (अंशत: अपवाद 'संगीत शारदा' या नाटकाचा करायला हवा.)

मो. ग. रांगणेकरांच्या 'कुलवधू' या नाटकाने प्रथमच स्त्रीचे काही तत्कालीन प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. एकोणिसाव्या शतकाच्या स्त्रीसुधारणाविषयक चळवळीच्या पार्श्वभूमीचा विचार करता सिनेमात, कलेच्या क्षेत्रात नव्यानेच काम करू लागलेली स्त्री आणि तिचे प्रश्न हे 'कुलवधू' या नाटकाचे मुख्य सूत्र असलेले दिसते. कुटुंब आर्थिक अडचणीत असतानाच भानुमती आर्थिक गरजेपोटी सिनेमासारख्या कलाक्षेत्रात पहिले पाऊल टाकते. जोपर्यंत तिला मिळणारा पगार हा तिच्या नवऱ्यापेक्षा कमी असतो, तोपर्यंत त्या दोघांच्या नातेसंबंधामध्ये दुराग्रह व भावनिक दुरावा निर्माण होत नाही. परंतु भानुमती नावारूपाला येऊ लागते, तिची आर्थिक मिळकत वाढू लागते. किंबहुना एका टप्प्यावर तिचे आर्थिक उत्पन्न हीच घराची मिळकत होते तेव्हा तिच्या नवऱ्याचे वर्तन बदलते. त्याच्या वर्तनातील बदलामुळेच भानुमतीच्या मानसिक स्थिरतेला तडा जातो. वैभवाकडे वाटचाल करणाऱ्या तिच्या कलाप्रवासाला दु:खाची झळ पोहोचू लागते.

'कलावंत स्त्री आणि विशिष्ट परिस्थितीमुळे व पुरुषाच्या विशिष्ट मानसिकतेमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांशी स्त्रीचा संघर्ष' हा या नाटकाचा गाभा असला आणि हे नाटक स्त्रीकेंद्री असले तरी या नाटकातील स्त्री - प्रतिमा ज्या मूल्यांचा, ज्या जीवनधर्माचा व वर्तनधर्माचा पुरस्कार करते ती मूल्ये, तो जीवनधर्म व तो वर्तनधर्म हे सारे पूर्णपणे पारंपरिक स्वरूपाचेच आहे. आपण सिनेमातील कलावंत असलो तरी आपण पतीच्या व सासरच्या मंडळींच्या अर्ध्या वचनात राहायला तयार आहोत हीच तिची नाट्यगत ओळख मनावर ठसते. कारण नवरा व सासर यांना गमावून काही मिळवावे ही भानुमती या स्त्री पात्राची मानसिकता नाही. प्रस्तुत नाटकात स्त्री - पात्राची मानसिकता अशा प्रकारची कल्पिल्यामुळेच वेळप्रसंगी नवऱ्याचे घर सोडून बाहेर पडलेली भानुमती मानसिकदृष्ट्या दुबळी वाटते. या उलट दारूड्या नवऱ्याच्या पायापाशी स्वर्ग आहे असे म्हणणारी सिंधू पतिव्रताधर्माचे कथित 'असाधारण' मूल्य स्वीकारीत असली, नवऱ्याच्या दारूडेपणाची झळ तिच्या संसाराला पोहोचत असली तरी तिचे मन दुबळे नाही. म्हणूनच पतिव्रताधर्मातील अत्युच्च पण पारंपरिक मूल्यापर्यंत ती प्रवास करते. विशेष म्हणजे तिचा हा प्रवास तसा एकाकीही असतो. तळिरामच्या आग्रहाखातर सुधाकर तिचे माहेर तोडून टाकतो असा संदर्भ नाटकात आहे. खरं तर, सिंधूचा जो

स्वभावधर्म नाटकभर आपल्याला जाणवतो, तो पाहता सिंधूने आपणहून तो संबंध तोडलाच असता कारण त्यातच तिच्या पतिव्रता असण्याचं तेज उजळून निघणार होते. तिचा हा प्रवासच तिच्या पतीला तिच्या जगण्यातून 'उणे' करून टाकतो. पतिव्रताधर्माला आव्हान व नकार देण्याचा तो काळ नव्हता म्हणून नवऱ्याचे घर सोडायला भाग पडलेली गीता ही पतिव्रताधर्म सांभाळते आणि सिंधूला त्यासाठी मदतही करते. या दोघीही परिस्थितीशरण असूनही स्वत:चं एकाकी वेगळेपणा व स्त्रियांना परस्परांविषयी वाटणारा सहानुभाव जपून जगतात, हे मुद्दाम नोंदवायला हवे.

स्त्रियांनी मनात व वर्तनात परस्परांविषयी सहानुभाव, भागिनीभाव बाळगायला व पाळायला हवा असे आधुनिक काळात म्हटले जाते. त्या विचाराचा प्रत्यय 'संगीत एकच प्याला' मधील सिंधू व गीता या दोन स्त्री-पात्रांच्या वर्तनातून येत राहतो. मात्र स्त्रीचे विशेष प्रश्न मांडणाऱ्या 'कुलवधू' सारख्या नाटकातील भानुमती आपले सारे सत्त्व व स्वत्व आपल्या शोषकांसाठीच गमावू पाहते. हे असे घडते कारण नाटककाराने नाटकासाठी निवडलेला विषय तत्कालीन स्त्री प्रश्नाशी संबंध राखणारा आहे. परंतु तो कलावंत स्त्रीचा कुटुंबगत संघर्ष एवढ्यापुरताच मर्यादित राहतो. रा. ग. गडकऱ्यांच्या सिंधूनंतर व विशेषत: गीतानंतर मो. ग. रांगणेकरांची आलेली भानुमती, कालबाह्य मूल्ये कोणती? स्वीकार्य मूल्ये कोणती? अशा प्रश्नांना साधा स्पर्शही करीत नाही. असे घडते कारण त्यामागील नाटककाराची मूल्यदृष्टी, मूल्ययुक्त पुरोगामी आहे असे वाटत नाही.

मो. ग. रांगणेकरांची 'कुलवधू' जशी नवऱ्याच्या घरातून बाहेर पडते, तशी आचार्य अत्रे यांची 'घराबाहेर' मधील निर्मला घर सोडून बाहेर पडते. नवऱ्याचा बावळटपणा आणि सासऱ्याचा संशयी व हेकट स्वभाव यामुळे तिला घर सोडावे लागते. अत्र्यांच्या 'घराबाहेर' मधील निर्मलाचा वनवास म्हणजे जणू रामायणातील सीतेच्या वनवासाची पुन:प्रतीती आहे. भानुमती आणि निर्मला ही स्त्रीपात्रे घर सोडून बाहेर पडत असली तरी ही स्त्रीपात्रे पुन्हा घरी परततात. खरे तर त्या घर सोडून बाहेर पडताना त्यांच्या कुटुंबाची जी परिस्थिती होती, त्या परिस्थितीत व कुटुंबगत माणसांच्या मानसिकतेत फारसा बदल झालेला नव्हता. उदा. भानुमतीच्या नवऱ्याचे विचारपरिवर्तन झालेले नसते, अथवा निर्मलाच्या सासऱ्याचा, नवऱ्याचा व दिराचा मूळ स्वभावधर्म व वर्तनधर्म बदलण्याची शक्यता नसते. मग या दोघी मागे का येतात? यापैकी रत्ना मुलासाठी परत येते असा संदर्भ नाटकात येतो. भानुमतीजवळ माघारी येण्यासाठी असे कोणतेही सबळ कारण नाही. या दोघी प्राप्त परिस्थितीकडे वळतात. कारण या दोघी विवाहित स्त्रिया आहेत. त्या घराबाहेर पडल्याने कुटुंब व्यवस्थेचे काय होईल असा प्रश्न त्यांच्या जन्मदात्यांना भेडसावत नसेलच असे नाही. 'उद्याचा संसार' मध्ये घर सर्वार्थाने मोडकळीला आलेल्या करूणाला अत्रे आत्महत्या करायला लावतात हाही मुद्दा येथे लक्षात घ्यायला हवा. या तिन्ही स्त्री-पात्रांचे शोषण कालबाह्य मूल्यव्यवस्था व स्त्रीभोवती निर्माण केलेले भावनीक वलय यांमुळे होते, हे लक्षात घ्यायला हवे. निर्मला ज्या कारणासाठी घरी परत येते ते कारण आजही धगधगीत जिवंत आहे हे खरे आहे. याचा अर्थ असा करता येईल की, अत्रे तत्कालीन समाजस्थितीचे शब्दरूप चित्रण करीत होते. पण त्यांना त्या चित्रणापलीकडे जाऊन निर्मलाच्या जगण्यातील संघर्षचित्र व्यक्त करता आले नाही. असे करण्यामागे नाटककारापाशी विशिष्ट जीवनदृष्टी असावी असे वाटत नाही. म्हणजे असे की नाट्यगत पात्रे परात्म जीवन जगत असली तरी नाटककाराला त्यांच्या परात्मतेचे भान असते. या उलट गो. ब. देवलांनी अत्र्यांच्याही आधीच्या काळात विशेष परिस्थितीत बोहल्यावर चढलेल्या शारदेचे लग्न लोभी म्हाताऱ्याशी (भुजंगनाथ) लावले नाही, तर शारदेला अनुरूप अशा तरुणाशी (कोदंड) तिचा विवाह घडवून आणला. त्यासाठी त्यांनी शारदेचे लग्न झाले की नाही याची 'तात्त्विक चर्चा' नाटकात घडवून आणली. त्या चर्चेच्या आधारे तत्कालीन सामाजिक प्रश्नांना तात्त्विक बैठकही प्राप्त करून दिली. त्या काळी नाटक पाहायला आलेला प्रेक्षक हा जणू त्या तात्त्विक चर्चेला विरोध करणारा अथवा पाठिंबा देणारा समाजघटकच होता. देवलांची शारदा तत्कालीन लोभी व भ्रष्ट सामाजिक व्यवस्थेचा 'बळी' ठरत होती. परंतु नाटककार नाटकात तसे घडू देत नाही. कारण त्याला केवळ स्वकालीन सामाजिक स्थितीगतीचे दर्शन समकालीनांसाठी व पुढीलांसाठी घडवायचे नाही, तर स्वकालीनांना वर्तमानकालीन प्रश्नांकडे डोळसपणे पाहायला व अंतर्मुख व्हायला भाग पाडायचे असावे. 'नाट्यगत वास्तवात इतके सारे करू पाहणाऱ्या देवलांनी शारदेचे लग्न सगोत्र विवाह करू नये या कारणासाठी मोडले असे दाखवावे याचे आश्चर्य वाटते.' तरीही नंतरच्या काळातील भानुमती, करूणा, निर्मला या स्त्री-पात्रांपेक्षा आणि त्यांच्या भोवतालच्या सर्वस्तरीय स्थितिगतीपेक्षा देवलांची शारदा व त्यातील सामाजिक स्तर दीर्घकाळ आपल्या स्मरणात राहू शकला आहे असे म्हणावेसे वाटते.

मामा वरेरकरांच्या 'भूमिकन्या सीता' या नाटकात 'सीता', 'उर्मिला' आणि 'दासी' ही तीन स्त्री-पात्रे महत्त्वाची पात्रे आहेत. या तिघींपैकी सीता व दासी वासंती यांच्या चारित्र्याविषयी प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि त्याविषयी त्यांना शासनही करण्यात आलेले आहे. सीतेला कोणत्या प्रकारचे शासन करण्यात येणार आहे ते उर्मिलाने सीतेला सांगितलेले आहे. परंतु सीता त्याविषयी उघडपणे तक्रार करीत नाही. होणारे शासन स्वीकारावे असे ती मानते. कारण

त्यामुळेच तिचे निष्कलंकत्त्व सिद्ध होईल. अन्यथा पुढील पिढ्या आपल्याच चारित्र्याविषयी संशय व्यक्त करतील असे तिला वाटते. उर्मिलाला मात्र हे सारे पटत नाही. कोणत्याही अन्यायाविरूद्ध वेळीच भूमिका घेतली नाही तर कालांतराने अन्याय सोसणेच योग्य वाटू लागते. त्यामुळे व्यक्ती आपले स्वत्व हरवून बसते या प्रकारची तिची भूमिका असते. तर दासी कोणत्याही प्रकारच्या अन्यायाविरूद्ध भूमिका घेतली पाहिजे असे मानते. मामा वरेरकरांच्या नाटकातील या स्त्री - प्रतिमांपैकी सीता एकीकडे स्वकालीन मूल्यव्यवस्थेला महत्त्व देते आणि त्याचवेळी आपले वेगळेपण सिद्ध करते. उर्मिला हे पात्र काळापलीकडे जाऊन विचार करू पाहते. मामा वरेरकर यांची मार्क्सवादी विचारसरणी उर्मिला या स्त्रीपात्राच्या माध्यमातून प्रामुख्याने साकारली आहे. याचा अर्थ सीता बुरसटलेल्या विचारांनी प्रभावित आहे असे मात्र नाही. म्हणूनच या स्त्री - प्रतिमा मराठी नाट्यविश्वात अविस्मरणीय ठरतात.

इ. स. १९५० ते १९६० या दशकाच्या आगेमागे व मध्यावर अनेक नाटककार मराठी रंगभूमीवर कार्यशील झाले. वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, बाळ कोल्हटकर, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी इ. प्रभृतींची नाटके रंगभूमीवर येऊ लागली. या नाटककारांची अनुक्रमे 'नटसम्राट', 'मला काही सांगायचंय', 'दिवा जळू दे सारी रात', 'वाहतो ही दुर्वांची जुडी', 'पुरुष', 'पर्याय', 'शांतता! कोर्ट चालू आहे', 'कमला', 'अग्निदिव्य' या गाजलेल्या नाटकांमधील स्त्री-प्रतिमांचा आपण विचार करू लागलो की, त्यातून जे संदर्भ जाणवू लागतात, त्यांचा इथे विचार करता येईल.

शिरवाडकरांचे 'नटसम्राट' हे आप्पासाहेब बेलवलकरांभोवती गुंफलेले नाटक असले तरी त्यातील कावेरी, शारदा आणि नलू ही स्त्री-पात्रे स्ववैशिष्ट्यांनी आपल्या लक्षात राहातात. ही तिन्ही स्त्री-पात्रे भिन्न - भिन्न स्वभावाची आहेत. त्यांची स्वभावभिन्नताच आप्पासाहेबांच्या वर्तनधर्माला वेगवेगळे परिमाण प्राप्त करून देते. कावेरीमुळे (पत्नी) त्यांचे जगणे समृद्ध होते. शारदा व नलू (सून व मुलगी) यांच्यामुळे त्यांच्या जगण्याला अस्थिरता व वणवण येते. या प्रकारची त्यांची स्वभावभिन्नता मुख्य पात्राचे जगणे काहीसे दुःखकारक करते. पण या तीनही स्त्री-पात्रांचा मूळ मनोधर्म एकच आहे. तो मनोधर्म म्हणजे पतिव्रता धर्म होय. त्या तिघींवरही पारंपरिक संस्कृतीचा व पारंपरिक जगण्याच्या पद्धतीचा प्रभाव आहे. ज्याप्रमाणे कावेरी व्यवसायाने नट असलेल्या आपल्या पतीचा जीवनधर्म जाणते, त्याच्या उत्कर्षासाठी बिनतक्रार साऱ्या हालअपेष्टा, आर्थिक चढउतार सोसते, असे सोसण्याची झळ पतीला अथवा मुलांना लागू देत नाही त्याप्रमाणेच जगण्याचा अट्टाहास शारदा व नलूचा आहे. त्यात दोघींचेही पती श्रीमंत आहेत. ही चारही पात्रे (मुलगी, सून व त्यांचे पती) बदलत्या काळातील आहेत. पण स्त्री-स्वातंत्र्य, स्त्रीची स्वत्व जाणण्याची आणि साकारण्याची धडपड या आधुनिक जाणिवेशी त्यांचा संबंध नाही. आधुनिक काळातील पति-पत्नी व अपत्य अशा चौकोनी कुटुंबाची कल्पना त्यांनी स्वीकारलेली आहे. त्यामुळे त्या दोघींच्या सामान्य व सर्वसाधारण मतांना त्यांच्या कुटुंबात महत्त्व येते. खरे तर या दोघीही कावेरीप्रमाणे (अनुक्रमे सासू व आई) स्वत्वशून्य जीवन जगतात. नवऱ्याला प्रमोशन मिळावे म्हणून त्याच्याबरोबर पार्ट्यांना जाणारी, त्याच्या साहेबाची आणि त्याच्या पत्नीची मर्जी राखणारी आणि त्यासाठी धडपडणारी निलू हे स्त्री-पात्र स्त्रीच्या स्वत्वशून्यतेचाच प्रत्यय देते. या पार्श्वभूमीवर तिची धावपळ, मुलांना आपल्यापासून दूर ठेवणे हे सारे निरर्थकच वाटते. वर म्हटल्याप्रमाणे तिचे जीवनध्येय तिच्या आईच्या जीवनध्येयाशीच नाते सांगणारे आहे हे लक्षात घेतले तर सून व मुलगी यांच्या संदर्भात कावेरीने वेळोवेळी घेतलेल्या भूमिका तिच्या स्वत्वशून्यतेचाच प्रत्यय देतात. तिचा पतिव्रताधर्म क्षणकाल उजळून निघत असला तरी तो प्रभावी ठरत नाही. कारण त्या दोघी (शारदा व निलू) स्वभावाने फारशा संवेदनशील उदार, कनवाळू अशा नसल्या तरी तिच्यासारख्या पतिव्रता असतातच. याचा अर्थ असा, शिरवाडकरांनी आपल्या नाटकात तीन स्त्री-प्रतिमा रंगविल्या पण त्या तिघीही स्वत्वशून्य असलेल्या दाखवल्या आहेत. ज्या भगिनीभावाचा प्रत्यय गडकरी सिंधू व गीता या स्त्री-पात्रांच्या माध्यमातून देऊ शकले तो प्रत्यय 'नटसम्राट' मधील स्त्री-पात्रांच्या माध्यमातून येत नाही. इतकेच नाही तर 'कुलवधू' मधील बनूताईही हळूहळू बदलते आणि ती आपल्या मातेला मतपरिवर्तनास प्रवृत्त करू पाहाते. स्त्री-पात्रांचा असा प्रवास नंतरच्या नाटकांमध्ये असू नये, ही खेदाचीच गोष्ट आहे असे म्हणायला हवे.

इथे उदाहरणादाखल कानेटकरांचे 'मला काही सांगायचंय!' या नाटकाकडे वळलो, तर हे नाटक स्त्री-पात्राभोवती गुंफले आहे असे वाटते. त्यात यशोधरेचे वेगळे जीवन साकारण्याचा प्रयत्नही केलेला आहे. पण 'नमनाला घडाभर तेल' या न्यायाने देवकीनंदन (सासरा), राहूल (पती), बाप्पाजी (आश्रमचालक) या पुरुषांभोवती, त्यांच्या स्ववैशिष्ट्यांभोवती नाटक इतके घुमत राहते की, यशोधरेचा अत्यंत गंभीर असा मानसिक संघर्ष त्यात गुदमरून जातो. नाटकाला गंभीर कलाटणी देण्यासाठीच केवळ तिच्या संघर्षाचा एक साधन म्हणून उपयोग केला जातो. लग्नापूर्वी बाप्पाजीच्या वासनेचा 'बळी' ठरलेली यशोधरा ती घुसमट घेऊन जगते. पण तिच्या त्या घुसमटीपासून सारेच अनभिज्ञ व अपरिचित राहतात. या नाटकातही स्त्रीच्या जीवनसंदर्भात ज्या मूल्यांचा पाठपुरावा केला जातो, ती फार विचारांती स्वीकारलेली मूल्ये आहेत

असे नाही! शिवाय यशोधरेचा मानसिक संघर्ष कळल्यानंतर राहूल तिचा स्वीकार करतो. पण त्या स्वीकारामागे विचारांची पक्की बैठक आहे, असे नाही. प्रसिद्ध वकील व न्यायमूर्ती यांच्या घरातील राहूल बुद्धीने सामान्य आहे. त्यामुळे तो झिडकारला गेला आहे. मातेविना पोरक्या व एकाकी जगणाऱ्या राहूलचा विशिष्ट निर्णय हा भावनेवर आधारलेला असाच आहे. भावनेला विचारांची बैठक नसणे आणि भावना दीर्घकाळ टिकून राहण्याची शक्यता कमी असणे याचे भान त्यापाठीमागील नाटककाराला असलेले जाणवत नाही. विशेष म्हणजे यशोधरेला 'काही' महत्त्वाचे सांगायचे असते आणि नाटकभर तिला काही सांगण्याची संधीच नाटककार देत नाही. त्यामुळेच यशोधरेचा संघर्ष वगळता नाटकात अन्य बाबींनाच फार महत्त्व येते. परिणामी मूल्यांची धरसोडच नाट्यगत वास्तवात अधिक होताना दिसते.

'वेड्याचं घर उन्हात' पासून सुरू झालेला कानेटकरांचा नाट्यप्रवास दीर्घ आहे. प्रस्तुतचे नाटक हा त्या नाट्य - प्रवासातील मधला टप्पा आहे. परंतु या टप्प्यावर आल्यानंतरही कानेटकरांनी अपारंपरिक व मूल्यगर्भ आधुनिक जीवन जाणिवेचा नाट्यगत समाज वास्तवात फारसा स्वीकार केला नाही. त्यामुळेच त्यांच्या नाटकातील स्त्री-पात्रे काही मानसिक संघर्ष जगत, भोगत असल्या तरी आधुनिक काळाने निर्माण केलेल्या प्रश्नांना त्या भिडत नाहीत. म्हणूनच त्यांच्या नाटकातील स्त्री-पात्रे एक पूरक पात्र म्हणून प्रकटतात. त्यांना त्यांची अशी विशेष ओळख असलेली जाणवत नाही. कानेटकरांनी आपल्या नाट्यप्रवासाच्या उत्तरार्धात 'पंखांना ओढ पावलांची' हे नाटक लिहिले, (हे नाटक शांता निसळ यांच्या कादंबरीवर आधारलेले होते.) ज्याच्या शीर्षकातही पारंपरिक, जुनाट मूल्यांचाच आग्रह दिसतो.

बाळ कोल्हटकरांनी जी स्त्री - पात्रे मराठी रंगभूमीवर उभी केली ती स्त्री-पात्रे प्रामुख्याने भारतीय संस्कृतीचे आंधळेपणाने जतन करणारी दिसतात. त्यांना त्यांच्या सभोवतालच्या विश्वविषयी कोणतेच प्रश्न पडत नाहीत. यात कुटुंब, कुटुंबगत माणसे, त्यांचे स्वभाव हे सारे काही अभिप्रेत आहेच. त्या जगतात, त्या त्याग करतात. त्यागाची किंमत मोजतात. पण हे सारे आपण का करीत आहोत किंवा का करायचे हे प्रश्न त्यांच्या असज्ञ मनातही उभे नाहीत. हा नाटककार भारतीय पारंपरिक कालबाह्य मूल्यांचा स्वीकार इतक्या आत्मियतेने करतो की सुजाण व सदसद्विवेकबुद्धीला स्मरून विचार करणारा रसिकही त्या भावनेच्या भरात क्षणकाल वाहून जाऊ शकतो. भारतीय व पर्यायाने बहुसंख्य मराठी पुरुषाला त्याग, समर्पण आदी मूल्यभावांचे अतोनात आकर्षण व प्रेम वाटत आले आहे. अशा पुरुषप्रेक्षकवर्गाला कोल्हटकारांनी रंगविलेली स्त्री दिलासा देणारी वाटली असणे सहज शक्य आहे. परंतु अशा स्त्री-प्रतिमांमुळे स्त्रीच्या आंतरिक, भावनिक व क्वचित वैचारिक संघर्षापासून मराठी रसिक अनभिज्ञ राहिलेला आहे. असे घडले कारण आधुनिक काळातील विशिष्ट प्रकारच्या स्त्री-प्रतिमा निर्माण करणाऱ्या नाटककाराची जीवनदृष्टी नवी वैचारिक आव्हाने - आवाहने पेलू शकलेली नाही. नाटककार आधुनिक काळातला पण त्याने स्वीकार्य मानलेली जीवनदृष्टी व मूल्यदृष्टी मध्ययुगीन काळातील असे इथे घडलेले दिसते.

इथेच एक गोष्ट नोंदवावीशी वाटते ती अशी - रा. ग. गडकऱ्यांनी नाट्यप्रवासाच्या उत्तरार्धात सिंधू व गीता या परस्परपूरक स्त्री-प्रतिमा रंगविल्या तर नाट्यप्रवासाच्या आरंभीच्या काळात पाश्चात्य विद्येने बहकलेल्या तरुणी अशा स्त्री-प्रतिमाही रंगविल्या. विशेष म्हणजे 'भावबंधन' नाटकातील शिकलेले तरुणही तसेच वागतात. परंतु त्यापाठीमागे पारंपरिक मूल्यांचा अतिरेकी ध्यास जाणवत नाही. फार तर रहस्यमय नाट्यरचना करण्यासाठी व घनश्यामाचा सूडाचा प्रवास अधोरेखित करण्यासाठी ते स्त्रीपात्रांचा अशा पद्धतीने उपयोग करून घेतात, असे म्हणावेसे वाटते. याउलट कोल्हटकर मात्र बदलत्या जीवनात कालबाह्य मूल्यांनाच सादर करू पाहतात हे गंभीर आहे.

एकीकडे लहानांपासून थोरांचे आणि बुद्धिवंतांपासून (!) सामान्यांचे रंजन करू पाहणाऱ्या स्त्री-प्रतिमा मराठी रंगभूमीवर वावरत होत्या. तेव्हा त्याच्याच आगेमागे जयवंत दळवी नाट्यलेखन करीत होते. त्यांनी रंगविलेल्या स्त्री-प्रतिमा रंगभूमीवर अवतरू लागल्या होत्या. दळवींनी साकारलेली 'महासागर' मधील सुमा, 'सावित्री' मधील सावित्री उर्फ साऊ, 'पुरुष'मधील अंबा, 'लग्न' मधील प्रमुख स्त्रीपात्र ही स्त्रीपात्रे आपल्या स्मरणात लगेचच जागी होतात. दळवी परस्परविरोधी मूल्यभाव जपणाऱ्या स्त्री-प्रतिमा एकाच नाटकात रंगवितात. त्यांतील एक स्त्रीरूप जुन्याच व गतकालातील त्याग, समर्पण, पतिव्रताधर्म आदी वर्तनाला महत्त्व देत असते तर दुसरी स्त्री-प्रतिमा खूपदा भावनेच्या भरात आपली संस्कृती, आपला संस्कार विसरून वेगळ जगू पाहते. पण त्या जगण्यात ती यशस्वी होत नाही. अयशस्वी झालेल्या तिला अखेरीस आत्महत्या करावी लागते. दळवी निर्मित या स्त्री-प्रतिमा एखाद्या स्त्रीमनात जागे होणारे नवे भान आणि त्याची परिणती अशा पद्धतीने साकारतात की, स्त्रीचे मानसिक / शारीरिक स्वातंत्र्य ही एक बिनबुडाची तकलादू बाब आहे, असा विचार वाचक-प्रक्षेकांच्या मनावर उमटावा. अशा स्त्री-प्रतिमांमधून स्त्री-स्वातंत्र्य या संकल्पनेविरूद्ध एक दहशतवाद वाचक-प्रेक्षकांच्या मनावर ठसावा म्हणून प्रयत्न दिसतो. पारंपरिक मूल्यांना कवटाळून वाट्याचे जगणं जगणाऱ्या व आयुष्य कुरकुरत पण बिनबोभाटपणे जगणाऱ्या स्त्री-प्रतिमा यशस्वी झाल्याचे ते दाखवितात.

'पुरुष' मधील अंबेचा अपवाद केला तर दळवींनी रंगविलेल्या स्त्रीपात्रांचे नमुने वरील प्रकारचेच आहेत. अंबू अन्यायाला वाचा फोडू पाहाते, मात्र त्यात ती सर्वस्वी अपयशी ठरते. अंबूचे अपयशी ठरणे वास्तवाला धरूनच आहे. पण त्या वास्तवाला कठोरपणे भिडण्यापेक्षा दळवींची प्रतिभा सवर्णीय व दलित या दोनही वर्गांतील पुरुष स्त्रीकडे एकाच मूल्यदृष्टीतून पाहात असतो. स्त्रीचे शोषण, स्त्रीवर होणारा सामाजिक व मानसिक अन्याय आणि स्त्रीयोनीचे पावित्र्य, या गोष्टींना दोन्हींकडील 'पुरुष' सारखेच महत्त्व देतो. यांसारख्या विचारांच्या प्रतिपादनात गुंतते. परिणामी धीट व अन्यायाविरूद्ध लढणाऱ्या अंबूपेक्षा तिच्या दलित प्रियकराच्या वर्तनाची चर्चा नाटकात व नाटकाबाहेर अधिक होत राहिलेली दिसते. 'लग्न' मधील 'आई' नवऱ्याचा भूतकाळ विसरते. तो विसरण्यामागे काही वैचारिक मंथन घडले आहे असे नाही. तर तिला कॅन्सर झाला आहे. ती काही काळाची सोबती आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात जो रोगग्रस्ततेचा काळ उरला आहे तो काळ तिला सहजपणाने जगायचा आहे. जिचे 'लग्न' पुरेसे अपयशी ठरले आहे ती ही माता आपल्या मुलीचे अपयशी ठरू पाहणारे 'लग्न' मोडू नये अशी इच्छा मनी बाळगून जगते. मोडू पाहाणारे लग्न नव्याने जुळावे, उभारावे म्हणून तसे स्वप्न पाहाते. 'लग्न' मधील ही मुख्य स्त्री-प्रतिमा लक्षात घेतली तर नाटककार म्हणून दळवींनी अवलंबिलेली मूल्ये आधुनिक काळातील संघर्षात तावून सुलाखून निघालेली नाहीत. नाटककार आधुनिक काळातील असला तरी स्त्री-पात्रांची मनोभूमी साकारताना तो जुनाट, कालबाह्य मूल्यांचाच अवलंब करतो.

'पर्याय' मध्ये स्त्रीशोषणाचे भडक चित्रण करताना दळवी मुलीच्या बापाची अनाठायी नम्रता, मुलींचे अपरिमित सहनशील असणे अधोरेखित करतानाच खुद्द स्त्रीच स्त्रीचे शोषण करीत आहे, हा सर्वसामान्यांना सोयीचा वाटणारा सिद्धांत 'सासू' या पात्रचित्रणाच्या मुळाशी ठेवतात. खरे तर मातेच्या पदराखालून बाहेर न आलेला मुलगा हाही एक स्तर नकळतपणे 'पर्याय' ला प्राप्त झालेला होता.

मराठी रंगभूमी व रसिक कृतज्ञतेने दीर्घकाळ लक्षात ठेवील असे नायक चिं. त्र्यं. खानोलकरांनी रंगभूमीवर आणले. उदा. 'एक शून्य बाजीराव' मधील बाजीराव, 'अवध्य' मधील गंगाधर, 'सं. अभोगी' मधील विदूषक इ. पण सर्व रसिकांचे लक्ष वेधून घेईल अशा एकाही स्त्रीपात्राला त्यांनी नाट्यरूप दिले नाही. त्यांनी निर्मिलेली गौरी (एक शून्य बाजीराव), कांचन, नीला (अवध्य), गंगनगंधा, मीनाक्ष, (सं. अभोगी) ही स्त्री पात्रे काहीसे वेगळे आयुष्य जगतात. उदा. रंगभूमीवरील प्रेमापोटी व कलेच्या आसक्तीपोटी गौरी श्रीमंत इनामदारांची मागणी नाकारते. कांचन नटी म्हणून यशस्वी होण्यासाठी समाजाला मान्य नसलेल्या गोष्टी करते. नीला शरीरसुखासाठी घर सोडून येते. इ. पण या साऱ्या स्त्रिया पारंपरिकच मूल्ये मानतात. यातील प्रत्येकीला 'हक्का' चा नवरा, हक्काचे मूल, घर असे सारे काही हवे आहे आणि ते मिळविण्यासाठी काय वाटेल ते करण्याची त्यांची तयारी आहे. पारंपरिक मूल्यांच्या पार्श्वभूमीवर खानोलकर स्त्रीची स्खलनशील प्रतिमा रंगवितात. कारण नाट्यगत स्त्रीरूपाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी ही पारंपरिकच स्वरूपाची आहे.

रंगभूमीवरील या असंख्य स्त्रीपात्रांकडून जेव्हा आपण विजय तेंडुलकरांनी रंगविलेल्या स्त्रीपात्रांकडे येतो, तेव्हा काही निरीक्षणे नोंदविता येतात. सर्वसाधारणपणे तेंडुलकर नायकाभोवती नाट्यसूत्राची गुंफण करतात असे दिसते. (अपवाद : शांतता! कोर्ट चालू आहे) दुसरे म्हणजे त्यांच्या नाटकात किमान दोन स्त्रीपात्रे असतात. मुख्य नाट्यसूत्राचे सारे संदर्भ या स्त्रीपात्रांपाशी येतात.

सभोवतालच्या स्त्रीच्या स्थितिगतीची कणव वाटून संवेदनशील, कनवाळू पुरूषांची स्त्री - सुधारणेचा प्रारंभ करणारी चळवळ एकोणिसाव्या शतकात उभारली होती. त्या चळवळीची व पुरुषांना स्त्री - शोषणाविषयी वाटणाऱ्या अनुकंपेची आठवण व्हावी अशा पद्धतीने दळवी जेव्हा 'पर्याय' मधील तिसऱ्या सुनेची बंडखोर (!) प्रतिमा रंगवितात तेव्हा त्यामागील त्यांची जीवनदृष्टी पारंपरिकच असते, असे म्हणायला हवे.

रत्नाकर मतकरींनी आपल्या 'अग्निदिव्य' या नाटकात हुंडा समस्या अधिक गंभीर, समंजस व कलात्मरीत्या हाताळली आहे. या नाटकात मृदुला, तिची आई, तिची सासू या तीन स्त्री-प्रतिमा आहेत. मृदुला ही शोषित, पीडित व अन्यायग्रस्त स्त्रीपात्र आहे. सदर नाटकातील सारे प्रसंग मृदुलाच्या माहेरी म्हणजे जणू मातापित्यांच्या साक्षीने साकारतात. तिच्या सासरी जे - जे घडले, जे तिने भोगले तेच पुन्हा सादर केले जाते. या प्रकारे नाट्यप्रसंगाची मांडणी केल्यामुळे सामाजिक चालीरीती, त्या चालीरीती जोपासणारी, वाढविणारी माणसे आणि त्यांची मानसिकता प्रकर्षाने अधोरेखित होते. या नाटकातील शोषित मृदुला सायन्सची पदवीधर आहे. पण सामाजिक जीवनात वाट्याला आलेल्या समस्यांवर मात करण्याचे मानसिक सामर्थ्य तिच्यात नाही. कारण पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत मुलगी ज्या मूल्यांचे जतन करून वाढविली जाते, त्या मूल्यांच्या प्रत्यक्षाप्रत्यक्ष संस्कारांमुळे ती मानसिकदृष्ट्या दुबळी राहाते. तसेच सुशिक्षित होण्यासाठी ती जे शिकते ते शिक्षण तिला स्वत:ची मानसिक शक्ती वाढविण्यास पूरक ठरत नाही. परिणामी आधुनिक काळातही स्त्री दुबळी, मनोबल हरविलेली ठरत आहे. पुरुषप्रधान समाजरचनेने निर्माण केलेल्या संकेतांचा ती बळी ठरत

आहे. हे संकेत निर्माण करण्यात, आंधळेपणाने ते जोपासण्यात प्रत्येक मुलीचा भाऊ, तिचे वडील साहाय्यभूत घटक ठरत असतातच. या विदारक व विपरीत सामाजिक वस्तुस्थितीची जाणीव मृदुला या स्त्री प्रतिमेतून होते तर मुलीच्या सुखदुःखाविषयी काही बोलण्याचा, ठरविण्याचा कोणताच अधिकार नसलेली, तसा अधिकार असायला हवा याची जाणीव नसलेली मातृप्रतिमा म्हणून आई या स्त्रीपात्राचा आणि त्यातून अर्थपूर्ण संदर्भवलय निर्माण होते. तेंडुलकरनिर्मित स्त्रीपात्रे सामाजिक, राजकीय, धार्मिक आदी वेगवेगळ्या संस्थाव्यवस्थांच्या व यमनियमांच्या बळी आहेत. या साऱ्या संस्थांची मुख्य सूत्रे पुरुषांच्या हातात आहेत. नियमही त्यांनीच बनविलेले आहेत. हे नियम बनविताना स्त्री हा सामाजिक घटक सर्वस्वी आपल्या कह्यात राहील, आपण केंद्र आणि ती परीघ अशी व्यवस्था त्याने केली आहे. विशेष म्हणजे हा व्यूह अशा पद्धतीने रचला आहे की, या व्यूहात आपली फसवणूक, कुचंबणा व शोषण होत आहे, हे मुद्दाम विचार केल्याशिवाय स्त्रीला कळू नये. बहुदा स्त्रीला हे कळतच नाही, जिला हे 'सत्य' कळते तिचा प्रवास यातनागर्भ होतो. तिच्या जागे होण्यात तिच्या वेदनेचा जन्म होतो. एकीमुळे दुसरी 'जागी' होते. अशी 'जागृत' झालेली एखादी ओळखीच्या आणि सलगीच्या मृतवत जगण्यातून क्षणकाल सुटू पाहाते, (सरिता - 'कमला') कधी एखादी जागी होऊनही जाग आल्याचे हेतुतः स्वीकारत नाही. (सुमित्रा - 'घरटे अमुचे छान') काहींना काही जाणवतच नाही. उलट काही वेगळे जगू पाहणाऱ्या स्त्रीचा अथवा जीवनाच्या रेट्यात वेगळे जगावे लागलेल्या स्त्रीचा बळी घेणाऱ्या कारस्थानात ती उत्साहाने सामील होते. (पाहिजे जातीचे, सखाराम बाईंडर, शांतता! कोर्ट चालू आहे) तेंडुलकर परस्परविरोधी संबंधांवर आधारलेल्या स्त्री-प्रतिमा निर्माण करतात. पण त्या स्त्रीपात्रांनी स्वीकारलेली / अवलंबलेली जीवनमूल्ये सारखीच असतात. हे त्यांनी जवळजवळ सर्वच नाटकांतून यशस्वीरीत्या दाखवून दिले आहे.

उदा. 'श्रीमंत' मधील अविवाहित गर्भवती मथुरा आणि तिची आई, तिची वहिनी या स्त्रीपात्रांनी अंगिकारलेली जीवनमूल्ये सारखीच आहेत. मथुरेचे विवाहापूर्वी गरोदर असणे हा केवळ अपघात आणि फसवणूक आहे. त्यापाठीमागे त्या स्त्रीपात्राची कोणतीही विशेष 'भूमिका' नाही. असेच 'शांतता! कोर्ट चालू आहे' मधील बेणारेविषयी म्हणता येईल. बेणारेची आजची स्थितिगती ही सामाजिक परिस्थितीचा आणि विशिष्ट मूल्यप्रणालीचा परिपाक आहे. 'कमला' मधील कमलाला तर आपण पुन्हा - पुन्हा विकले का जात आहोत हा प्रश्नही पडत नाही. खरं तर तिला असा प्रश्न पडू नये असा संस्कारच तिच्यावर पुरुषप्रधान व्यवस्थेने केलेला आहे. ती त्या संस्काराची वाहक असते. ती जे जगते ते तिचे भोग असतात. स्त्री- शोषणाच्या प्रगट अप्रगट अशा अनेक तऱ्हा तेंडुलकरांच्या नाटकात आपल्या प्रत्ययाचा विषय होतात. त्याचबरोबर त्या शोषणामागील व्यवस्थेचे, तिच्या एकांगी नीतिनियमांचे भयावह दर्शनही आपल्याला घडते.

तेंडुलकरांची जवळजवळ सारी स्त्री-पात्रे परात्म, मृतवत आयुष्य जगतात. ही पात्रे प्रगट अप्रगट शोषणाचे बळी असतात. त्यांना त्यांचेच दुःख विशाल होऊन जाणवत नाही. परंतु त्यामागील नाटककाराचे जीवनभान व जीवनदृष्टी प्रगल्भ असल्याने ही सारे स्त्रीपात्रे स्त्री-दुःखांचे, स्त्रीच्या यातनांचे विदारक व शोकगर्भ दर्शन घडवितात. त्या वाचकप्रेक्षकांना अंतर्मुख व्हायला भाग पाडतात.

एकीकडे या प्रकारच्या स्त्री-प्रतिमा मराठी रंगभूमीवर साकारत होत्या तर दुसरीकडे पारंपरिक जीवनमूल्ये उराशी कवटाळून त्यासाठी जगणाऱ्या स्त्री - प्रतिमांचे दर्शन घडविले जात होते. महेश एलकुंचवारांनी इतर संदर्भात महत्त्वाची ठरणारी नाटके लिहिली असली, तरी स्त्रीपात्रांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन पारंपरिकच असलेला दिसतो. 'वासनाकांड' मध्ये लाली आपल्या भावाशी संबंध ठेवते हे खरे आहे. या कृतीमुळे ती प्रस्थापित रंगभूमीवरील स्त्रीपात्रांपेक्षा वेगळी ठरते हेही खरे आहे. पण भावाशी संबंध ठेवणे हा निर्णय तिचा नाही. तसेच या प्रकारच्या संबंधांमुळे निर्माण झालेल्या संघर्षात ती गावकऱ्यांच्या कोपाला घाबरून शरण जाते. विशिष्ट परिस्थितीत एखाद्या व्यक्तीला अखेरीस समाजबंधनांना शरण जावे लागते, हा सिद्धांत स्वीकारून 'वासनाकांड' मधील स्त्रीपात्राचा विचार केला तरी हे स्त्रीपात्र वैचारिकतेशी आपले नाते सांगत नाही. त्यामुळे तिने भोगलेल्या वासनेचा उन्माद हा एका पुरुषाची लहर ठरते. अर्थात अशा रचनेमुळेच पुरुषप्रधान व्यवस्था स्त्रीला (अगदी बहिणीलाही) आपल्या वासनेचा बळी कसा ठरविते याचे स्वच्छ दर्शन घडते. तसेच त्यामागील नाटककाराची गंभीर जीवनदृष्टीही कळते.

हा नाटककार आपल्या वेगवेगळ्या नाटकांत स्त्रीच्या मानसिकतेचाही गंभीरपणे शोध घेऊ पाहात असल्याचे जाणवते. असे असले तरी या नाटककाराची स्त्रीकडे, तिच्या भावनिक, मानसिक व कौटुंबिक विश्वाकडे पाहण्याची दृष्टी ही पारंपरिक आहे. उदाहरणादाखल - 'वाडा चिरेबंदी' आणि 'युगांत' मधील स्त्री प्रतिमांचा विचार करता येईल. या नाटकांमध्ये परस्परविरोधी मूल्यदृष्टी असलेल्या स्त्री-प्रतिमा आहेत. मात्र यांतील मुख्य स्त्रीपांत्रांचा (दादी, आई, वहिनी, अंजली, नंदिनी) नाट्यगत जीवनप्रवास हा परंपरेशी जिव्हाळ्याचे नाते सांगणारा आहे. अंजली प्रारंभी सासरच्या मंडळींविषयी अनुत्सुक असली तरी त्यापाठीमागे कोकणस्थ व देशस्थ अशा विभागीय भेदाची दृष्टी आहे. परंतु हळूहळू ती हा भेद मागे टाकते आणि ती अधिकाधिक सासरची होते. या उलट नंदिनी ही

देशपांड्यांच्या चौथ्या पिढीतील स्त्री (सून) असून ती पारंपरिक मूल्यभाव आणि 'स्व' अस्तित्व यांचे वेगळेपण, या दोन्ही गोष्टी शिताफीने जुळविते. नंदिनीच्या अशा प्रतिमेत पारंपरिकता व वैयक्तिक मतप्रणाली यांचे सम्यक मिश्रण असलेले दिसते. परंतु एलकुंचवारांच्या नाटकांतील एकूण स्त्री-प्रतिमा या पारंपरिक मूल्यांशीच जिव्हाळ्याचे नाते सांगताना दिसतात.

महेश एलकुंचवारांनंतरचा महत्त्वाचा नाटककार म्हणून सतीश आळेकरांचा उल्लेख करायला हवा. आळेकरांनी जाणीवपूर्वक स्त्रीकेंद्री नाटक लिहिलेले आढळत नाही. पात्रांचे मानसिक विश्व आणि त्यामागील सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण या सूत्रांभोवती त्यांनी आपली नाट्यकथानके गुंफली आहेत. 'महानिर्वाण' या नाटकात त्यांनी मराठी रंगभूमीवर अपरिचित आणि त्याचबरोबर विपरीत वाटेल अशी स्त्री-प्रतिमा साकारली. ही स्त्री-प्रतिमा (रमा) पत्नी आणि माता अशा दोन्ही रूपांत अपरिचिततेचा व विपरीततेचा अनुभव देते. या स्त्रीपात्राने रंगभूमीवर प्रथमच आपल्या मनातील कामभावाचा स्पष्टास्पष्टपणे उच्चार केलेला आहे. तिचे दैनंदिन वर्तन हे समाजमान्य रूढ संदर्भांशी व वर्तनाशी निगडित आहे. मात्र तिचे मानसिक विश्व या वर्तनाच्या कोषात राहूनही वेगळे काही सांगू, बोलू पाहते. खरे तर काही काळ तिचे जगणे दुभंगलेले आहे. परंतु ती तसे भासू देत नाही. ती जगण्याची एक वेगळी तऱ्हा पडताळून पाहते. ही तऱ्हा समाजमान्य सांस्कृतिक संकेतांना धक्का पोहोचविणारी आहे, हे तिला चांगले कळते. किंबहुना हे कळल्यानंतरच ती सांस्कृतिक संकेतांना नकार देण्याचे अटळपणे टाळते आणि परिस्थितीशरणता स्वीकारते. स्त्री-मनातील अशाा आंदोलनांची सूक्ष्म जार मराठी रंगभूमीवर अपवादानेच आढळते.

आळेकरांनंतर अनेक नाटककारांनी नाट्यलेखन केलेले आहे. त्या सर्व नाटककारांचा येथे उल्लेख करणे शक्य नाही. मात्र प्रशांत दळवी (चारचौघी), चेतन दातार (सावल्या), जयंत पवार (माझं घर), अशोक पाटोळे (आई रिटायर होतेय!) आणि राजीव नाईक (साठेचं काय करायचं) या नाटककारांचा आणि त्यांच्या नाटकांचा विचार थोडक्यात करणार आहे. हे सर्व नाटककार उत्तर आधुनिक काळातील नाटककार आहेत. त्यांच्या अवतीभवती स्थित्यंतरांना अनुकूल अशा परिवर्तनवादी चळवळी नव्या जोमाने कार्यशील झालेल्या होत्या. प्रत्येक चळवळीत नवे नेतृत्व प्रकट होत होते. या चळवळींमध्ये स्त्रीवादी चळवळही आहे. अशा काळात लेखन करणारे हे नाटककार आहेत हे मुद्दाम नोंदवायला हवे. दळवींचे अलीकडे गाजलेले एक नाटक म्हणजे 'चारचौघी' होय. हे नाटक चार स्त्रीपात्रांभोवती गुंफलेले आहे. नाट्यगत आशयाच्या दृष्टीने पाहता ही चारही स्त्रीपात्रे महत्त्वाची आहेत. यातील प्रत्येकीचा एक स्वतंत्र प्रवास आहे. त्याचबरोबर त्या चौघी 'स्त्रीचे स्वातंत्र्य' या सूत्राने एकमेकींशी जोडलेल्या आहेत. नाटकात 'आई' हे मुख्य पात्र आहे. कारण या पात्राने एके काळी घेतलेल्या विशिष्ट निर्णयामुळे त्या तिघींच्या जीवनात काही अटीतटीचे प्रश्न निर्माण झालेले आहेत आणि प्रत्येकीला निर्वाणीचा निर्णय घेण्याची वेळ आली आहे. मोठ्या मुलीला परस्त्रीशी संबंध ठेवणाऱ्या नवऱ्याला स्वीकारायचे की नाही याविषयीचा निर्णय घ्यायचा आहे. मधल्या मुलीला काहीच न करता पारंपारिक मूल्यांनी स्वतःला जखडून घेतलेल्या नवऱ्याबरोबरच संसार पुढे रेटत न्यायचा की असा संसार मोडून टाकायचा, हे ठरवायचे आहे आणि तिसरीला विशिष्ट समस्या उलगडण्यासाठी दोन्ही मित्रांना तिच्याशी लग्न करण्यसाठी तयार करायचे आहे. शिवाय तिची ही अशी भूमिका कुटुंबीयांनाही समजून द्यायची आहे. या तिघीही आपली भूमिका आपापल्या निर्णय प्रसंगी इतर पात्रांना समजावून सांगतात. पण एकमेकींना काही समजून सांगण्यात त्यांना यश येत नाही. यातील पहिल्या दोघी परिस्थितीशरणता स्वीकारतात आणि तिसरीचा निर्णय अधांतरीच राहतो. या तिन्ही स्त्रीपात्रांसमोर जे प्रश्न उभे राहिले आहेत ते प्रश्न विशिष्ट समजरचनेने निर्माण केलेले आहेत. प्रस्तुत नाटकातील स्त्रीपात्रे काही वेगळे जगत असल्या तरी आई व सर्वात लहान मुलगी यांचा अपवाद करता उरलेल्या दोघी समाजाने अंगिकारलेल्या संकेतांना पूर्णपणे स्वीकारणाऱ्या आहेत. आई तिच्या तारुण्यात वेगळ्या पद्धतीने जगण्याचा निर्णय घेते आणि त्या निर्णयाचे सारे चांगले-वाईट परिणाम भोगते. परंतु म्हणून तिला व्यक्तीने समाजजीवनात स्व-तंत्र होण्याचा गर्भितार्थ उमेगला आहे, असे नाही. या प्रकारच्या स्त्रीपात्रांची निर्मिती करणारा नाटककार एक अपरिचित विषय एवढ्या मर्यादित दृष्टीनेच या पात्रांकडे पाहतो. या नाटकातील स्त्रीपात्रांप्रमाणेच असतो. त्यात मूल्यांची, जाणिवेची 'खोली' असलेली जाणवत नाही. मात्र दळवींची 'चाहूल' मधील नायिका (नायकही) सभोवतालच्या भ्रष्ट जीवनस्थितींचे, उथळ जगण्याचे व अविवेकी मूल्यसरणीचे अधिक गंभीर व विदारक दर्शन घडविते.

चेतन दातारांचे 'सावल्या' हे नाटक फक्त स्त्रीपात्रांना केंद्रस्थानी ठेवून लिहिले गेलेले आहे. या नाटकातील पाठोपाठच्या तिघी बहिणी, त्यांनी आजी, त्यांची मरण पावलेली आई, त्यांची शेजारीण आणि तिघींची मैत्रिणी इतकी स्त्रीपात्रे आहेत. या स्त्रीपात्रांचा सर्वसाधारण सामाजिक दर्जा कनिष्ठ मध्यमवर्गीय आहे. ज्या मुलींभोवती 'सावल्या' चे कथानक विणले जाते, त्या मुली जातीने ब्राह्मण आहेत. पण त्यांनी ब्राह्मणांना वर्तनधर्म जवळजवळ सांडलेला आहे. पण तो जाणीवपूर्वक नाही. त्यांच्या कुटुंबात असे काही विपरीत घडले पित्याचे घर तिचे असत नाही. लग्नानंतर कोणत्याही कारणामुळे अथवा कुणाहीमुळे (स्त्री किंवा पुरुष) तिला घटस्फोट मिळाला

किंवा घटस्फोट घ्यावा लागला तर सासरचे घर तिचे राहत नाही. 'जन्माला आलेली प्रत्येक मुलगी एखाद्या घरातच वाढते, एखाद्या घरात सून म्हणून जाते. एका घराकडून दुसऱ्या घराकडे तिचा प्रवास होतो पण तिला तिचे घर असत नाही.' या सूत्राभोवती हे नाटक गुंफलेले आहे. मात्र प्रत्यक्षात त्यातील नायिका, तिची सासू, तिची नणंद ही स्त्रीपात्रे हा विचार व त्यामागील गांभीर्य समजून उमजून जगत आहेत किंवा तसे आयुष्याचे निर्णय घेत आहेत असे होत नाही. या स्त्रीपात्रांच्या नाट्यगत कृतिउक्ती पाहता मानवी संबंधांतील जिव्हाळा, सौहार्द त्या तिघींना कळला आहे, हे म्हणणे धाडसाचे ठरेल. सगळे नाटक भावनांच्या क्षोभावर उभे राहते. या नाटकातील सासूच्या वैशिष्ट्यपूर्ण भूतकाळ व तिच्या नणंदेचा बिनबुडाचा विचार नाटकांतून वजा केला तर नाटकात काय उरेल, असा प्रश्न मनाशी येतो. तसेच या नाटकात पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषाच्या लहरीमुळे भरडल्या गेलेल्या नायिकेची वैचारिक पातळी अतिशय सामान्य अशीच राहते. नाटककार गंभीर विषयाची निवड करतो, पण त्या विषयाचा मांडणी सामान्य व उथळ पातळीवरच होते असे खेदाने म्हणावेसे वाटते. कारण स्त्री-पात्रे सभोवतालच्या समाजात जे संथगतीने पण निश्चितपणे बदलत आहे, अशा मूल्यबदलांविषयी अनभिज्ञच आहेत. असे घडते कारण नाटककारही त्याकडे पुरेशा डोळसपणे पाहत नाही.

'आई रिटायर होतेय!' या नाटकार मातृरूपातील स्त्री केव्हाही कौटुंबिक जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही, किंबहुना बदलत्या काळात नोकरी करू लागलेल्या स्त्रिया वयोवृद्ध सासूला अथवा मातेला (स्त्रीला) खऱ्या अर्थाने समजून घेऊ शकत नाहीत, नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या स्त्रिया संधिसाधू होत आहेत, त्या घरातील वयस्कर स्त्रीचा सहानुभावाने विचार करु शकत नाहीत, अशा वास्तवस्थितीला प्रकट करण्याचे कार्य सदर नाटक करते. परंतु त्या पलीकडे जाऊन या नाटकात वैचारिक पातळीवरील संघर्ष स्त्रीपात्रांमधून साकारत नाही. इथेही भावनिक पातळीचे दर्शन अग्रसेर राहते. दुसरे असे की, या नाटकातील स्त्रीपात्रे मर्मग्राही तर दूरच पण सामान्य माणसाला सुचणाराही विचार करीत नाहीत.

भारतीय समाजव्यवस्थेने स्त्रियांच्या वाट्याला ज्या प्रकारची कामे दिली त्या कामांचा दर्जा निकृष्ट व बिनमहत्त्वाचा मानला. समाजात हा विचार हजारो वर्षे झिरपत आजही दृढ झालेला दिसतो. अवतीभोवतीच्या वास्तवाने काहीशी आहे की, त्यामुळे त्यांचे कुटुंबगत भावविश्व पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे, प्राप्त परिस्थितीशी त्या जुळवून घेतात. त्या जुळवून घेण्याच्या पद्धतीतच त्यांना त्यांचा विशिष्ट वर्तनधर्म सांडावा लागतो. याचा अर्थ त्यांचे 'आज' चे विशिष्ट जगणे ही त्यांची प्राप्त परिस्थिती आहे आणि या परिस्थिवर पुरुषाच्या भोगवादी जगण्याची, भोगवादाला बळी पडण्याच्या स्त्रीच्या दुर्बलतेची, वृत्तीची मोहर उमटलेली आहे. इथल्या स्त्रियांच्या मनातही मोह निर्माण होतात. त्या मोहाप्रमाणे त्या जगतात. पण अखेरीस त्यांना त्याचे विपरित परिणाम भोगावे लागतात. या परिणामांचा एक म्हणजे त्यांचे मानसिक जगणेही विचलित होते. इतकेच नाही तर त्यांचे मनासारखे जगण्याबोलण्याचे सारे मार्ग एकमुखाने बंद होतात. त्या तिघींचे हे जगणे दुःखदायक व वेदनादायक आहे. विशिष्ट मूल्यांचा स्वीकार करणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीमुळे, काही पुरुषांच्या भोगवादी दृष्टीमुळे आणि त्यांच्या नाकर्तेपणामुळे काही स्त्रियांना सरळ, साधे, सामन्य अपेक्षांचे आयुष्यही सुखाने व विवंचनेशिवाय जगता येत नाही. जे जगणे त्यांच्या जीवनाचा अपरिहार्य भाग होते, ते जगणेही सुसह्य करून जगण्यासारखी स्थिती राहात नाही. जगण्याचे पर्याय निवडण्याचे त्यांचे स्वातंत्र्य संकुचित केले जाते. खरे तर हे स्वातंत्र्य इतके संकुचित केले जाते की, ते त्यांना जवळ जवळ नसतेच अशा विदारक अनुभवापर्यंत त्या तिघी व आजी स्त्रीपात्रांचे नाट्यगत जीवन आपल्याला घेऊन येते.

स्त्री-मतस्वातंत्र्य, स्त्रीचे प्रश्न, त्यामागील सामाजिक स्थितिगती यांचे नेमके भान जाणिवेच्या पातळीवर नाटककाराला पूर्णत्वाने नसले तरी त्याने निर्मिलेली ही स्त्रीपात्रे स्त्रीच्या घुसमटण्याचे चित्रण सामर्थ्याने करतात आणि वाचक-प्रेक्षकांना अंतर्मुख व्हायला भाग पाडतात.

यानंतर जयंत पवारांच्या अलीकडे गाजत अलसेल्या 'माझं घर' चा विचार करता येईल. एकून मानवाच्या सामाजिक विश्वात स्त्रीला खूपदा दुय्यम स्थान मिळालेले आहे. पण असे घडलेले नाही हे भासवून देण्याकरिता आपण गार्गी, मैत्रेयी, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे अशा काही जुन्या नव्या स्त्रियांची उदाहरणे सतत देत असतो. खरं तर ही उदाहरणे म्हणजे स्वप्रयत्नाने स्वतःचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रियांची आहेत. अशा स्त्रिया संख्येने कमीच असतात आणि त्यांना समाजात स्वस्थान मिळविण्यासाठी जे जगलेले व भोगलेले असते, त्याचा कालपरत्वे समाजाला विसर पडलेला असतो. आपल्या समाजरचनेत व कुटुंबरचनेत स्त्रीला हक्काचे घर नाही. लग्न होऊन नवऱ्याचे घरी जायचे असते, अशा रीतिविवाजामुळे तिच्या मातेचे(?) सभान झालेली स्त्री या वास्तवाकडे कसे पाहत आहे, त्यातून तिला काही जाणवते आहे का? आणि जाणवत असल्यास काय जाणवते, त्या जाणवण्याचे स्वरूप काय? तिला तिच्या 'साधनरूपा' ची पुसटशी तरी जाणीव होते का? असे कितीतरी साधे सोपे प्रश्न नाटकात नाट्यरूप घेऊ शकले असते; परंतु 'आई रिटायर होयेय' मध्ये असे घडत नाही. रिटायर होण्यासाठी आईच्या मनात कोणताही वैचारिक संघर्ष उभा राहत नाही, विशेष असे की, ही सारे स्त्रीपात्रे पारंपारिक मूल्यांचा,

जीवनाचा व दृष्टीचा पुरस्कार करणारी आहेत आणि त्यावर त्यांची निष्ठाही आहे.

राजीव नाईक यांचे 'साठेचं काय करायचं' हे नाटक दोन पात्रांभोवती रचलेले आहे. पुरुषपात्र आणि स्त्रीपात्र अशी पात्रांची निवड आहे. पुरुषपात्र नाट्यकथेच्या केंद्रस्थानी आहे आणि स्त्रीपात्र त्याला पूरक ठरेल असे आहे. हे स्त्रीपात्र म्हणजे सलमा होय. प्रस्तुत नाटक प्रामुख्याने दोनच पात्रांच्या जीवनातील घटनांशी निगडित आहे. त्यामुळे येथे स्त्रीपात्राला महत्त्व येते. तरीही या स्त्रीपात्राचे नाट्यगत कार्य काय, असा प्रश्न उपस्थित करता येईल. सलमा धर्माने मुस्लिम असून तिने हिंदू मुलाशी लग्न केले आहे. पण नाटकात हा मुद्दा महत्त्वाचा नाही. या नाटकात वेगवेगळ्या क्षेत्रातील गटबाजी, गटबाजीचे राजकारण आणि त्याचा त्या गटबाजीत असणाऱ्यांवर व थेटपणे नसणाऱ्यांवर होणारा अंतर्बाह्य परिणाम याला महत्त्व असेलेले दिसते. या प्रकारच्या प्रवासात नायकाची आंतरिक घुसमट आहे. त्याचा मतलबीपणा व संधिसाधूपणा आहे. इतरांच्या गटबाजीला उत्तर देण्यासाठी त्याने आखलेले डावपेच आहेत. तसेच त्या डावपेचांमधील यशापयश आहे, लबाडी आहे. या संपूर्ण प्रवासात सलामाला विशेष स्थान नाही. ती इंग्रजी विषयाची प्राध्यापिका आहे. तिचे काही व्यक्तिगत संघर्ष आहेत. पण ती समजूतदार असल्याने (नाटककाराने तिला समजूतदार ठेवल्याने) त्याच्या मानसिक उलघालीत तिच्या मनातील लहानसहान दुःखही पुरेसे व्यक्त करण्याला अवसर मिळत नाही कारण त्याचे झगडत राहणे इतके तीव्र आहे की, त्या तीव्रतेत तिचे तीव्र दुःखही त्याला प्रतीत होऊ शकत नाही. पतिपत्नी संबंधामधील हा सूक्ष्म अंतराय नाईक सामर्थ्याने प्रकट करतात. त्याचबरोबर सभोवतालच्या सांस्कृतिक क्षेत्रातील भ्रष्ट राजकारणालाही पुरेसे मुखरित करतात. परंतु तरीही त्यांनी रंगविलेली सलमा सामान्य विचारांची, सामान्य कुवत असलेलीच असते. तिचाही त्याग, समर्पणादी पारंपरिक कल्पनांवर विश्वास आहे. स्त्रीपात्रचित्रणाच्या दृष्टीने सलमाचा विचार करताना आधुनिक काळातील स्त्री म्हणून सलमाचे कोणतेही वेगळेपण आपल्या प्रत्ययाचा विषय होत नाही. तिचे 'सलमा' असणेही वैशिष्ट्यपूर्ण ठरत नाही. पत्नी ही सहचारिणी असते या सूत्रातच हे स्त्रीपात्र अडकून पडते. ती नवऱ्याला त्याच्या विशिष्ट उक्तिकृतींचा जाब विचारते. ती विशिष्ट प्रसंगात त्याची समजूत घालते. ती त्याला त्याच्या मुखवट्यामागील 'चेहऱ्यां'चे दर्शन घडविते. त्याचबरोबर त्याच्या हताश अवस्थेत ती त्याची प्रेरकशक्ती म्हणून प्रकट होते. उत्तर आधुनिक काळातील एक संवेदनशील नाटककार स्त्रीपात्रांचे या प्रकारचे चित्रण करीत आहे. याकडे लक्ष द्यायला हवे. सलमा पुरुषाला घरात काम करावे लागत नाही याविषयी अधूनमधून उपहासाने बोलते; पण त्या उपहासातही एक प्रकारचा लाडिकपणा डोकावतोच. याउलट भा. वि. वरेरकरांनी आपल्या 'भूमिकन्या सीता' या नाटकात पारंपरिक स्त्री प्रतिमेला विरोध करणारी 'वासंती' हे स्त्रीपात्र रंगविले आहे हे लक्षात घ्यायला हवे. सलमा स्त्रीचा सहचारिणी असण्याचा जो धर्म कळत नकळतपणे स्वीकारते व तो स्वीकारताना प्रसंगवशात वेगवेगळी रूपे धारण करते. त्याप्रमाणे सीताही शक्य तेथे कळतनकळत रामाची कानउघडणी करते. विशेष म्हणजे 'भूमिकन्या सीता' मधील 'उर्मिला' स्ववैशिष्ट्यांनी आधुनिक स्त्री कशी असावी याचे जणू दर्शन घडविते. म्हणूनच उत्तर आधुनिक काळातील हा नाटककार (खरे तर सर्वच नाटककार) पुरेशा सहसंवेदनेने स्त्रीपात्राची निर्मिती करताना दिसत नाही. नाटकातील इतर पात्रांबरोबर एक स्त्रीपात्र एवढेच महत्त्व त्यांना कधी कधी प्राप्त होते, असे खेदाने म्हणावेसे वाटते.

यानंतर 'शोभायात्रा' (शफायत खान), 'माकडा हाती शॅम्पेन' (विवेक बेळे), 'फायनल ड्राफ्ट' (गिरीश जोशी) या नाटकांचा विचार करता येईल. 'माकडा हाती शॅम्पेन' आणि 'फायनल ड्राफ्ट' या नाटकांच्य छापील संहिता उपलब्ध नसल्यामुळे यातील स्त्री-पात्रांचा विचार केलेला नाही. 'माकडाच्या हाती शॅम्पेन' या नाटकातील 'पेन्सिल' हे स्त्री-पात्र मराठी रंगभूमीवरील अभिनव असे स्त्री-पात्र आहे. या स्त्री-पात्राचा विविध अंगाने विचार करणे संभवनीय आहे हे इथे नोंदवून ठेवते. 'शोभायात्रा' हे नाटक पुस्तकरूपाने प्रकाशित झाले आहे. 'शोभायात्रा' या नाटकात दोन स्त्री-पात्र आहेत. एक पत्रकार आणि दुसरी झाशीच्या राणीची भूमिका करणारी बाई. ही स्त्री-पात्र परस्परविरोधी स्त्री-प्रतिमा म्हणून एकमेकींच्य समोर येतात. पत्रकार असलेले स्त्री-पात्र हे अलीकडील काळात 'स्त्री' चं काही अंशी पालटलेलं जे रूप आहे. त्या रूपाला साकार करणारे आहे. उदा. हे पत्रकार स्त्री-पात्र मूल्यविषयक कोणतीच भूमिका ठामपणे स्वीकारताना दिसत नाही. भारताच्या स्वातंत्र्यास ५० वर्षे झाली म्हणून जी शोभायात्रा निघणार आहे त्या यात्रेचे चित्रिकरण करणे आणि त्यात सहभागी होणाऱ्या नटांच्या मुलाखती घेणे एवढे मर्यादित नाट्यकार्य या पात्राला लाभलेले आहे. या कार्याच्या निमित्ताने रङ्गमंचावर वावरणारे हे स्त्री-पात्र पुरुषांच्या मनातील स्त्रीविषयक विचार उघडपणे बोलून दाखविते. इतकेच नव्हे तर हे स्त्री-पात्र स्त्रीविषयक प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून ज्या विविध चळवळी झाल्या त्या चळवळींमुळे आणि उदारमतवादामुळे स्त्रीला प्रगतीच्या ज्या वेगवेगळ्या वाटा उपलब्ध झाल्या त्या वाटांनी प्रवास करताना स्त्रियांनी स्वतःला पटणारे असे एक वेगळेच भावविश्व स्वीकारलेले दिसते. हे भावविश्व 'बार्बी' या स्त्री-पात्राच्या उक्तिकृतीद्वारे अधोरेखित झालेले आहे.

उदा. शरीर गरज म्हणून बाबूशी प्रणय करणारी बार्बी भाईचा

फोन आल्यानंतर तितक्याच आनंदाने भाईकडे निघून जाते. हे पात्र योनिशुचिता, शीलसंपन्नता ही मूल्ये सहजभावाने नाकारताना दिसते. अशी स्त्री अमेरिकन असल्याचे रंगविण्यात नाटककाराचा कोणता हेतू असावा असा प्रश्न उपस्थित करायला हवा असे वाटतेह. याउलट नाटकात झाशीच्या राणीची भूमिका करणारे स्त्री-पात्र द्विस्तरीय पातळीवर वावरताना दिसते. झाशीच्या राणीची स्वातंत्र्याकांक्षा आणि त्यासाठी तिने केलेला पराक्रम हा ऐतिहासिक संदर्भ आणि नाट्यगत स्त्री-पात्राचे मूल न झालेली स्त्री म्हणून लौकिक जीवन यातील विरोधाभास येथे साकार होतो. तिच्या वाट्याला तऱ्हेतऱ्हाची हेटाळणी येते. तिने आपल्याला घटस्फोट द्यावा असे तिच्या नवऱ्याला वाटते आणि वंशविस्तारासाठी तो बाईने स्वीकारावा असे नवऱ्याच्या वकिलांना वाटते. याचा अर्थ पुरुषसत्ताक व्यवस्थेला आवाहन करणाऱ्या अनेक स्त्रीवादी चळवळी होऊनही आणि स्त्रीसंबंधी अनेक तऱ्हेचे विचारदर्शन प्रसृत होऊनही प्रत्यक्ष लौककिव्यवहारात बहुतांशी स्त्रियांचे आयुष्य पारंपरिक मूल्यांच्या पाठपुराव्यामुळे होरपळून निघालेले दिसते. स्त्रीवादी चळवळीनंतरसुद्धा पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या विचारव्यूहात बदल झालेला नाही हे नाटककाराला या 'स्त्री' पात्रांच्या माध्यमातून अधोरेखित करावयाचे आहे का? असाही प्रश्न येथे उपस्थित करता येईल. एकूण, काळ पुढे सरकत आलेला असला तरी स्त्री-पात्रांकडे बघण्याची नाटककारांची भूमिका आमूलाग्र बदललेली दिसत नाही.

दलित रंगभूमी ही एक वैशिष्ट्यपूर्ण रङ्गभूमी असून या रङ्गभूमीवरील स्त्री-प्रतिमांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. दलित नाटककार म्हणून दत्ता भगत, रामनाथ चव्हाण, बाजीराव रामटेके, प्रेमानंद गज्वी, टेक्सास गायकवाड, सिद्धार्थ तांबे हे नाटककार आपल्या नजरेसमोर येतात. १९८० पासूनच्या दलित नाटकांचा जरी विचार केला तरी मराठी रंगभूमीला विशेष योगदान देणाऱ्या नाटकांतील स्त्री-प्रतिमांचे स्वरूप सहज तपासता येण्यासारखे आहे. दलित नाटकांतील संघर्ष हा दलित विरूद्ध उच्चवर्णीय म्हणजे शोषित असा असतो हे सर्वज्ञात आहे. त्यामुळे नाट्यगत पात्रेही याच वर्णातील असतात. तसेच दलित नाटकही प्राधान्याने नायककेंद्री असते आणि हा नायक शोषित वर्गातील असतो. तनमाजोरी, कैफियत, गांधी - आंबेडकर अशा काही नाटकांचा अपवाद करता ह्या नाटकांनीही प्रामुख्याने कुटुंबाचाच स्थलावकाश व्यापलेला असतो. स्वाभाविकच दलित नाटकात प्रामुख्याने पत्नी, आई, मुलगी या नात्यांतील स्त्री-प्रतिमा मोठ्या प्रमाणावर रेखाटलेल्या दिसतात. काही स्त्री-पात्रे दलित तर काही स्त्री-पात्रे उच्चवर्णीय दिसतात. दलित स्त्री-पात्रे ही मुख्यत: शोषित पात्रे असतात तशीच ती परिस्थितीबरोबर समझोता करीत जगणारी असतात. त्याचबरोबर ती समजूतदारही असतात. अनेक दलित नाटकांत दलित पुरुषाशी विवाहबद्ध झालेली उच्चवर्णीय स्त्री-पात्रे सामोरी येतात. 'कोण म्हणतं टक्का दिला', मन्वंतर, वाटा - पळवाटा, खेळीया यांसारख्या नाटकांचा अपवाद केला तर उच्चवर्णीय स्त्रीला दलित नाटकांत पात्र म्हणून फारसे स्थान प्राप्त झालेले दिसत नाही. दलित व्यक्तीशी लग्न करून दलित कुटुंबात आलेली स्त्री-पात्रे ही विशेषत: ब्राह्मण जातीतीलच आहेत. हेही नजरेआड करण्यासारखे नाही. मात्र ही स्त्री-पात्रे काही खास वैशिष्ट्यपूर्ण आहेत असे नाही. 'बामणवाडा' मधील (रामनाथ चव्हाण) ब्राह्मण स्त्री-पात्र वगळले तर 'वाटा - पळवाटा' (दत्ता भगत), 'मन्वंतर' (टेक्सास गायकवाड) या नाटकांतील अनुक्रमे हेमा, तारा ही पात्रे मराठी रङ्गभूमीवरील स्त्री-पात्रांप्रमाणेच समर्पणशील, त्यागी सोशिक आदी गुणांनी मंडित झालेल्या दिसतात. 'मन्वंतर' मधील तारा गिरीशशी (नायकाशी) विवाह करण्यासाठी स्वत:च धर्म व त्या धर्मातील 'देवांचा सहजपणे त्याग करते. तर 'वाटा-पळवाटा' मधील हामाचे सासरे ती ब्राह्मण असल्याबद्दल तिच्यावर सतत टीकाटिप्पणी करतात. पण ती त्यावर संयमानेच आपल्या प्रतिक्रिया देते. दलितपण शिक्षित, सुसंस्कृत पुरुषाची निवड पती म्हणून त्या करतात. जन्मजात धर्माचा त्या सहजतेने त्याग करतात असे रंगविलेले दिसते. मात्र त्यांच्या ह्या प्रवासामागील त्यांच्या ठायीच्या वैचारिक क्षमतांचे दर्शन घडविले जात नाही. त्यामुळे ही स्त्री-पात्रे अविश्वसनीय वाटण्याची अधिक शक्यता दिसते.

मराठी रंगभूमीवर पुरुष नाटककारांनी वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. स्त्रियांनी अपवादांनीच नाटके लिहिली आहेत परंतु अपवादानेच त्यांचे प्रयोग झाले आहेत. त्यातील ज्योती म्हापसेकरांच्या 'मुलगी झाली हो!' आणि सई परांजपे यांच्या 'माझा खेळ मांडू दे' या नाटकांचा थोडक्यात विचार करायचा आहे. ह्या दोन्ही नाटककार स्त्रिया उत्तर आधुनिक काळातील आहेत. त्यांच्या सभोवतालच्या समाजात जी उलथापालथ होत होती, तिचा त्या एक संवेदनशील घटक होत्या. त्यामुळे लग्न, हुंडा, चालीरीतींमधील एकांगीपणा व विपरीतता, स्त्रीचे सर्वस्तरीय शोषण, पुरुषप्रधान व्यवस्थेतील मुजोरपणा, स्त्रीची घडत जाणारी दुबळी मानसिकता, तिचा संसार तगविण्याची धडपड आणि तिचे परात्मपण या साऱ्या गोष्टी त्या दोघींच्या सर्जनशीलतेचा विषय आहेत. या दोघींनी फार गंभीरपणे स्त्री-प्रश्नांना नाट्यरुप देण्यात यश मिळविले आहे असे, म्हणावे लागेल. ज्योती म्हापसेकर वैचारिक आदानप्रदानासाठी, परिवर्तनवादी विचारांच्या अभिव्यक्तीसाठी पथनाट्याचा रूपबंध स्वीकारतात. त्यामुळे स्त्रीमुक्तीचा नवा प्रवाह पुढे नेला जातो. पण त्यातही त्या विचारंपेक्षा भावनिकतेला आणि बुद्धीपेक्षा मनालाच आवाहन करतात. मागे म्हटल्याप्रमाणे भावनिक आवाहन रोजच्या गर्दीच्या, कुचंबलेल्या धावपळीत विरून जाऊ शकते आणि जातेही. सई परंजपेंनी निर्मिलेली नायिकाही फार वैचारिक पातळीवर कालक्रमण करीत नाही. 'माझा खेळ मांडू दे' मधील सारी

स्त्रीपात्रे खेळ मांडण्याची संधी मिळाली तर तुझी पूजा करेन असे गणेशाला विनविताना दिसतात. खेळ म्हणजे संसार असे मानले तर प्रस्तुत नाटकातील स्त्रिया आपापला संसार मांडण्यासाठी गणेशाला म्हणजे एका 'पुरुषा'ला कळकळीने विनवत असल्याचे दिसतात. हा नाट्यगत अनुभव करूण आहे. कारण त्यातून स्त्रीची दुबळी मानसिकता आणि गतानुगतिकताच प्रभावीपणे प्रकट होते.

स्त्री नाटककार म्हणून मनस्विनी लता रवींद्र आणि इरावती कर्णिक ही बहुचर्चित नावे आहेत. स्त्री किंवा पुरुष यांच्या सेक्सविषयक जाणिवेकडे त्या काहीशा प्रगल्भतेने पाहात आहेत, असे वाटते. या दोन नाटककारांनी रंगविलेल्या भावाविश्वावर व स्त्री-पात्रांवर भाष्य करणे घाईचे होईल असे वाटते. तरीही मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी असलेल्या प्रश्नांना अतिशय धीटपणे आपल्या उणिवांसह त्या सामोऱ्या जात आहेत हे नोंदवायला हवे.

सारांश, आधुनिक आणि उत्तर आधुनिक काळात स्त्रीविषयक प्रश्नांसाठी अनेक चळवळी उभ्या राहिल्या. परिस्थितीवश पुरुषांनी सुरू केलेल्या स्त्री-स्वातंत्र्याच्या चळवळीची सूत्रे पुढील काळात स्त्रियांनी आपल्या हाती घेतली. शिक्षणाच्या झालेल्या प्रसारामुळेच स्त्रियांनी आपले कर्तृत्व वेळोवेळी सिद्ध केले. आज काहीजणींचा तरी सामाजिक दर्जा उंचावलेला आहे. त्यांच्या आशाआकांक्षा जश वाढल्या आहेत तशा त्या बदललेल्याही आहेत. स्त्रीचाच नव्हे तर माणसांचाच स्वातंत्र्यविषयक पेच सभान झालेल्या स्त्रियांना कळू लागलेला आहे. उत्तरोत्तर सर्व स्तरांतील स्त्रिया कमी-अधिक प्रमाणात त्यांच्या समोरील प्रश्नांना धीराने सामोऱ्या जात आहेत. अर्थात असंख्य स्त्रिया गतानुगतिक समाजव्यवस्थेच्या 'गुलाम' ही आहेत. आपण 'गुलाम' आहोत याचे अनेक जणींना भान नाही. समाजातील स्त्रीघटकामध्ये अशी तऱ्हेतऱ्हेची संगती-विसंगती दिसते आहे. पण साऱ्या परिवर्तनांना, स्त्रियांच्या बदललेल्या मानसिकतेला, बदललेल्या सामाजिक व मानसिक संघर्षाला आणि परिस्थितीतील संगतीविसंगतीला मराठी रंगभूमीवर व्यक्त करण्याचे सामर्थ्य असलेला नाटककार (स्त्री अथवा पुरुष) नाही. या उलट मराठी रंगभूमीवर 'हसा-हसवा' या सूत्राने बांधलेल्या नाटकांचे उदंड पीक आले आहे. विशेष महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांच्या सवयी, त्यांचे दिसणे आदी गोष्टींनाच विनोदात महत्त्व येत आहे आणि स्त्री-पुरुष दोघेही संगतीसोबतीने त्याचा आस्वाद घेत आहेत हे गंभीर आहे किंवा नाही हे वाचकांनीच ठरवायचे आहे.

दुसरे असे, वरील सर्व नाटककारांमध्ये काही नाटककारांचा व त्यांनी रंगविलेल्या स्त्रीपात्रांचा अपवाद केला तर गतानुगतिक जीवनमूल्यांचा अवलंब करणारी स्त्रीपात्रेच मोठ्या प्रमाणावर रंगभूमीवर आली. कारण परिवर्तनवादी अनेक चळवळी उभ्या राहिल्या तरी समाजातील बहुसंख्य वर्ग हा अशा चळवळींपासून फटकून राहातो. त्याच्या बोथट संवेदना त्याला विचारसन्मुख करीत नाहीत. परिणामी समाजात वरवरचे बदल होतात. कालांतराने त्या बदलांमध्ये एक प्रकारची भ्रष्टता येते. त्यामुळे समाज जिथल्या तिथे राहताना दिसतो. म्हणूनच नाट्यगत स्त्री-प्रतिमा ह्या पारंपरिक, कालबाह्य मूल्यांचाच पुरस्कार करणाऱ्या असतात किंवा त्या रसिकांच्या थिल्लर प्रवृत्तींचे थिल्लर रंजन करणाऱ्या असतात. आजच्या मराठी रंगभूमीकडे पाहिले तर या रंगभूमीला काही काळ तरी समृद्ध व संपन्न वारसा लाभला होता यावर कुणाचा विश्वास बसू नये इतक्या हलक्या व सामान्य पातळीवर नाट्यगत स्त्रीचित्रण आले आहे. तसेच प्रायोगिक म्हटल्या गेलेल्या व काही नवेनवे प्रयोग करू पाहणाऱ्या प्रायोगिक रंगभूमीनेही वाचकप्रेक्षकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील अशी स्त्री-प्रतिमा रंगविली नाही, मग केवळ थिल्लर रंजनाला महत्त्व देणारे स्त्रियांच्या 'आज' च्या प्रश्नांकडे डोळसपणे आणि सहसंवेदनेने पाहात नाहीत, अशी तक्रार करण्यातही काही अर्थ नाही. खरे तर संवेदनशील प्रतिभावंत नाटककारांनाही हे नवे बदल, स्त्रीची नवी घुसमट, तिचे अंतर्बाह्य घुसमटणे उमजत नाही की, उमजून मांडावेसे वाटत नाही!

•••

स्त्री रचित स्वातंत्र्योत्तर हिन्दी कथा साहित्य

डॉ. सुधा अरोड़ा



अपनी बात मैं नवनीता देवसेन के द्वारा हैदराबाद में वीमेंस वर्ल्ड की एक कार्यशाला में सुनाई पंद्रह साल पहले की एक दिलचस्प घटना से करना चाहती हूं । कोलकाता में महिला रचनाकारों पर एक कार्यक्रम आयोजित किया गया । मंच पर कुछ महिला साहित्यकार मौजुद थीं । आयोजक दे दो तीन वक्ताओं के के बाद नवनीता जी की ओर देखते हुए घोषणा कि अब वे व्याख्यान के लिए कविता सिंह को आमंत्रित कर रहे हैं । सारे उपस्थित लोग इधर उधर देखने लगे क्योंकि कविता सिंह वहां थी ही नहीं। जाहीर है, आयोज़कों ने महिला साहित्यकारों का आयोजन तो कर लिया था पर न उन्होंने आमंत्रित महिलाओं की रचनाओं को पढ़ा था, न उनमें उनकी कोई दिलचस्पी थी, बस, एक औपचारिकता भर निभायी जा रही थी । नवनीता जी माइक पर पहुंची और उन्होंने कहा - आयोजकों को गलतफहमी हुई है। उन्हें नहीं मालूम कि मैं कविता सिंह नहीं हूं मैं महाश्वेता देवी हूं । यह व्यंग्य कितना संप्रेषित कर पाया, यह बात दीगर है ।

सचमुच आज से पहले तक महिला लेखन को एक सन्माननीय दर्जा प्राप्त नहीं था और जो दो-चार महिलाएं रचनाएं करती भी थीं, उन्हें घर के सीमित दायरे की सीमित समस्याओं के घेरे में रचा लेखन मानकर या घर बैठी ''ऊबी हुई सुखी महिलाओं का लेखन'' मानकर गंभीरता से नहीं लिया जाता था।

आज की हिन्दी कहानी में अगर अनिवार्य रूप से महिलाओं द्वारा रचे गए साहित्य पर चर्चा की जाती है तो उसका एक कारण यह भी है कि हिन्दी कथा साहित्य में पिछले तीन दशकों से लेखिकाओं की संख्या में गुणात्मक वृद्धी हुई है । पहले जहां महिलाओं के लेखन की घर परिवार की चहारदीवारी में कैद और समाज की दूसरी अहम (?) समस्याओं से कटा हुआ फुरसती लेखन मानकर उसे दरकिनार कर दिया जाता था, आज अपेक्षाकृत निर्माण होकर उसकी जांच पड़ताल की जाती है । यह सुखद है कि महिलाओं द्वारा रचे गए साहित्य का पिछले कुछ वर्षोंसे एक सकारात्मक, विश्लेषणात्मक और ऊर्ध्वमुखी विकास इस वक्तव्य को खारिज करता है कि पढी लिखी धनाढ्य महिलाएं दुपहर की फुरसत में कलम घसीटती या चित्रकारी करती हैं । इस तरह के पुरुष संपादकों के वक्तव्य पढ़कर देबोरा कैमरॉन की एक उक्ति याद आती है कि 'लेखन भी एक तंत्र है और अधिकांश तंत्रो की तरह इस पर भी शक्तिशाली वर्ग ने एकाधिकार जमा रखा है।'

महिला कथाकारों द्वारा लिखी गयी रचनाएं, वह भी सिर्फ महिला के केन्द्र में रखकर लिखी गयीं - क्या सचमुच इन्हें अलग से रेखांकित करने की जरूरत है? आज जब महिलाओं में साक्षरता की दर में बीस प्रतिशत वृद्धि हुई है, महिलाएं पहले से कही अधिक अपनी समस्याओं के प्रति जागरूक हैं, वे घर के चहारदिवारी से निकलकर बाहर के हर क्षेत्र में मुस्तैदी से अपनी पहचान बना रही है, तब सिर्फ महिलाओं पर अत्याचार और शोषण की ही बात करते रहना कहां तक जायज़ हैं? यह सवाल अक्सर न सिर्फ पुरुषों द्वारा, बल्कि जागरुक महिलाओं द्वारा भी उठाया जाता रहा है ।

इस सवाल का कोई उत्तर से पहले एक तथ्यगत आंकड़े की ओर ध्यान देना जरुरी है? हम महानगरों या छोटे शहरों में रहनेवाली जिन पढ़ी लिखी कामकाजी औरतों की बात करते हैं, उनकी संख्या पूरे भारत में दो प्रतिशत है। और यह तबका भी क्या - 'औरत' होने के कारण पैदा हई समस्याओं से अछूता है? कामकाजी औरतों की घर और बाहर की दुहरी जिम्मेदारी में क्या उसे अपनी पति या परिवारवालों से कोई रियायत मिलती है? क्या आर्थिक रूप से आत्मनिर्भर होने या अपने परिवार का खर्च खुद उठाने का सामर्थ्य रखनेवाली महिलाएं अपनी शर्तों पर जिन्दगी बसर कर सकती है? क्या ऊंचे ओहदों पर कार्यरत महिलाएं भी अपने कार्यक्षेत्रों के बड़े बड़े फैसलों में निर्णायक की भूमिका अदा करती है' (जब तक कि वे खुद उस संस्था की मालिक या संचालक न हों) इन सभी प्रश्नों का उत्तर हमें नकारात्मक ही मिलेगा ।

इसी सवाल से जुड़ा सवाल यह भी है कि हम कबतक सिर्फ इस दो प्रतिशत की ही बात करते रहेंगे, जिसमें कमोबेश हम अपने को भी शुमार करते हैं और खुद को मिली सुविधाओं और रियायतों के कारण अपने आप को दूसरी बहुसंख्यक महिलाओं के मुकाबले भाग्यशाली महसूस करते हैं। यह रवैया वैसा ही है जैसा अपने घर की खिड़कियां और दरवाज़ो को बन्द कर हम बाहर की दुनिया से आंखे बन्द कर लें और कहें कि हमारे कमरे या हमारी हद में आनेवाली दुनिया ही सच है, बाहर की दुनिया सिर्फ अखबारों की दुनिया है,

औरत की ज़िन्दगी में घटनेवाला हर हादसा चंद लाईनों की एक अखबारी रपट है । इस अपेक्षाकृत बड़ी दुनिया तक पहुंचने के लिए हमें अपने घर की खिडकिया खोलनी ही होंगी । हमें इस दो प्रतिशत के विशिष्ट वर्ग कीं नहीं, आम और सामान्य औरत की बात करनी है ।

पचास साल पहले फ्रांस की सुप्रसिद्ध नारीवादी लेखिका सिमोन द बुवा ने अपनी किताब 'द सेकेण्ड सेक्स' में एक सवाल उठाया था 'यह दुनिया हमेशा पुरुषों की रही, मगर क्यों? स्त्री को उनके अधीन होकर ही रहना पड़ा।' पचास साल बाद आज भी यह सवाल उतना ही समीचीन है जितना तब था । कुछ गावों और कस्बों में तो स्थितीयां तेज़ी से बदतर होती जा रही हैं। एक लड़की के लिए अपने देह और आत्मसम्मान बचाकर जीना इतना मुश्किल होता जा रहा है। इसके अंदेशे से बिहार में कन्या शिशु के जनमते ही उसके मुंह में मुट्ठी भर नमक डालकर उसे मार डाला जाता है। गांवो में आज भी किसी भी पारिवारिक या सामाजिक रंजिश का बदला इस परिवार की महिला को निर्वस्त्र कर पूरे गांवों में घूमाकर लिया जाता है । हर दो घंटो में दहेज के कारण एक हत्या दर्ज की जाती है । बलात्कार के आंकड़े दिन पर दिन बढ़ रहे हैं । जहां कानून इतना ढिला है कि बलात्कार के मुकादमों में प्रत्यक्ष साक्ष्य मांगता है, प्रत्यक्ष साक्ष्य मिलने पर उसे मनमाने तरीके से अस्वीकार करता है, बलात्कारियों को पकड़ने के बाद भी न सिर्फ उन्हें जमानात पर रिहा कर दिया जाता है बल्कि उनके सम्मान में जश्न मनाया जाता है। माया त्यागी से लेकर मुरादाबाद की किसनवती तक और बसमतिया से लेकर भटेरी की भंवरी देवी तक प्रताड़ना का एक लम्बा सिलसिला है।

ऐसे सामाजिक माहौल के बीच यह प्रत्याशित नहीं है कि न सिर्फ हिन्दी में बल्कि भारत की सभी भाषाओं में महिला रचनाकारों की एक बड़ी जमात औरत के सामाजिक सरोकारों के साथ उभरी है। भारतीय भाषाओं में पिछले सौ वर्षो का इतिहास गवाह है कि महिलाओं द्वारा हर काल में रचनात्मक स्तर पर इन मुद्दों पर विचार के साथ-साथ रचनाकर्म की किया जाता रहा है । बंगाल में निरूपमा देवी, स्वर्ण कुमारी, ज्योर्तिमयी देवी, विनोदिनी दास, महाराष्ट्र में ताराबाई शिंदे, काशीबाई कानेटकर, रमाबाई रानडे, उर्दू और हिन्दी में रुकैया सखावत हुसैन, सुभद्राकुमारी चौहान, शिवरानी देवी, सुमित्राकुमारी सिन्हा, महादेवी वर्मा और चुगताई ने अपने समय में औरतों की सामाजिक स्थिति पर कहानियों या लेखों के रूप में अपने बयान दर्ज किए है।

पिछले चालीस वर्षों में विश्व की हर भाषा में महिला रचनाकारों की संख्या में गुणात्मक वृद्धि हुई है। यहां तर कि आज हर भाषा में इस के नारीवादी लेखन को लेकर अलग से बातचीत करने की जरूरत महसूस की जाने लगी है। इन्हें स्वीकृति देने के साथ-साथ इन्हें आरोपों के कटघरे में खड़ा किया जाता है। कहा जाता है कि इनके लेखन में वैविध्य नहीं है, ये सिर्फ घर की चौहद्दी में कैद समस्याओं पर ही अपनी लेखनी चलाती हैं, इनके विषयों का दायरा बहुत सीमित है। घर और बाहर के क्षेत्रों में बाहर के मुकाबले 'घर' को अपेक्षाकृत छोटा, सीमित, तंग और दोयम दर्ज़े का 'स्पेस' माना गया है। इस छोटी और तंग स्पेस को गैरजरूरी करार कर हमेशा अंधेरे में ही रखा गया है । इसपर सदियों से जमी काई और सीलन को देखा जाना जरूरी है। वास्तविकता यह है कि इस चहारदीवारी में कैद छोटी सी दुनिया के 'अस्तित्व' की अपनी बढ़ी समस्याएं है और कुछ अपवादों को छोड़कर पुरुष लेखक एक दर्शक होने के नाते भोक्ता औरत की कहानी उतरनी प्रामाणिकता के साथ नहीं कह सकता। यहां राजकिशोर की एक उक्ति मुझे याद आ रही है 'पुरुष लेखक कितनी भी संवेदनशीलता दिखाए, वह स्त्री का अपना वृत्तांत नहीं लिख सकता। स्त्री के पक्ष में यथार्थ की जड़े हमेशा मजबूत होती है'। एक गांव कस्बे की औरत हो या शहर की पढ़ी लिखी औरत, सबको एक साथ कई मोर्चो पर जूझना पड़ता है और इसका कारण सबसे पहले पुरुष वर्चस्व वाले समाज में उसके औरत होने में निहित है। बहरहाल, पिछले पचास सालों के बदलते सामाजिक स्थिति का यथार्थ आकलन अपने समय में रचे गए साहित्य में हमें यह देखना है कि क्या औरत की सामाजिक स्थिति का यथार्थ आकलन अपने समय में रचे गए साहित्य में सही रुप में हो पाया है।

भारतीय समाज मूल रुप में एक संयुक्त परिवार का रुप रहा है और संयुक्त परिवार में औरत का दर्जा लगभग वही रहा है जो सामंती परिवार में मालिक के नीचे काम करने वाले गुलाम या जमींदार के नीचे काम करनेवाले किसान का होता है। इन सम्बंधो को अर्थसत्ता निर्धारित करती है। पुराने संयुक्त परिवारों में सतह पर दिखते आपसी सौहार्दपूर्ण सम्बधों के बीच आम तौर पर घर का मालिक निरंकुश शासक होता था जिसके हाथ में सभी सदस्यों की नकेल है और इस संयुक्त परिवार की औरत नीची आंखे किए एक अधिकारहीन नारी का प्रतिरुप रही है।

इस समय के रचे गए साहित्य में स्वाभाविक रुप से नारी के त्याग को सर्वोपरि गुण माना गया और उसके इसी गुण पर केंन्द्रित कर नारी पात्र गढ़े गए। उस समय की महिला रचनाकारों में सुभद्राकुमारी चौहान, शिवरानी देवी या सुमित्राकुमारी सिन्हा की कहानियों के नारी पात्रों में चारित्र के स्तर पर अद्‌भुत समानता है। ये कहानियां यथार्थ के धरातल पर जन्म जरुर लेती थीं पर उनकी परिणति अनिवार्य रुप से आदर्शवादी मोड़ पर होती दिखाई देती थी। वह चाहे सुमित्राकुमारी सिन्हा की कहानी 'व्यक्तिगत की भुख' हा या सुभद्राकुमारी चौहान

की व्यक्तिपरक रेखाचित्रनुमा कहानियां-गौरी, कल्याणी,रुपा,मंगला, सुभागी-जैसा कि शीर्षक से ही जाहीर है। स्त्री के रुप में ही आया है चाह वह सौ साल पहले की रुकैया सखावत हुसैन की कहानी,' सुलताना का सपना' हे या 'व्यक्तितत्त्व की भुख' जहां लेखिका उन स्थितियों में पुरुष की कल्पना करती है, जिनसे स्त्री को गुजरना पड़ता है। महादेवी वर्मा की स्त्री के अपेक्षाकृत उजले पक्ष और दयावान ममतालु स्वरूप को उजागर करती कुछ कहानियां भी काव्यात्मक शैली में हमें देखने को मिलती हैं।

रीतिकालीन सौन्दर्य या छायावादी काव्यात्मकता और एक निराकार वायवी स्त्री के तिलिस्म को प्रेमचन्द्र की'बड़े घर की बेटी', 'बुढ़ी काकी' और ''अलग्योझा' के नारी चारित्रों ने एक झटके से खंडित कर दिया। प्रथम विश्व युद्ध के बाद जिस भारतीय मध्यमवर्ग का भयानक विघटन आरम्भ हुआ था, उसके स्पष्ट स्वर प्रेमचन्द की कहानियों में सुनाई दे रहे थे। प्रेमचन्द की कहानियाँ में प्रेयसियां नहीं थीं, गरीब किसान मजदूर परिवार की अशिक्षित,सीधी सादी मां, बेटी, पत्नी या बहू थी। इस स्त्री का संघर्ष बहुत कुछ बाह्य था और इसका कारण तत्कालीन सामाजिक, राजनीतिक परिवेश था और ये पात्र अपनी परिवेशगत सच्चाइयों से उपजे थे इसलिए वे अपनी जमीन से जुड़े थे। प्रेमचन्द क स्त्री पात्र खेतों सें शारीरिक श्रम करती थी, रोटी रोजी कही लड़ाई में हाथ बंटाती थी और अन्याय को देखते हुए भी भाग्य को स्वीकारते हुए जीवन से जूझने का प्रयत्न करती थी। इन स्त्री पात्रों का एक क्रमिक विकास हुआ है। ईदगाह की अमीना, अलग्योझा की पन्ना, बेटों वाली विधवा की फुलमती, हार की जीत की लज्ज जैसे स्त्री चरित्रों को गढ़ने में प्रेमचन्द का झुकाव आदर्शवाद की ओर रहा है पर अपनी बाद की कहानियों 'पूस की रात', 'कफन' 'शतरंज के खिलाड़ी' तक पहुंचते पहुंचते उन्होंने जैसे अपने ही आदर्शवाद के प्रति जेहाद घोषित कर दिया।

जैनेन्द्र के साहित्य में हमें एक हाड़ मांस की स्त्री अपने अलग अलग रुप में तमाम कमजोरियों, खामियों और खूबियों के साथ दिखाई देती है। यह उस सामाजिक स्थिति का प्रतिफलन है जहां आजादी की लड़ाई में स्त्री भी पुरुषों के साथ साथ घर की चहार दीवारी से बाहर निकल कर आई थी। आज़ादी हासिल होने के बाद अधिकांश को वापस घर की चौहद्दी में लौटना पड़ा और इसलिए आज़ादी के बाद के लेखन में स्त्री का एक यथार्थपरक रुप तो उभारता है पर यह मन के अन्तर्द्वन्द्व और आन्तरिक संशय के कंधो पर ही टिका हुआ है।

जब स्त्रीवाद नारे और आंदोलन के रूप में चर्चित नहीं था, तब भी नारीवादी लेखन किया गया है। रुकैया सखवत हसन की कहानी '' सुलताना का सपना '' देखें। बंग महिला, सुमित्राकुमारी सिन्हा, चन्द्रकिरण सौनरेक्सा की कहानियों के बाद महादेवी वर्मा की ' श्रृंखला की कड़ियां ' के आलेख अभूतपूर्व हैं - उन दिनों संस्मरण विधा का भी इतना चलन नहीं था पर महादेवी जी ने अपने आलेखों में कितनी सशक्त शैली में अपने समय की स्त्री की हर क्षेत्र में यातना का सटीक चित्रण किया - उसमें लछमा का चरित्र बहुत कुछ कह जाता है। महादेवी स्त्री को लेकर अपने समय की सोच पर या स्थितियों पर कोई बयान नहीं देतीं पर उस समय से उठाए गए एक स्त्री पात्र का जैसा रोंगटे खड़े कर देने वाला चित्रण वह करती हैं, वह अपने आप में एक बयान है। कृष्णा सोबती की मित्रो मरजानी, उषा प्रियंवदा की पचपन खंभे-लाल दीवारें, मन्नू भंडारी की कहानियां - बंद दराज़ों का साथ, तीन निगाहों की एक तस्वीर, अकेली, नई नौकरी, स्त्री सुबोधिनी परंपरा और विद्रोह के संधिकाल में खड़ी स्त्री की कहानियां हैं। इन कहानियों का विश्लेषण करें तो उस समय की स्त्री की सामाजिक स्थिति को बखूबी पहचाना जा सकता है। लेकिन महिला रचनाकारों की यह त्रयी जब तक रचनारत थी, इन्हें महिला लेखन के खांचे में नहीं डाला गया। उनकी कहानियों का जिक्र या समीक्षा मेनस्ट्रीम के रचनाकारों के साथ ही की गई। इसके बाद जब ७५ के आसपास जब महिलाओं की एक बड़ी जमात ने अपनी धाक जमानी शुरु की तो समीक्षकों के लिए कोई विकल्प नहीं रह गया क्योंकि इसे अनदेखा करना संभव नहीं था। संवेदना के स्तर पर ये रचनाएं आष्चर्यजनक रूप से भिन्न थीं और इसमें मूलभूत अंतर वही था जो एक स्त्री और पुरूष की भावनात्मक और सोच के धरातल पर होता है।

दूसरी ओर कृष्णा सोबती की मित्रो मरजानी इससे अलग एक अक्खड़ और दबंग औरत की एकांतिक तस्वीर प्रस्तुत करती है जिसका सामान्यीकरण नहीं किया जा सकता।

इस संक्रमण का में रची गई मित्रो या आपका बंटी की शकुन या उषा प्रियंवदा की राधिका जैसे सशक्त चरित्रों के बावजूद सही रुप में नारीवादी साहित्य या नारीवादी कहानियों की शुरुआत पिछले दो दशको से ही जानी जा सकती है। इसके कारण हमारे बदलते हुए समाज में निहित है। आज हमारा समाज ऐसा है कि पूंजीवाद तो उभर रहा है पर सामंती ढांचा पूरी तरह टूटा नहीं। आचार्य रामविलास शर्मा ने इस स्थिति की बड़ी सटीक व्याख्या की है। आज जो अछूतों पर अत्याचार दिखाई देते हैं, उन्हें आप शहरी या ग्रामीण नारी पर होने वाले अत्याचारों से जोड़कर देखिए। वे उन लोगों के द्वारा ज़्यादा होते हैं जो पुराने ढंग के सामंत नहीं है, जो नए पूंजीवादी किसान है। जिन घरों में दहेज को लेकर स्त्रियां जलाई जाती हैं, वे ज़्यादातर व्यापारी लोगों के घर होते हैं। जमींदार औरत को मारेगा -पीटेगा लेकिन जलाएगा नहीं क्योंकि बंधुआ मजदूर उसके लिए कीमत रखता है लेकिन जो व्यापारी वर्ग है, वह विवाह को भी एक व्यापार समझता है। एक माल

हमने खरीदा, उसमें मुनाफा नहीं , उसे अपदस्थ करने के तरीके ढूंढो या सीधे उसे खतम करो, दूसरा माल लाओ। यह व्यापारी जो उद्योगपति नहीं है, सामंतों से भी अधिक बर्बरता से व्यवहार करता है।

यह सच है कि हर समस्या का हल हम साहित्य में नही ढूंढ सकते पर यह भी सच है कि आज साहित्यकारों ने सामाजिक परिप्रेक्ष्य में महिलाओं की समस्याओं की ओर ध्यान देना शुरु किया है। ममता कालिया की कहानी 'जनमी थी औलाद', चित्रा मुद्रल की 'प्रेतयोनि', मृदुला गर्ग की 'दुनिया का कायदा' या 'तीन किलो की छोरी', राजी सेठ की 'अनावत'या 'स्त्री', सूर्यबाला की ' सुमिन्तरा की बेटियां ' , ज्योत्स्ना मिलन की 'बा' , 'सुधा अरोड़ा की ' अन्नपूर्णा मंडल की आखिरी चिट्ठी ' या ' रहोगी तुम वही ' , नासिरा शर्मा की ' मेरा घर कहां ' नमिता सिंह , रमणिका गुप्ता , कमल कुमार , मेहरुन्निसा परवेज ,मैत्रियी पुष्पा की 'फैसला' या 'गोमा हंसती है' आदि कहानियों की एक लम्बी सूची है। पिछले बीस सालों में अगर कुल कहानियों के विषय का विभाजन करें तो हम पाएंगे कि सबसे ज्यादा कहानियां स्त्री के मुद्दों पर ही रची गई हैं । उपन्यास के क्षेत्र में स्त्री समस्याओं पर लिखे गए उपन्यासों की एक बेहद उर्वरा जमीन हिन्दी के रचनात्मक साहित्य में देखी गई है । कृष्णा सोबती की 'मित्रो मरजानी' , उशा प्रियंवदा की 'रुकोगी नहीं, राधिका' और मन्नू भंडारी की 'आपका बंटी' जैसे तीन प्रमुख बहुचर्चित और अधिकांश भारतीय भाषाओं में अनूदित इन तीन मुख्य रचनाकारों के बाद सन् १९८०-८५ के बाद हिन्दी में स्त्री विषयक उपन्यासों की जैसे बाढ़ सी आ गई । ममता कालिया का 'बेघर' और 'एक पत्नी के नोट्स ' (जिसमें एक मध्यवर्गीय पढ़ी लिखी महिला का भी अपने पति द्वारा एक सामान्य औरत की तरह ट्रीट किया जाना और गाहे बगाहे व्यंग्य का शिकार होना तथाकथित प्रगतिशील और पढ़े लिखे वर्ग को बेनकाब करता है) मृदुला गर्ग का 'अनित्य' (जिसमें दो महत्वपूर्ण स्त्री पात्रों में से एक - काजल एक फेमिनिस्ट प्राध्यापक की तरह उभरती है जो अनलिखे इतिहास को दुबारा लिखना चाहती है , भगतसिंह के सिद्धांतों पर विश्वास करती है और उसे पढ़ाती है हालांकि वह उनके कोर्स में नहीं है , संगीता जो एक वेश्या की बेटी है पर अपने सिद्धांत खोती नहीं , अपनी अस्मिता के साथ खड़ी होती है) मृदुला गर्ग का ' चितकोबरा ' और ' मैं और मैं ' (जिसमे एक औरत और एक लेखिका के दोनों पहलुओं की कश्मकश का बड़ी बारीकी से चित्रण किया गया है) और इन सबसे बढ़कर मृदुला गर्ग का ' कठगुलाब' (जिसमें स्त्रियों के इतने विभिन्न रंग रूप और शेड्स हैं कि स्त्री विमर्श की कई अवधारणाओं की पोथी बांची जा सकती है) चित्रा मुद्गल का ' एक जमीन अपनी ' और ' आवां ' (जिसमें एक सामाजिक कार्यकर्ता के जमीनी लड़ाई के संघर्षो का पहली बार हिन्दी साहित्य में इतना सचेत और बेबाक चित्रण हुआ है) मृणाल पांडे का ' पटरंगपुराण ' (जिसे पढ़कर लगता है कि पूरा एक शहर ऐसी औरतों के नजरिए से देखा - परखा और बयान किया जा रहा है जो अपने खिड़की झरोखे खोलकर घूंघट उलटाकर बड़ी पैनी निगाह से कस्बे में होने वाले हर क्रिया कलाप का जायजा ले रही हैं) मेहरुन्निसा परवेज का 'कोरजा ' (जिसमें आदिवासी परिप्रेक्ष्य में एक स्त्री की त्रासदी का वर्णन है) , सूर्यबाला का 'मेरे संधि पत्र ' , मंजुल भगत का ' अनारो ' ,'गंजी '(हिन्दी साहित्य में एक कामकाजी नौकरानी के रोटी रोजी के संघर्श के साथ साथ उसकी ताकत और स्वाभिमान को रेखांकित किया गया है) तथा ' खातुल '(हिन्दी में पहली बार अपने मुल्क से बेदखल हुआ किरदार मर्द का नहीं , औरत का है जिसे मुहाजिर बनाकर प्रस्तुत किया गया है । अफगानिस्तान से भागकर आई यह शरणार्थी एक कमसिन बच्ची है । जंग के तमाम वहशी हादसे और खौफनाक मंजर भुगतने के बाद भी वह अपना मुल्क छोड़कर भागना नहीं चाहती बल्कि उसे आजाद कराने में कुर्बान होना चाहती है ।) कमल कुमार का ' यह खबर नहीं '(जिसमें सत्ता और प्रभुताशाली वर्ग के बीच किस तरह एक प्रतिभाशाली लड़की की अस्मिता को कुचला जाता है , इसका रोमांचकारी यथार्थ वर्णन है) नासिरा षर्मा का 'एक और शाल्मली ',(जिसमें घर और बाहर में अपने अधिकार मांगती आजादी के बाद की उभरती एक अलग किस्म की स्वतंत्रचेता स्त्री है जो पति से संवाद चाहती है , बराबरी का दर्जा चाहती है , प्रेम की मांग करती है जो उसका हक है। इस पात्र का सृजन बेहद सूझबूझ से किया गया है) 'ठीकरे की मंगनी ',(बचपन में बिना पैसे के लेन देन के मंगनी हो जाती है और लड़का बड़ा होने पर शादी करने से मुकर जाता है। इस पर कद्दावर औरत टूटती नहीं , वह अपना एक घर बनाती है , एक वजूद हासिल करती है और मर्द के लौटने पर उसे दुबारा कुबूल नहीं करती) ' कुइयां जान ' (इस उपन्यास में पानी की समस्या केंद्र में है पर इस समस्या से रू-ब-रू होती हैं औरतें । इस उपन्यास का सबसे खूबसूरत पहलू है कि औरतों के सामाजिक सरोकार उभर कर आते हैं और औरतें पर्यावरण के मुद्दे पर बात करती हैं) राजी सेठ का 'तत्सम ' चन्द्रकांता का ' अपने अपने कोणार्क ' तथा 'कथा सतीसर ' गीतांजलि श्री का ' 'माई' जिसमें गांव कस्बे की एक औरत अपने बच्चों और परिवार के लिए कैसे अपने को तिल तिल होम करती है पर उसका मिटना भी उसके बच्चों में विद्रोह की चिनगारी और अपनी रीढ़ की हड्डी सीधी रखने का जज्बा जगा जाता है) और ' तिरोहित ' ' प्रभा खेतान का ' पीली आंधी ' तथा 'छिन्नमस्ता' (जिसमें परंपरागत दकियानूसी मारवाड़ी परिवार की एक लड़की का बागी निकल आना कैसे पूरे समाज को उसके खिलाफ खड़ा कर देता है - का एक संपूर्ण दस्तावेज है) मैत्रेयी पुष्पा का 'इदन्नमम' तथा 'चाक' मधु कांकरिया का 'सलाम आखिरी ' और 'सेज पर संस्कृत '(जिसमें जैन साध्वियों का

धर्म के नाम पर शोषण दबा छिपा कर रखा जाता है पर युवा पीढ़ी की एक जैन लड़की शोषण के खिलाफ उठ खड़ी होती है) अलका सरावगी का 'शेष कादम्बरी ', अनामिका का ' दस द्वारे का पिंजरा '(जिसमें पिछली शती की औरतों के कद्दावर होने का आज के परिप्रेक्ष्य में समूचा बयान है)

नारीवादी लेखन आज के समय की ज़रूरत है। आधुनिकता और उदार सोच के तमाम दावों के बावजूद स्त्री की सामाजिक स्थिति या उत्थान में कोई बड़ा क्रांतिकारी परिवर्तन नहीं आया है। आज भी वे समझौतों और दोहरे कार्यभार के बीच पिस रही हैं। पुरुष सत्ता की नीवें हमारे समाज में बहुत गहरे तक धंसी हुई हैं। इसे तोडना , बदलना या संवारना एक लम्बी लड़ाई है। हर क्षेत्र में स्त्रियां अपनी अपनी तरह से अपनी लड़ाई लड़ रही हैं।

कथा साहित्य में भी स्त्री चेतना ने अपनी उपस्थिति पूरी गहराई और शिद्दत से दर्ज़ करवाई है पर हिन्दी साहित्य में तथाकथित स्त्री विमर्श इतने बौद्धिक स्तर पर है कि आम औरतों तक या उन औरतों तक - जिन्हें जागरूक बनाने की ज़रूरत है - यह पहुच ही नहीं पाता। यह काम साहित्य के स्त्री विमर्शकारों से कहीं अधिक महिला संगठन और ज़मीनी तौर पर उनसे जुड़ी कार्यकर्ताएं कर रही हैं।

कथा साहित्य में आप कहानी के कथ्य से अलग जाकर स्त्री सशक्तीकरण के संदेश नहीं दे सकते। कहानी लेखन की अपनी सीमाएं हैं। कहानी में हम ' जैसा है ' या ' जैसा होता है ' की स्थितियां ही अधिक दिखाते हैं , जबकि आलेखों में , टिप्पणियों में या छोटे छोटे एक पष्ठीय स्तंभों में हम स्त्रियों को ' जैसा होना चाहिए ' की प्रेरणा , हौसला या नारा भी दे सकते हैं।

फेमिनिस्ट शब्द हमारे यहां लगभग गाली के रुप में ही इस्तेमाल किया जाता है। बहुत सी महिलाएं भी इस विशेषण से परहेज करती है। जबकि फेमिनिस्ट होने का एक सीधा सादा अर्थ है औरतों के प्रति एक जुड़ाव एक सरोकार... और कोई भी पढ़ा लिखा संवेदनशील व्यक्ति एक शोषित कौम के हक में खड़े होने से इनकार नहीं कर सकता।

स्त्री विमर्श को लेकर हमारे यहां यानी हिन्दी समाज में बहुत सी भ्रांतियां हैं। सबसे बड़ी भ्रांति यह है कि स्त्री विमर्श को वीमेन लिब यानी स्त्री मुक्ति का पर्याय मान लिया गया है। मुक्ति में भी स्त्री के लिए देह की मुक्ति को सर्वोपरि मुक्ति माना गया। स्त्री सशक्तीकरण - स्त्री जागरुकता का प्रसार करने के लिए एक कारगर औजार है।

समकालीन कथा साहित्य के फलक पर औरत की स्थिति के प्रति इस जागरुकता साथ ही एक छद्म किस्म के लेखन को भी नारीवादी साहसिकता या बोल्डनेस के नाम पर प्रश्रय दिया जा रहा है। हमारे समाज में नारी मुक्ति के बारे में दो मिथ प्रचलित हैं- एक तो यह कि नारी मुक्ति का तात्पर्य पुरुष आधिपत्य से मुक्ति है। दरअसल यह मुक्ति सामाजिक संरचना और रुढ़िगत संस्कारों से है। पुरुष वर्चस्व तो उस सामाजिक संरचना की ही एक प्रशाखा है जिसके पनपने और फलने-फुलने के लिए पूरा का पूरा सामाजिक-सांस्कृतिक माहौल 'टेलरमेड' है।

नारी मुक्ति के बारे में एक दूसरा मिथ यह है कि आधुनिक महिला को अपनी देह पर अधिकार और देह की स्वतंत्रता चाहिए। यह निष्पति भी पुरुष विचारकों की ही दी हुई है, जिसके कारण औरत से जुड़े बहुत से अपेक्षाकृत अहम मसलों को दरकिनास कर दिया गया है। इस छद्म तले यौन के उथले सवालों से उलझती स्त्री पुरुष के यौन सम्बन्धों की कुछ सामान्य कहानियों को बड़ी तेज़ी से साथ उछाला जा रहा है। उदाहरण के रुप में मैत्रेयी पुष्पा के उपन्यास ' अल्मा कबूतरी ' या ' चाक ' में रति प्रसंगों के अनावश्यक विस्तार को लेखिका की बेबाक बयानी और साहस का प्रतीक माना गया जबकि इस तरह के सपाट और उथले वर्णन कला के अभाव में सिर्फ पुरुषों द्वारा रचित प्रसंगों के समकक्ष खड़े होने के स्थूल मकसद से गढ़े गए हैं।

विज्ञान मनुष्य की यांत्रिक और बौद्धिक संरचना का शास्त्र है पर साहित्य मनुष्य की मानवता को बचाए रखने की कोशिश का दस्तावेज है। नारी मुक्ति भी मानवता से अपने आप को जोड़ने का और मनुष्य के रुप में स्वीकार किए जाने का अभियान है। इसमें सन्देह नहीं कि हिन्दी में नारीवादी साहित्य के लेखन की शुरुआत हो चुकी है। इसे सही परिप्रेक्ष्य में देखे जाने की आवश्यकता है।

अपनी बात के अंत में मैं आपको एक छोटा सा उदाहरण देना चाहती हूं।

वैज्ञानिक कीड़े मकौड़ों और पशु पक्षियों पर कुछ प्रयोग करते हैं। एक वैज्ञानिक ने दो मेढक लिए। एक मेढक को उसने काफी गरम पानी में छोड़ा , पानी के उस गरम तापमान को झेल पाने में असमर्थ वह फौरन कूद कर बाहर आ गया। अब उसने दूसरे मेढक को ठंडे पानी में डाला , मेढक उसमें आराम से तैरता कूदता रहा , उसने बाहर छलांग नहीं लगाई। वैज्ञानिक ने धीरे धीरे पानी का तापमान बढ़ाया और उसे धीरे धीरे बढ़ाते हुए बहुत गरम कर दिया। मेढक उस गरम होते तापमान का धीरे धीरे अभ्यस्त हो चुका था और जब उसका शरीर तापमान नहीं झेल पाया तो वह लगातार बढ़ते तापमान को झेल पाने में असमर्थ मर गया।

औरतों के साथ यही हुआ है। सदियों से उनका अनुकूलन किया गया है। वह हर तरह के तापमान की इस कदर अभ्यस्त हो जाती हैं कि एक नये घर के नये माहौल में नये लोगों के बीच धीरे धीरे बढ़ते तापमान के साथ तालमेल बिठाना सीख जाती हैं और यह तालमेल अन्ततः उनकी मर्यादित शोभायात्रा में उनकी मांग में सिंदूर के रूप में उनकी सजी हुई अर्थी में दीखता है।

